UNIVERSAL LIBRARY
OU_192562
UNIVERSAL LIBRARY

# साहित्य समालोचन

## सन १९३५

लेखक

गोपाळ गोविंद अधिकारी

प्रकाश

महाराष्ट्र प्रकाशन संस्था, मुंबई.

मुद्रक

नरहरी माधवराव यंदे

३८० इंदुप्रकाश प्रेस, मुं. नं. २

प्रकाशक

गोपाळ गोविंद अधिकारी

१५-१७-त्रिभुवन रोड मुंबई नं. ४

# सूचि


श्री

श्री सयाजी साहित्यमाला
श्रीखंडे ५९
श्रीसमर्थ चरित्र ८०

अ

अ प्रिं. प्र. के. ५२, ५८, ६०, ६५, ६७
अर्थ ३७
अरुणोदय ६१
अरविंदबाबू घोष ७९
अर्वाचीन मराठीसाहित्य ८४
आदर्श वैश्य ३६
आपटे ह. ना. ५२
आजकालचा महाराष्ट्र ८५
आळतेकर डॉ. ८४
आळतेकर प्रो. माधवराव ८९
आकाशगंगा ५९
आवडत्या गोष्टी ६४
आत्मदान ७५
अच्युतराव कोल्हटकर-स्मारक ग्रंथ ९५
ओक शामराव ३२
आनंद ९०

उ

उदय २१
उद्यम ३२
उद्धार कादंबरी ४८, ५२, ७३
उघडझाप ७७

ऐ

ऐक्य २६

क

कशाळकर शान्ताबाई १०
कमतनूरकर ११
करंदीकर अ. ज. ६?
कथामालती ६५
कथासुवर्ण ६६
कर्नाटक प्रेस ५५
कला ३५, ४८, ६७
कलादर्श ३५
कळ्यांचे निश्वास ५१
कारखानीस दत्तप्रसन्न ६०
काव्यरत्नावली ३८
काव्यगायन ४७
काव्यकुसुमकलिका ६१

काव्यकेतकी ३८
काणेकर २३
किर्लोस्कर डॉ. वासुदेवराव २९
किर्लोस्कर मासिक २९, ३०, ३१
केसरी २४, ३४
केळकर न. चिं. १९, ३४
केशवकुमार ५८
केळकर नी. म. ६८
कोल्हटकर प्र. श्री. ५४, ६५
कुलाबासमाचार २६
कोपरखळ्या ९९

ख

खांडेकर वि. स. ४०, ४१, ४९, ५२, ६५, ६६, ६७
खाड्ये प्रिं. ३६
खेड्यातील स्वभावचित्रें ६४
खाडीलकरांची नाट्यसृष्टी ८४
खेळगडी ९०

ग

गोवे साहित्य संमेलन ४०
गाजराच्या पुंग्या ६०
गोडबोले वकील १२
गुर्जर वि. सी. ५२
गडकरी बा. सं. ७२

घ

घराबाहेर २३, ७१
घरजावई ४८

च

चित्रा २३, २४
चौधरी सोपानदेव ३२

ज

जननी ३७
जाधव भास्करराव ४२
जाळ्यांतील मासा ७६
जोगळेकर १०
जोशी य. गो. ५२, ६६
जोशी प्रो. चिं. वि. ६३
जावडेकर २४

झ

झेंडूची फुले ५८, ६१

त

तरुण भारत २६
तत्वज्ञान मंदिर ३६
ताम्हणकर. का. म. ३२
त्याग नाटक ७०
तुकाराम नाटक ८०
तुळपुळे प्रो. ८४
ताम्बे यांची कविता ५७
त्रिलोकेकर खंडेराव २९

त्रिकाळ १६, १८
तुळपुळे सौ. शालिनीबाई १७
तेज १६, १७, ४८

द

दक्षिण महाराष्ट्र २६
दाभोळकर आणि मंडळी ५५
दांडेकर सौ. मालती ६५
दीपकळी ६५
दिक्षित चं. ग. ६०
दिवेकर शास्त्री २९
दुहेरी संसार ७६
दुर्दैवी मोहरे ६५
दवलक्लब ९०

ध

ध्रुव ३८
धर्मशास्त्र विचार ८५

न

नवशक्ती दैनिक १४
नवाकाळ १५
नवमत ३६, ४८
नटीचे आत्मकथन ४८
नवजीवन २९, ५०
नीती व कलोपासना ४८
नवे डोळे ( नाटक ) ४९
निर्भिड ९, १२
निर्माल्यातील कळी ७५
निरुक्ताचे मराठी भाषांतर ८८
नंदादीप ७४
नाटक मासिक ३८
निफाडकर ३६
नवसाहित्यमाला ५५

प

परचुरे पुराणिक मंडळी ५४
पखरण ६६
पराधीन ७६
पटवर्धन प्रो. मा. त्र्यं. ४९, ६१
परुळेकर डॉ. ना. भी. १७
पावित्र्यविडंबन ५२
पांगारकर ल. रा. ४७, ८१
पाटील मुकुंदराव ४२
पाठक ३५
पारिजात ३५
प्रवासी ९
प्रतिभा १६, २८, २३, ६१
६२, ७१, ८०
प्रभुप्रभात १६
प्रमोद २५
प्रबोध २६
प्रेक्षक २५
प्रागतिक २६
प्राविण्य ३२, ३३
प्रल्हादराय ६१

पत्री ६१
प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती ८५
प्रभुतरुण ३६
पुरुषार्थ ३१
प्राविण्य ३२, ३३
पूर्णेंदू ३८
पुण्याचे शारदोपासक संमेलन ४६
पेशवेकालीन महाराष्ट्र ८३
पैसाच पैसा ७०

फ

फाटक न. र. १५
फडके प्रो. ना. सी. २९, ४९, ५२, ६६
फुलोर ३६

ब

बलवंत साप्ताहिक २६
बाळासाहेब पंतप्रतिनिधी १२, १३, १४
बागवे विठ्ठलराव ४२
बांडगूळ ५९
बाजी प्रभु देशपांडे (पोवाडा) ६१
बायकी कावा ७०
बालबोध मेवा ९०
बनहट्टी प्रो. ५४
बोकील ५२
ब्रह्मज्ञान आणि बुवाबाजी ८४
बर्वे वि. ल ६९
बेहेरे प्रो. ना. के. ४९, ९२

भ

भविष्य ३८
भविष्य भास्कर ३८
भाषांतर मासिक ५५
भाला ३८
भारतीय संगीत ३८, ८०
भास्करभट बारीकर ८०
भारतीय चित्रकला ८५
भाटे गो. चिं. ८५
भोळा शेतकरी ३३
भालेराव डॉ. ४२
भंगलेले देऊळ ५१, ७८
भा. इ. सं. मंडळाचे त्रैमासिक ३६

म

महाराष्ट्र शारदा ९, ३५
महाराष्ट्र साहित्य परिषद १०, ४३
महाराष्ट्र साहित्य संमेलन १०, ४६
महाराष्ट्र शारदामंदिर ४०
महाराष्ट्र साहित्यपत्रिका ३६
महाराष्ट्र २०, २१
मानकर मुं. भु. २३
मातृभूमी २६

मनोहर ३०, ३१, ३८
महाराष्ट्र चेंबर ऑफ कामर्स ३३
माडखोलकर ग. त्र्यं. ५०
माधवज्यूलीयन ५२, ५९
महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास ८०
मराठी वाङ्मयाचा इतिहास ८१
महाराष्ट्र रसवंती ९१
मराठेशाहीची वध प्रतिपदा ७७
महाराष्ट्र सांवत्सरीक ८३
मानसमंदिर ८४
माधव कवि ५६, ५७
मोटे ह. वि.. ५१, ५४, ५६
मोघे यांचा बुकडेपो ५५
मायदेव प्रो. ५७
मन्वंतर ३७
मुंबई मराठी साहित्य संघ ८९
मुंबई साहित्य संमेलन ४३, ४४, ५३
मौज प्रिटींग ब्यूरो ५५
मुलांचे मासिक ९०
मौज २१
माटे श्री. म. ८३, ९२
मालविका ६१
महारवाडा ७०

य

यशवंत मासिक ३१, २२
यशोधन ५२
यशोगंध ५९
यज्ञमंडप ७०
यशवंत कवि ५८

र

रत्नाकर ३३
राजवाडे शंकरराव ५८
राजवाडे स. मंडळ ३६
रामशास्त्री २८, ९४
राजवाडे धातुकोश ८९
रुक्मिणी स्वयंवर ८८

ल

लोकमान्य दैनिक
लोकशक्ति २४
लोकशिक्षण ३३, ३४, ५९
लोकमित्र ३८

व

वसंत मासिक ४८
वसुंधरा २३
वर्दे ४२
वाडेकर प्रो. दे. द. ११, १२
वायुपुत्र २७
वाङ्मयोपासक मंडळ ८९
वरेरकर भा. वि. ९४
वनभोजन ९९

विज्ञानबोध ८२
विरलेले स्वप्न ७८
विरलेले वस्त्र ७६
विखुरलेले प्रेम ७५
विस्कटलेला संसार ४८
विसावा ६५
विश्ववाणी ३५
विहंगम ६५
विविध ज्ञा. विस्तार २९, ३३
विद्याविलास २६
विहार २४
विविधवृत्त २१
विद्यासेवक बी. ए. ८६
वाग्देश्वरी ३५
वाङ्मय ३६, ९५
वाग्विलास ३५, ४८
वैभव २५
वैनतेय २६
व्यापारी जगत २३
वृंदा ७२

## श

शेटे तु. पुं. ५४
शहाणे कु. मैना ८८
शब्दकोश ८९
शिंदे मा. कृ. ३६
शिंदे जनरल ११

## स

सरदेसाई प्रो. लक्ष्मणराव ६७
समाजस्वास्थ्य ३८
सह्याद्री ३३, ३४
सत्यवादी २६
सकाळ १६, १७
समाजक्रांती व हिंदुस्थान
सामाजिक सिमोल्लंघन ४८
सातवळेकर १३
सावरकर बॅ. २२, २९
सावरकर द. ग. १५
साहित्य आणि समाजजीवन ८६
साप्ताहिक सकाळ २[illegible]
सामंत र. ज. ३५
सागरसाहित्य ५५
साळगांवकर प्रो. ६१
सागराच्या लाटा ६४
सावकार नाटक ७०
सिनेमा २५
सिनेमा सृष्टी २५
स्त्री ३०, ३१
संगम ( संग्रह ) ६४
संगम कादंबरी ७४
संसार आणि धर्म साधन ८४
संजीवनी २७, ३०
[illegible]राक ५९

सुवर्ण २९
सिमोल्लंघन ४८
स्वच्छंद २४
स्वप्नरंजन ५९
साने ६१
सोमण ६४
सैरंध्री ७०
समईतील ज्योत ७०
स्मृतिचित्रें ७९
संगीत शास्त्रकार व कलावंताचा इतिहास ७९
संपूर्ण किर्लोस्कर ७१

ह

हरिहरयुद्ध ७०
हिमकालिका ६५
हिंदुसमाज दर्शन ८५
हंस ३८
हडप वि. वा. ५४
हृदयनिवाद ६६

क्ष

क्षितिजावर ६०

ज्ञ

ज्ञानप्रकाश १५,१६,२१,२९,६१
ज्ञानमंदिर ३६
ज्ञानप्रदीप १९

# साहित्य समालोचन

( सन १९३५ सालांतील मराठी वाङ्मयाचा आढावा )

गेली दोन वर्षे मराठी साहित्याचे समालोचन मी प्रसिद्ध केले व यंदाही सन १९३५ सालांतील कार्याचा आढावा 'प्रवासी' साप्ताहिकांतून घेण्याचे मी ठरविलें होतें, परंतु कांहीं अपरिहार्य कारणानें 'प्रवासी' साप्ताहिक बंद करावें लागल्यानें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहे. दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाचा थोडक्यांत जरी आढावा घेतला तरी तो बराच मार्गदर्शक होतो. आपण काय केले यांचें चित्र डोळ्यांपुढें उभे राहते व तेंच उद्‌बोधक होत असल्यानें अशा स्वतंत्र साहित्यसमालोचनाची आवश्यकता आहे. पहिल्या वर्षी म्हणजे सन १९३३ सालचे साहित्यसमालोचन 'निर्भीड' साप्ताहिकाच्या खास साहित्यसंमेलन अंकांत व दुसऱ्या वर्षी सन १९३४ सालचे समालोचन 'महाराष्ट्र शारदा' या मासिकाच्या पहिल्याच अंकांत प्रसिद्ध झालेले वाचून कांहीं लोकांनीं अनाहुत प्रशंसोद्गार काढले होते. त्यामुळें हें कार्य माझ्याकडून याही वर्षी व्हावे ही माझी उत्कट इच्छा होती. आणि म्हणून महाराष्ट्र प्रकाशन संस्थेतर्फे मी हें स्वतंत्र पुस्तकरूपानें सन १९३५ सालांतील साहित्याचे हें समालोचन प्रसिद्ध करीत आहे.

दरसालप्रमाणें मराठी भाषेत या सालीही बरीच पुस्तकें प्रसिद्ध झाली. अनेक संमेलनं भरली, कांहीं महत्त्वाचे आणि कांहीं क्षुल्लक

खरे पण मोठे वांद माजले, नवी मासिकें निघाली, कांहीं मासिकें बंद पडली, नवे लेखक उदयास आले व कांहीं मागें राहिले, कांहीं प्रश्न असें उभे राहिले कीं त्यांच्या भविष्याची आजच कल्पना करून देण्याची आवश्यकता वाटत आहे. काव्यें म्हणू नका, नाटकें म्हणू नका, कादंबऱ्या म्हणू नका, लघुकथा म्हणू नका सर्व कांहीं चीजा या सालीं बाजारांत आल्या. या सर्वांचे समालोचन क्रमाक्रमानें केले तर या सालच्या प्रगतीचा कल्पना 'जाणीका'स खात्रीनें होईल.

मराठी वाङ्मयाचा विचार करणारी व प्रातिनिधिक अशी जी महाराष्ट्र–साहित्य–परिषद तिच्यासंबंधींच प्रथम लिहितो. महाराष्ट्र साहित्यपरिषद हीच महाराष्ट्रातील प्रमुख व सर्वमान्य अशी संस्था आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. महाराष्ट्र साहित्य संमेलनें याच संस्थेच्या परवानगीनें भरत असतात. परंतु अद्यापही परिषदेच्या घटनेचें अज्ञान चांगल्या प्रबुद्ध लोकातही दिसून येते. मुंबई येथें भरलेल्या मुंबई साहित्य संमेलनांत परिषदेच्या घटने विरुद्ध डॉ. जोगळेकर यांच्यासारख्यांनी केलेला वावदूकपणा सोडला तरी सौ. शांताबाई कशाळकर यांच्यासारख्या विद्यावंत कार्यकर्त्या विदूषीनें परिषदेतील अनेक प्रमुख लोकांचा स्नेह असूनसुद्धां जोगळेकरांच्या सुरांत सूर मिळविला हा माझ्या विधानांस पोषक पुरावा होय. महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या मागें लक्षांत भरण्यासारखा कार्याचा संचय नसला तरी कालाचे वजन व बड्या लोकांचा शाब्दिक कां होईना पाठिंबा आहे. परिषदेची मुख्य कचेरी पुणें येथें गेल्यापासून परिषदेच्या तेजस्वी भविष्य काळाची कल्पनाही होऊं लागलेली दिसते. पण असे असतांही या परिषदेच्या सभासदांच्या यादींत चांगल्या चांगल्या व नामवंत लेखकांची नांवे आढळत नाहींत, ही कांहीं समाधानाची गोष्ट नव्हे. निरनिराळी मंडळें स्थापून स्वतांच्या कार्याची टिमकी

चाजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक लेखकांनीं वर्षाकाठीं परिषदेस तीन रुपये देण्यास मागेपुढें पहावें हें बरें नाहीं. ठिकठिकाणी संघ नसावेत असे माझें म्हणणेंच नाहीं. सर्व मराठी वाङ्मयाच्या हिताहिताचा विचार करणाऱ्या साहित्य परिषदेच्या वाढीचीं व तिला कार्यक्षम करण्याची जबाबदारी मराठी लेखकांवर व साहित्यप्रेमी लोकांवर नाहीं काय ? ज्यांना दरसाल रुपये तीन वर्गणीसाठीं परिषदेकडे पोचते करणेही कठीण आहे त्यांना मी दोष देत नाहीं. पण जे स्थानिक संघासाठीं कांहीं दाम खर्च करतात त्यानी प्रथम महाराष्ट्र साहित्य परिषद व मागाहून स्थानिक संघ इतकी आपुलकी परिषदेसंबंधीं बाळगली पाहिजे. परिषदेचे सभासद होण्यांत कमीपणा मानणाऱ्या विद्वांनानीं माझ्या म्हणण्याचा अवश्य विचार करून परिषदेपेक्षां स्वतांचेंच मोठेपण त्यांना अधिक वाटत असल्यास आपल्यामुळें परिषद मोठी होईल या भावनेनें तरी तेवढा मोठेपणा तिला लाभू देण्याचे पुण्य संपादण्याचा उदारपणा प्रकट करावा.

परिषदेची मुख्य कचेरी पुण्यास आल्यापासून परिषदेचे कार्य व्यवस्थित चालले असताही ती केवळ पुण्यास आहे म्हणून अनेकांच्या अंगांत भुत संचरलेले मधुनमधुन दिसून येते. पण असें नेहमींच चालणार. कांहीं लोकांना कोणत्याही गोष्टीविरुद्ध ओरड करण्यांतच भूषण वाटत असते. अशा भुतांच्या नाचानें भिऊन जाण्याचे किंवा त्यांच्या शब्दावर प्रतिशब्द उमटविण्याचे कारणच नाहीं. कार्य करीत राहणें हेंच त्यांना उत्तर असतें परिषदेचे चिटणीस प्रो. देविदास दत्तात्रय वाडेकर यानी या सालीं कांहीं आक्षेपांना जो उत्तर देण्याचा प्रयत्न केला त्यांत परिषदेच्या कार्या-संबंधीं त्याना वाटत असणारी तळमळ प्रतीत होत असली तरी उत्तरें देण्याच्या भानगडींत ते न गुंतते तर बरे झाले असतें. सांगलीचे श्री.

गोडबोले वकील व एक साहित्यिक श्री. कमतनूरकर यांच्या आक्षेपांत कांहीं अर्थच नव्हता. बडोद्याचे जोशीद्वय तर काय, 'पुणें' हा नुसता शब्द उग्दारला तरी कावरेबावरे होण्याइतकें पुणेकरांचा द्वेष करण्याचे बाबतींत पराकोटीस गेले आहेत. जनरल नानासाहेब शिंदे यानीं परिषदेच्या घटनेतील कांहीं नियमानुसार व्हावयाच्या कार्य पद्धतीस 'सासुरवास' हा शब्द वापरून तिरस्कार प्रदर्शित केला आहे. पण खुद्द ज. शिंदे किंवा असाच आक्षेप घेणारे लोक जर कार्यकारी मंडळांत निवडून येतील तर अनेक अडचणींची त्याना कल्पना होईल व मग जो सासुरवास भासला तो सासुरवास नसून प्रपंचातील ती एक शिस्त होय असें त्याना कबूल करावें लागेल. चिटणीस श्री. वाडेकर यानीं त्याना जे विस्तृत उत्तर दिले तें विनाकारणच होय असे मी पुन्हाही म्हणतो. परिषद पुण्यास गेल्यापासून तिचे काम सुरळीत तर चालूं झालेच, पण स्वतांच्या मालकीची जागा तिला लाभली ही या सालीं परिषदेच्या बाबतींत फार महत्वाची गोष्ट घडली आहे. आता लवकरच परिषद स्वतांच्या घरांत प्रवेश करील. स्वतांची जागा झाली म्हणजे मनुष्य जो समाधानाचा निश्वास टाकतो तो निश्वास अनेक वर्षांनीं टाकण्याचे भाग्य या सालीं परिषदेस लाभलें ! नियमागून जन्मास आलेल्या इतर भाषाभगिनींच्या प्रमुखसंस्था या पूर्वीच वंदाज झाल्या. एवढेंच नव्हे तर त्यांना प्रपंचविस्ताराचे वैभवही लाभले. आमचीच तेवढी महाराष्ट्र साहित्य परिषद अद्यापपर्यंत भाड्याचे जागेत नांदत होती. इतकेंच नव्हे, कित्येक दिवस भाड्याचे जागेत राहणेंही कठीण होऊन दुसऱ्याच्या मेहरबानीनें कोठेंतरी कानाकोपऱ्यांत कांहीं काळ तिला कंठावा लागला होता. परिषदेस स्वतांच्या मालकीची जागा व तीही पुण्यासारख्या शहरीं चांगल्या वस्तींत मिळाली याचे श्रेय श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनीधी यांना दिलें पाहिजे.

महाराष्ट्र साहित्य संमेलनें ही परिषदेच्या परवानगीनें भरत असतात हें मी वर सांगितलें आहे. पण परिषदेनें संमेलनाची जागा व अध्यक्ष ठरविण्याचे जे नियम आखले आहेत त्यासंबंधीं दरसाल नापसंती दाखविली जाते. या सालीं अध्यक्षांचे निवडणूकीचे बाबतींत अशी नापसंती बऱ्याच तीव्रतेनें प्रगट झाली. साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना बहाल करण्यांत आल्यानें अनेकांची निराशा झाली. कारण उघड आहे कीं श्रीमंत बाळासाहेबांना मराठी भाषेची कळकळ असली व परिस्थितीच्या अनुकूलतेमुळें लेखकांच्या तोंडावर कांहीं तुकडे सहज फेकणें त्यांना शक्य असले तरी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष निवडण्याइतकी त्यांची मान्यवर लेखक या दृष्टीनें योग्यता नाहीं. अध्यक्षाची निवड हें जर थोर साहित्यसेवेबद्दल आदर व्यक्त करण्याचें एक प्रमुख साधन मानलें तर श्रीमंत प्रतिनिधी या मानास सर्वथैव अपात्र होत यांत शंकाच नाहीं. पण मला वाटते कीं या सालीं संमेलनाचे अध्यक्षपद व्यवहाराकडे बघून दिले आहे आणि हें जर बरोबर असेल तर श्रीमंतांची निवड योग्य होती. आतां ती अधिक खरी करून दाखविण्याचें श्रीमंतांच्या हातीं आहे. त्यांनीं द्रव्यप्राप्तीची योजना सुचवून स्वताचा रु. ११११ चा आंकडाही जाहीर केला. मात्र स्वतांचा आंकडा जाहीर करणें म्हणजे अधिक जबाबदारींतून उपरणें झाडून मुक्त होणें असा त्याचा अर्थ न ठरो म्हणजे झाले ! या बाबतींत थोडासा खुलासा करतो. परिषदेच्या योगक्षेमेची तरतूद झाली म्हणजे परिषदेसंबंधींचे कार्य संपले असें होत नाहीं; तर ती चांगली संपन्न झाली पाहिजे. आणि ती संपन्न होण्याकडे वर्त आधिक दृष्टी ठेवणें म्हणजेच व्यवहाराकडे बघणें होय. जोपर्यंत सुसंपन्नता आली नाहीं तोंपर्यंत केवळ तत्वनिष्ठा उराशी बाळगून

वागले तरी यश कसें येणार ? संन्यासी झाला तरी त्याला जीवीत कर्तव्यें चुकतात कां ? तसेंच याही बाबतींत आहे; आणि या विचारानें संमेलनाचे अध्यक्षस्थान म्हणजे ग्रंथकर्तृत्वतेबद्दल आदर व्यक्त करण्याचें साधन असें तूर्त तरी मानू नये. याबाबतींत मला दुसरी एक बाजू मांडावयाची आहे. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी नामांकित साहित्यिक नाहींत; पण साहित्यसेवक आहेत. मी असें स्पष्ट विचारतो कीं साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद विद्वानांकरता आहे तसेंच तें अव्वलदर्जाच्या साहित्यसेवक आणि आश्रयदात्यांकरतां का नसावे ? श्रीमंत प्रतिनिधी हे उच्च अभिरुचीचे साहित्यसेवक व आश्रयदाते आहेत. त्यांना साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष निवडले यांत कांहीं चुकले नाहीं. मालक—मजूरांचें वादांत मजुरांचे जे स्थान तेंच विद्वान व साहित्यप्रेमी आश्रयदात्यांमधें साहित्यप्रेमी आश्रयदात्यांचे असलेच पाहिजे. साहित्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान केवळ विद्वानासाठींच आहे. विद्वान आणि साहित्यप्रेमी आश्रयदात्यांना तें लाभणार नाहीं असें म्हणणें हीहि एक प्रकारची बौद्धिक भांडवलशाही मनोवृत्तीच होय. असो, साहित्यपरिषदेची या सालांत झालेली प्रगती अभिनंदनीय आहे. आतां पुढील सालांत परिषद संपन्न झालेली दिसेल अशी आशा करूं या.

साहित्यपरिषदेनंतर नियतकालिकांचा विचार करूं. जागृती करण्याचे व अभिरुची वाढविण्याचे कार्य हें बऱ्याच अंशीं नियतकालिकांच्या हातीं असते. मराठींत नांव घेण्यासारखी ६—७ नियतकालिकें आहेत. नियतकालिकांत दैनिकांचा या कामीं बराच उपयोग होत असतो. विशिष्ट दृष्टीकोण हटकून बदलणें ही क्रिया करण्याचे सामर्थ्य दैनिकांत आहे. चालू सालीं दैनिकांत बरीच स्पर्धा वाढलेली दिसते. स्पर्धा ही अभिवृद्धीस पोषक होत असल्यानें भिण्याचें कारण नाहीं. चालू सालीं मुंबईत निघणारे ‘ नवशक्ती ’ हें दैनिक

बंद पडले. या दैनिकानें एक आणा किंमतवाल्या दैनिकास मागें खेचून मुंबईत तरी क्रांति केली. 'नवशक्ती' बंद झाल्यावर त्याची जागा 'लोकमान्य' या दैनिकानें पटकावली. श्री. दत्तात्रय गणेश सावरकर हे त्याचे संपादक व मालक आहेत. हें दैनिक श्री. सावरकर यांनीं कौशल्यानें चालविलें असल्यानें त्यांच्यासारख्या गरीब गृहस्थाला 'लोकमान्य' दैनिकास स्थैर्य आणतां येईल असा भरंवसा वाटत आहे. या दैनिकांत मजकुरांची मांडणी असावी तितकी पद्धतशीर होत नाहीं. ही उणीव भरून काढण्यास पाहिजे तितकी स्वस्थता चालकांना लाभलीच नसावी असें वाटते. संपादकीय धोरण शक्य तितका पुरस्कार करण्याचे असल्यानें या दैनिकामुळें अनेकांना उत्साहाचा लाभ होत असावा. होता होईल तों खोटी व गैरसमज होण्यासारखी बातमी अथवा मजकूर आपल्या दैनिकांत येऊं न देण्याची 'ज्ञानप्रकाश' प्रमाणें श्री. सावरकरही दक्षता बाळगीत असलेले दिसतात व 'नवाकाळ' सारखा निराळा कंपूपणा लोकमान्यांत दिसत नाहीं. बुद्धीभेद करण्याची व विरुद्ध पक्षासंबंधीं शक्य तितके खोटे लिहिण्याची कला 'लोकमान्यां'नें अद्याप कशी अवगत केली नाहीं? नाहीं तर 'नवाकाळ' पहा. विरुद्धपक्षासंबंधीं यांत प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर विश्वास किती ठेवावा हाच प्रश्न पडतो. मात्र 'नवाकाळ'चा रेखीवपणा वाखाणण्यासारखा आहे. त्याची छपाई व कागद चांगला असतो. 'नवाकाळ' दैनिकांत परराष्ट्रीय उलाढाल्यांवर प्रसिद्ध होणारे अग्रलेख इतर ठिकाणीं प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरापेक्षां अधिक सुसंगत व अभ्यासपूर्ण असतात. या सालीं या दैनिकांत ऐतिहासिक संशोधन कार्यावर जे अनेक लेख प्रसिद्ध झाले ते अत्यंत वाचनीय, मननीय आणि उद्‌बोधक होते. हे लेख भारत इतिहाससंशोधक मंडळानें स्वखर्चानें छापून काढावे. हे लेख श्री. नरहर रघुनाथ फाटक बी. ए. यांनीं

लिहिले आहेत असें मी 'प्रतिभें'त वाचले. मुंबईत निघणारे 'प्रभात' हे तिसरें दैनिक होय. हे तिसरे दैनिक म्हणजे 'आंकडा दैनिक' आहे. तरीपण या दैनिकाचें धोरण टिळक राजकारणाचा पुरस्कार करणारे असते. टिळक तत्वांचा पुरस्कार हेच दैनिक मुंबईत प्रामुख्यानें करीत आहे. व्यापार प्रथम व प्रपंच साधल्यास ह्या व्यवहारी धोरणावर या दैनिकाचा संसार चालला असल्यानें व ' शक्य तितके थोडक्यांत मिळवणे ' इकडे मालकांची दृष्टी असल्यानें या दैनिकाकडून अधिक उपयुक्ततेची अपेक्षाच करूं नये. मुंबईतील ' प्रभात ' इतकी गचाळ छपाई व गबाळ मजकूर दुसऱ्या कोणत्याही मराठी दैनिकांत सांपडत नाहीं. ' प्रभात ' चें प्रकाशन पुणे येथेही या साल अखेरअखेर सुरू झाले. मुंबई व पुणे या प्रमुख शहरीं प्रकाशन करणारे ' प्रभात ' हे दुसरे दैनिक होय. पुणे येथे ' प्रभात ' सुरू होण्यापूर्वीपासून ' ज्ञानप्रकाश ' ' सकाळ ' ' त्रिकाळ ' व ' तेज ' ही दैनिके व्यवस्थित चालली आहेत. ' ज्ञानप्रकाश ' तर महाराष्ट्राचे अत्यंत लोकप्रिय दैनिक होय. या दैनिकाबद्दल सुशिक्षित लोकांत तर फार आदर आहे. ज्ञानप्रकाशमधेंच आपल्या नवविचारांस, तक्रारींस किंवा चर्चेस स्थान मिळावे अशीच बहुतेकांची इच्छा असते. पद्धतशीर मांडणी. शुद्ध भावना, सहाय्यतत्परता, धिम्मेपणा या गुणांनीं ' ज्ञानप्रकाश ' नें आपले महत्व वाढविलें असून सर्वसंग्राहक वृत्तीमुळें ' ज्ञानप्रकाश ' कडून केवढी तरी समाजसेवा घडत आहे ! गेल्या सालप्रमाणेंच या सालीं राजकीय, सामाजिक व साहित्यविषयक कार्यास ' ज्ञानप्रकाश'नें जेवढी मदत केली तेवढी मदत मराठींतील सर्व दैनिकांकडून झाली नसेल. पुण्यांत निघणारे ' सकाळ ' हे दुसरे दैनिक होय. या दैनिकाकडून मुंबईतील दैनिकांपेक्षां चांगले कार्य होत आहे. लोकांच्या गरजा कोणत्या व त्या कशा पुरवून घ्याव्यात यासंबंधीं वेळोवेळीं मजकूर देण्याकडे

-या दैनिकाचा विशेष कल असतो. मात्र 'न्यूज सेन्स' जाणणारे डॉ. ना. भि. परूळेकर हेच काय ते एकुलते एक गृहस्थ महाराष्ट्रांत असल्यानें 'सकाळ' दैनिकाचा 'न्यूज सेन्स' कित्येक वेळा दुसऱ्या कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. विक्षिप्त प्रकारच्या बातम्या पुरविणारे 'सकाळ' हे मराठीतील पहिलें दैनिक होय! खुनशीपणा हा दोष 'नवाकाळ' दैनिकाकडून 'सकाळ' दैनिकानें पैदा केला असावा असें वाटतें. धोरणाच्या बाबतींत तर 'सकाळ' मध्यें सूत्रबद्धता चुकूनही सापडावयाची नाहीं. पैठणी मोलाची खरीं पण सतरा ठिकाणी डागळलेली असता ती जशी दिसावी तसे 'सकाळ दैनिक' आहे. धड धोरण नाहीं, एक पक्ष नाहीं, जबाबदारीची जाणीव नाही, बिनचूक बातम्या पुरविण्याकडे लक्ष देण्याची सवय नाहीं व बातमी चुकलेली कधीं लक्षांत आणून दिली तर ती सुधारण्या इतका दिलदारपणा नाहीं. इत्यादी अनेक दोष या दैनिकांत आहेत. ह्मणूनच मला वाटते कीं सुरवातीला या दैनिकाचे भोवती चांगल्या व नेणत्या लोकांचें कडे पडलेले दिसे तें आतां दिसत नाहींसे झाले आहे. पुण्यांत निघणारी दुसरी दैनिके 'तेज व 'त्रिकाळ.' सौ. शालिनीबाई तुळपुळे या बाईचा लेखनाश्रय लाभल्यामुळें 'तेज'ला मध्यंतरीं खपाच्या बाबतींत तजेला आलेला दिसला. श्री नारायण महाराज केडगांवकर यांच्या संबंधीं या दैनिकांत मजकूर येऊं लागल्यापासून तेजचे नांव ऐकूं येऊं लागले. कामिनी सौख्य हे जितके क्षणिक तितकीच कामिनीनें लाभणारी प्रसिद्धि क्षणिक असते. छिनाल नार कोणाचा तरी संसार सुखी करूं शकते काय? विस्कटलेल्या संसाराची टिपणेंटांचणें करून स्वतांची भूक भागविता येणार नाहीं असा माझा 'तेज' ला इषारा आहे. आणि असा इषारा देण्याचें कारण इतकेंच परांगनेच्या चंचल वृत्तीचा फायदा घेणें ही वृत्तीच हीन दर्जाची होय. दैनिकें असे करूं लागतील तर समाजाची अधोगती

काय दूर आहे ! मराठीचा वाचक वर्ग हलक्या मनाचा व ठिसूळ वाणीचा आहे हें नियतकालिकांनीं नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. 'त्रिकाळ' दैनिक तेज व प्रभात पेक्षां चांगले निघते.

अर्ध साप्ताहिकांत 'केसरी'चा मान व दर्जा पहिल्या प्रतीचा आहे. पण केसरीला अद्याप नव्या युगाची कल्पना झाली नाहीं असे दिसते. काळ पळापळानें पुढे जात आहे. वाचकांची कालची रुची आज दिसत नाहीं, कालचें रूप आज खुलत नाहीं व कालचा आकर्षकपणा आज जुन्यांत मोडला जातो. अशा स्थितींत 'केसरी' पत्र मात्र आपल्या जुन्याच आवडीनिवडी उराशी बाळगून आहे. याचमुळें लोकांच्या मनावरची केसरीची पक्कड क्षणाक्षणानें कमी होत असावी. संपादक जे बोलायला व लिहायला भीतात ते केसरीच्या वाचकांना पूर्वींच कळलेले असते. त्यामुळें ताजेपणा व आकर्षकत्व कसें येणार ? वस्तुतां केसरी साप्ताहिकाचा खप एव्हांना कमींत कमी ५० हजार तरी व्हावयास पाहिजे होता. पण खपाच्या बाबतींत 'केसरी' दिवसेंदिवस कमी होत असलेला दिसतो. केसरीची भाषा भारदस्त असते व लेखन रेखीव असते. पण हा गुण बऱ्याच वर्तमानपत्रांतून अलीकडे दिसत आहे. ज्ञानप्रकाश, त्रिकाळ, विविधवृत्त, महाराष्ट्र, उदय यांचें अग्रलेख उदाहरणें म्हणून सांगावयास हरकत नाहीं. द्विसाप्ताहिकाचें रूप दिल्यानंतर निरनिराळें विषय कांहीं दिवस पद्धतशीर देण्यांत आले. पण अलीकडे ती घडी पुन्हां विस्कटलेली दिसते. इतर वर्तमानपत्रांपेक्षां भरपूर, विविध व वाचनीय मजकूर केसरींत नसतो असे कोणीच म्हणत नाहीं. पण काय असेल तें असो केसरीबद्दल निदान सुधारलेल्या लोकांत तरी प्रेम राहिले नाहीं. दैनिकाची वाढ हे एक त्याला प्रमुख कारण आहे. वाचकांना आतां नुसत्या वाचनीय मजकुराची आवश्यकता नाहीं. तर हालचील जागवील

असें कांहींतरी त्यांना पाहिजे असते. केसरीने केलेली टीका वाचून फार वर्षापूर्वी श्री. सी. वाय. चिंतामणी रडल्याचे कोठेसे मी नुकतेंच वाचले; पण आज केसरीनें एकच काय पण वर्षभर कोणाच्या विरुद्ध कोरडे ओढले तरी कोणी रडणार तर नाहींच ढुंकूनसुद्धां बघणार नाहीं. कारण उघड आहे; पूवा केसरी पत्र हे सर्वांनाच प्रिय असें आणि आज त्याची आवड फक्त खेड्यांतच शिल्लक उरलेली दिसते. ज्याच्यावर टीका करावयाची त्याच्या समोवतालची परिस्थिती अशी बनली आहे कीं, 'केसरी'च्या बऱ्या वाईट टीकेचा परिणाम त्याच्यावर आणि त्याच्या समोवतालच्या परिस्थितीवर होणे बरेंच अशक्य दिसते. सिंह असला तरी तो सिंहाप्रमाणें वागला तरच त्याची कोणी किंमत ठेवणार! माझें हें म्हणणे मात्र एकतर्फी समजावे. कारण आजच्या स्थितींतही केसरी एवढा पसारा दुसऱ्या कोणत्याहि नियतकालिकाचा नाहीं आणि म्हणूनच लोक 'केसरी'ला वचकतात. केसरीच्या मताच्या अथवा आभिप्रायाच्या भीतीमुळें नव्हे तर त्याच्या खपामुळें लोक अद्यापही 'केसरी'स मान देत आहेत. केसरी पूर्वस्थितीवर येईल असे मला आज तरी वाटत नाहीं. श्री. न. चिं. केळकरांसारखे धोरणी, कालज्ञ, लेखनकुशल व राजकारणधुरंधर संचालक केसरीच्या मागें उभे आहेत ही गोष्ट खरी पण बाप कर्तबगार असला तरी वयांत आलेल्या मुलांपुढें त्याची मात्रा जशी चालत नाहीं व दिसत असूनही आंधळेपणानें आणि कळत असूनहि आजाणपणानें त्याला वागावे लागते तद्वत्च श्री. न. चिं. केळकर यांची आज स्थिती झाली आहे. संपादक वर्गांत आज ज्यांचा भरणा आहे त्यापैकीं बहुतेक लोक मागासलेल्या विचारांचे, ढोंगी, स्वार्थी व दुष्ट मनाचे आहेत ही गोष्ट मी अनेक उदाहरणें दाखवून सिद्ध करूं शकेन. 'केसरी' सारख्या संस्थेंत राहिल्यामुळें लोकसेवा

करतां येते या आकांक्षेमुळें नव्हे तर सुखासीन परिस्थिती लाभली या स्वार्थी विचारानें हे सहसंपादक खुशीत असतात. स्वतांचे हेवेदावे साधण्याचे व स्वतांचे इष्टमित्र यांना जवळ करण्याचे या संपादकमंडळाचे धोरण केसरीच्या अप्रियतेस बरेंच कारणीभूत झाले आहे. मनुष्य जो जो मोठा होत जातो तो तो त्याची दृष्टीही व्यापक होत असते; संस्थेचें असेच असले पाहिजे. आणि हे ज्यांना कळत नाहीं त्यांच्या हातीं संस्थेचीं सूत्रें गेली म्हणजे उतरती कळा सुरू होते. आजच पहा. केसरींत इतकी कृत्रिमता दिसते कीं केसरीचे अग्रलेख जवळ जवळ ओळी मोजून लिहिलेले असतात. तब्बल दोन कॉलम भरलें कीं केसरीचा अग्रलेख व एक कॉलम भरला कीं दुय्यम अग्रलेख पूर्ण होतोच. तो वाढतही नाहीं किंवा कमी भरत नाहीं. मग विषय कोणताही का असे ना ! सर्कशीतला सिंहही जरा आगेमागे फिरतो पळतो.पण हा वृत्तपत्रांतला केसरी यंत्राप्रमाणें बोलतो. स्पष्टच सांगतो, आजकाल केसरीच्या अग्रलेखांतून हृदय दिसत नाहीं नाहीं, पोट मात्र स्पष्ट दिसते. केसरीबद्दल आदर मोठा व अपेक्षाही मोठी म्हणून लोक टीका करीत असतात व मीही जरा कडक लिहिले. काळाला अंत नसला तरी पुण्याईला मात्र अंत आहे व एकाची पुण्याई ही दुसऱ्याची कमाई झाली तरी ती किती दिवस टिकणार ? दोन तात्या वगळले तर ' केसरी 'च्या संपादकमंडळांत बहुतेक शून्येंच भरलीं आहेत.

नागपूर येथें निघणारे ' महाराष्ट्र ' हे दुसरे प्रमुख अर्धसाप्ताहिक आहे. नागपूर वऱ्हाडकडे 'महाराष्ट्रा'चा सातसाडेसात हजारपर्यंत खप असल्याचे ऐकतो. टिळकांच्या राजकारणाचे हे वर्तमानपत्र अभिमानी आहे. या पत्रातून बहुतेक नियमितपणे प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तक परीक्षणानें साहित्यपुरस्कारास बरीच मदत होते. मात्र हा पुरस्कार कांहीं वेळा कंपूशाहीचा जोपासना करणारा असावा असें वाटते !

या साप्ताहिकांत त्या प्रांतांतील साहीत्यविषयक उलाढाली अलीकडे बऱ्याच प्रमाणांत प्रसिद्ध होऊं लागल्या आहेत. अमरावतीस निघणारे 'उदय' हे तिसरें अर्धसाप्ताहिक असून त्याचेंही धोरण टिळकपक्षीय आहे. या दोन्ही वर्तमानपत्रांकडून साहित्यविषयक जागृतीस चांगलाच पाठिंबा मिळतो. 'महाराष्ट्रा'नें जुनें वळण सोडून जरा नाविन्य दाखवावें अशी सूचना करणे अवाजवी होणार नाहीं. सुसंपन्नता लाभूनही 'महाराष्ट्रां'च्या रंगरूपांत व चालींत बदल होऊं नये यांचे कारण रहाणाऱ्या शिलकेंत तूट पडता कामा नये ह्या धोरणापलीकडे दुसरे कांहींच नसावे असा माझा तर्क आहे. आम्ही महाराष्ट्रीय लोक फायदा मिळवू लागलो म्हणजे तो जास्तीत जास्त वाढविण्याची इच्छा धरून व्यवहारशास्त्राकडे दुर्लक्ष करीत असतो. व्यवहारशास्त्र असें सांगते कीं फायदा टिकवायलाही खर्च आहे.

मौज हे आजचे सर्वांत जुनें व भरभराटीनें चाललेले मुंबईतील साप्ताहिक होय. या साप्ताहिकांत राजकारण नसते हे 'मौज' या नांवावरूनही कळण्यासारखे आहे. रंगभूमी व चित्रभूमी याविषयीं व इतर अशाच अनेक विषयासंबंधीं या साप्ताहिकांत बराच मजकुर येत असतो. विशषतां हें साप्ताहिक आटवड्याच्या व महिन्याच्या भविष्याबद्दल प्रसिद्ध आहे. किंबहुना मौज म्हणजे भविष्य असाच सर्वत्र समज आहे म्हणे ना ? केसरी सोडल्यास 'मौजे'चा खपाच्या बाबतींत पहिला नंबर लागतो. मौजेकडून साहित्यापयोगी किंवा प्रबोधक असे कांहीं कार्य घडत नाहीं. कदाचित त्याचे तें ध्येयच नसावे. त्याबाबतींत 'विविधवृत्त' या साप्ताहिकाचे महत्व अधिक आहे. 'प्रागतिक' पक्षाचा पुरस्कार या पत्राकडून प्रामुख्यानें होतो. या पक्षाचे मुखपत्र बनण्याची विविधवृत्ताची महत्वाकांक्षा आहे असे दिसते; पण 'ज्ञानप्रकाश' दैनिकामुळें हे अंतिम ध्येय या पत्राला खचित

गांठता येणार नाहीं. हिंदुमुसलमानांचा प्रश्न निघाला म्हणजे हें पत्र हिंदूंची न्याय बाजू अभिनिवेषानें मांडीत असते. यांत कांहीं कांहीं वेळीं महत्वाचे असे वाङ्मयविषयक लेख येत असतात. पण बहुधा कोणाला चांगले म्हणण्याची प्रवृत्ती एकंदरींत फारच कमी असल्यानें विघातक कार्य करण्याचा या पत्राचा लौकिक आजकाल दुसऱ्या कोणत्याही साप्ताहिकानें मिळविलेला नाहीं. अशाही पत्रांची जरुरी असतेंच कीं ! पण एवढे कोणासही कबूल करावे लागेल कीं या वर्तमान पत्राचा दर्जा मोठा आहे. 'साप्ताहिक सकाळ'चा कल वाङ्मयविषयाकडे अधिक असलेला दिसतो. थोड्याच दिवसांत या साप्ताहिकानें चांगल्यापैकीं कामगिरी केली आहे. साप्ताहिक सकाळचे खास अंक उत्कृष्ट नसले तरी बरेच उपयुक्त आहेत यांत शंका नाहीं. यंदा निघालेला साहित्य व शिक्षण खास अंक मात्र पूर्वीप्रमाणें निघाला नाहीं व अलीकडे तर मजकुर गोळा करण्यांत बरीच ढिलाई झालेली दिसते. प्रचलीत राजकारणासंबंधीं या साप्ताहिकांत विशेष असे कांहींच नसले तरी भरपूर मजकूर मात्र दर अंकांत असतो. या साप्ताहिकाचा खप विविधवृत्त, मौज व महाराष्ट्र यापेक्षां कमी नाहीं. त्रिकाळ साप्ताहिक मात्र पूर्वीसारखे नसते. 'निर्भिड' या साप्ताहिकाला राजकारणाचे वावडे आहे. या साप्ताहिकाचा महत्वाचा व अनुकरणीय गुण म्हणजे तें व्यक्तीविषयक टीकेपासून बरेंच अलिप्त असते. स्वतःचे स्वतःच विडंबन करून घेणारा संपादक निर्भिडकर्त्यांखेरीज महाराष्ट्रांत तरी अद्याप कोणी झालेला नाहीं. या साप्ताहिकांत प्रवासवर्णनपर जे दोन तीन लेख या खालीं प्रसिद्ध झाले ते चांगल्यापैकीं आहेत. विशेषतः सविस्तर 'रिपोर्ट' कसा व किती चुरचुरीत असावयास पाहिजे याची बरीचशी कल्पना या लेखावरून अभ्यासूंना होईल. बॅ. सावरकर यांचा

'सात वेड्या' हा एक उत्कृष्ट लेख या साप्ताहिकांत प्रसिद्ध झाला आहे. 'घराबाहेर' खास अकांत प्रि. प्रल्हाद केशव अत्रे यांचा विस्तृत ४६ कालमी लेख अत्यंत नमुनेदार आहे. त्या लेखाच्या पूर्वभाग पुन्हा पुन्हा वाचावाच वाटतो व तो एक लेखन-शैलीचाच नमुना होय. 'वसुंधरा' ह्या साप्ताहिकाचे संपादन श्री. सुदर भुजंगराव मानकर यांच्याकडे आल्यापासून या साप्ताहिकाचे अंतर्बाह्य रूप बदललें आहे. मराठी साप्ताहिकांत कॉलेजांतील रांगरग प्रसिद्ध करण्याचा उपक्रम प्रथम वसुंधरेनेंच सुरू केला व तो अद्यापपर्यंतही चालू आहे. पण या रागरंगांत भारदस्तपणा नसतो व त्यामुळें खेळाडू व चेष्टेखोर विद्यार्थ्यांच्या पलीकडे या मजकूराचे कोणी चहाते नसावेत. शिवाय गुरुजनांबद्दल कुचेष्टा यांत भरभूर असते. त्यामुळें नुसत्याच स्थानिक विद्यार्थ्यांत चालणाऱ्या बेशिस्त उद्गारांना सार्वजनीक स्वरूप मिळते. मला वाटते कीं चेष्टा असली तरी प्रेममुलक आणि आदरभावास धक्का न देईल अशी असावी. कॉलेजमध्यें एकमेकांविरुद्ध चालणारे विध्यार्थ्यांचे पोरकट खेळ प्रसिद्ध करण्यापासून कोणाचे हित होत असेल असें वाटत नाहीं. आणि याचमुळें कॉलेजातिल हालचाली देण्याचा उपक्रम अभिनंदनीय असला तरी त्याच्या पद्धति मात्र दूषणीय आहेत. श्री. मानकर हे एक बुद्धीमान तरुण संपादक असल्यानें थोडासा जर विचार करतील तर हे वैगुण्य चटकदारपणा कायम ठेऊनही नाहींसें करणें त्याना कठीण नाहीं. वसुंधरेकडून वाचकांची करमणूक होत असते. 'विहार' हे एक मुंबईतील साप्ताहिक असून त्यांतही मधुनमधुन चांगले लेख असतात. यंदा 'चित्रा' या नव्या व सुंदर साप्ताहिकाची भर पडली. चटकदार लेखनाबद्दल चित्राचे संपादक श्री. रांगणेकर हे प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें दुसरे संपादक श्री. काणेकर हें एक नवमतवादी लेखक असून त्यांच्या लिहीण्यांत निर्भिडपणा

व मुद्देसुद मांडणी हे दोन चांगले गुण आढळतात. ' चित्रा ' साप्ताहिकांत अनेक मनोरंजक लेख या सालीं प्रसिद्ध झाले. बालगंधर्वांवरील रंगपटसोडून चित्रपटांत काम केल्याबद्दल जो काल्पनिक फिर्यादीच्या सुनावणीसंबंधीं लेख प्रसिद्ध झाला तो खरोखरच उत्कृष्ट आहे. हा लेखही दुसऱ्या एका लेखन शैलीचा नमुना होय. ' चित्रा ' इतके आकर्षक बाह्यांग व नमुनेदार छपाई दुसऱ्या कोणत्याच साप्ताहिकाची नाहीं.

या सालीं पुण्यास ' लोकशक्ती ' हे द्विसाप्ताहिक सुरू झाले. प्रथम ते साप्ताहिक होते. यांचे संपादक श्री. जावडेकर हे विद्वान आहेत. पण लोकाभिरुची व लोकांची आकांक्षा यांचे वर्तमानपत्र चालविण्यास जें ज्ञान असावयास पाहिजे तें त्यांच्याजवळ दिसत नाहीं. त्यामुळें ह्या द्विसाप्ताहिकाला पाहिजे तितकाही लोकाश्रय मिळाला असेल असे वाटत नाहीं. निव्वळ विरुद्ध पक्षासंबंधीं गैरसमज पसरविणाऱ्या बातम्या व मजकूर लिहिण्यानें कोणी जगेल ही कल्पनाच चुकीची होय. ' केसरी 'शी बरोबरीनें टक्कर द्यावयाची महत्वाकांक्षा अभिनंदनीय नाहीं असे कोण म्हणेल ! पण आकांक्षा आणि सिद्धी यांत महदंतर असते. यांतील मजकूर भारदस्त भाषेंत लिहिलेला असतो. व शेतकरी आणि जमीनदार, मजूर आणि मालक, ग्रामसुधारणा इत्यादि विषयांवरील लेख वाचनीय असतात. मधूनमधून वाङ्मयविषयक लेखही प्रसिद्ध होतात. नागपूरकडे ' स्वछंद ' या नांवाचें एक साप्ताहिक सुरू झाले आहे. चटकदारपणा व स्पष्ट विचारसरणी हें स्वछंदाचे प्रमुख गुण होत. या साप्ताहिकाचा वाङ्मयाकडे बराच ओढा आहे. साहित्यप्रांतांतील व्यक्तींसंबंधीं यांतील मजकूर एकदांतरी दृष्टीखालून अवश्य घालावा. या साप्ताहिकांत अधिक गांभिर्य आणण्याचा प्रयत्न होईल आणि राजकारण विषयाला अधिक प्रामुख्य मिळेल तर 'स्वछंद' लोका-

दरास अधिक पात्र होईल. या पत्रावरून नागपूरकडील साहित्यिकांची भांडणें कळून येतात. ‘ प्रेक्षक ’ हे मुंबईंतील साप्ताहिक पूर्वी सिनेमा विषयाला अग्रस्थान देत असे. यावर्षी या साप्ताहिकानें अंतर्बाह्य आपले रूप बदलले असून त्यांत विविध मजकूर येत असतो. मुंबईत मात्र त्यामुळें सिनेमाविषयक माहिती देणारे एकही साप्ताहिक आतां शिल्लक राहिलें नाहीं. ‘ सिनेमा ’ नांवाचे एक साप्ताहिक रुटूखुटू चालले होते ते बंद पडले. ‘ वैभव ’ साप्ताहिकाचा अस्तोदयही ५–६ महिन्यांतच झाला. पुण्यास निघणारे ‘ किरण ’ आणि कोल्हापुरास निघणारी ‘ सिनेमा सृष्टी ’ हीच काय ती मराठींतील सिनेमाविषयक नियतकालिके होत. ‘किरण’ मध्यें प्रसिद्ध होणारे कांहीं लेख खचित चुरचुरीत असतात. गुजराथी व हिंदी भाषांतून प्रसिद्ध होणाऱ्या सिनेमाविषयक नियतकालिकांच्या मानानें मराठीत नियतकालिके मुळीच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. याच साली ‘प्रमोद’ या नांवाचे एक साप्ताहिक मुंबईंत प्रसिद्ध होऊ लागले. यांचे संपादक श्री. खंडेराव त्रिलोकेकर ह्यांची लिहीण्याची पद्धत बरीच आकर्षक आहे. या साप्ताहिकांतून बरेच वाचनीय लेख येत असतात. संपादक जरा सनातनी मताचे असले तरी नव्यामताचे ते द्वेष्टे नाहींत. या पत्राने यंदा ‘किर्लोस्कर—त्रिलोकेकर’ वाद काढला. त्याच्यासंबंधीं माहिती पुढें येईलच. विपुल मजकूर व चांगली छपाई यामुळें हें साप्ताहिक बरेंच खपते.

मराठींत जिल्हावार निघणाऱ्या साप्ताहिकांची मात्र अजून सुधारणा होत नाहीं. जिल्ह्यांतील हालचाली प्रमुखपणें देणें हे जिल्हापत्रांचे मुख्य ध्येय असावयास पाहिजे. आज आमची जिल्हापत्रें स्वतांला प्रमुख प्रांतिक पत्रें समजतात किंवा काय कळत नाहीं ! जिल्ह्यांतून चालणाऱ्या राजकारणाला कांहीं महत्व असते याची त्याना कल्पनाच नसावी. त्यामुळे असें होते कीं जिल्ह्यांतील लोकांकडून त्याना

फारसा आश्रय मिळत नाहीं. ग्रामसुधारणेचें जितकें महत्व आहे तितकेंच जिल्हापत्रसुधारणेचें आज महत्व आहे. जिल्हापत्रें जर सुधारतील तर लोकांतील चळवळ व उत्साह यापेक्षांहि वाढेल. सावंतवाडीचें 'वैतनय' रत्नागिरीचें 'बळवंत' धुळ्याचें 'प्रबोध' जळगांवचें 'प्रागतिक' अकोल्याचें 'मातृभूमी' सातारचें 'ऐक्य' आणि 'स्वधर्म' बेळगांवचें 'तरुणभारत' कोल्हापुरचें 'विद्याविलास' सांगलीचें 'दक्षिण महाराष्ट्र' पेणचें 'कुलाबासमाचार' इत्यादी साप्ताहिकें त्यांतल्या त्यांत बऱ्यापैकीं आहेत. त्यानीं विशेष मेहनत घेऊन अंक काढावयाचें ठरविल्यास कठीण जाणार नाहीं. आभिरुची उत्पन्न करण्यासाठीं दैनिकें ज्या तंत्राचें सहाय्य घेतात तीच तंत्रें जिल्हापत्रानीं आत्मसात केली पाहिजेत. 'सत्यवादी' 'ऐक्य' इत्यादी कांहीं पत्रांना जिल्हापत्रें अशी संभावना केल्यामुळें राग येण्याचा संभव आहे. 'सत्यवादी' पत्र तर दक्षिण महाराष्ट्राचें प्रमुख साप्ताहिक असेंच स्वतांला म्हणवीत असते. निरनिराळे खास अंक काढून या साप्ताहिकानें बरीच हालचाल यासालीं केली. पण या साप्ताहिकानें दक्षिण महाराष्ट्राचें प्रमुख साप्ताहिक होण्याइतकें कांहीं कार्य केलें आहे व त्यादृष्टीनें या साप्ताहिकांत विशेष कांहीं असते असें मला आढळलें नाहीं. संस्थानांत असल्यामुळें नको त्या गोष्टी करावया लागत असतील किंवा हव्या त्या गोष्टी करतांही येत नसतील असेंही असण्याचा संभव दिसतो. जिल्ह्यातील बातमीपत्रें सविस्तरपणें जिल्हापत्रांतून येतील तर दुसरे वर्तमानपत्र घेऊनसुद्धां या पत्रांचा खप आहे त्याच्या तिपट्टचौपट तरी वाढावयास हरकत पडूं नये. या गुणांच्या अभावामुळेंच दैनिकांतून मजकूर आणविण्याकडे जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचा ओढा असतो. तो थांबवता आला नाहीं तरी निदान स्वतांकडे पूर्णपणें आकर्षिता येईल. आमची जिल्हापत्रें सुधारतील तर चळवळ मग ती कोणत्याही प्रकारची असो. यापेक्षां अधिक संघटित

चालेल. खेड्यांच्या सुधारणेस जिल्हापत्रांचा आधिक उपयोग होणार आहे. वर नमूद केलेल्या साप्ताहिकाखेरीजही कांहीं साप्ताहिके चालू आहेत. कांहीं नवी निघाली व कांहीं बंदही पडली. निदान त्यांचे प्रकाशन लक्षांत भरण्यासारखे तरी नाहीं.

या साप्ताहिकानंतर ‘ पाक्षिकांकडे ’ वळल्यास मराठींत दर पंधरा दिवसांनीं प्रसिद्ध होणारीं अशी प्रमुख दोनच पाक्षिकें आहेत. एक संजीवनी आणि दुसरे प्रतिभा. ‘ संजीवनी ’ हे पाक्षिक महिला समाजाच्या उन्नतिसाठीं म्हणून निघत असते. या पाक्षिकाचे संपादक व मालक श्री. प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर बी. ए. हे विशेष मेहनत घेत असून या पाक्षिकास अद्याप जगण्यापुरताही आश्रय महाराष्ट्रांतील महिलासमाजानें देऊ नये याचें आश्चर्य वाटते. सुशिक्षित स्त्रिया कमालीचे औदासिन्य दाखवित आहेत हें तर खरेंच शिवाय आकर्षकतेचा अभाव हा या पाक्षिकाचा मोठाच दोष होय. निरनिराळीं पाक्षिके आणि मासिके गिऱ्हाइकांची मर्जी संपादन करण्यासाठीं मेहनत घेत असताना ‘ संजीवनी ’ चे रूप सन १८८० सालातील कोंकणदेवीप्रमाणें दिसते. नटण्यामुरडण्याचे बाबतींत पुरुषापेक्षां स्त्रिया आजकाल पुढें सरसावलेल्या आपण पहातो; मग स्त्रियांसाठीं म्हणून निघालेल्या संजीवनीनें तो गुण आत्मसात कां करूं नये ? कोल्हटकर यांची घस सोसून महिलासमाजाची सेवा करण्याची तळमळ वाखाणण्यासारखी असली तरी नुसती तळमळ यश देऊ शकत नाहीं असे व्यवहार बोलतो. ‘ संजीवनी ’ पाक्षिकांतील लेख महिलासमाजाविषयीं विविध माहिती देणारे असतात. शिवाय ‘ वायुपुत्र ’ या टोपण नांवाच्या लेखकाचा ‘ आकाशवाणी ’ या सदराखालीं प्रसिद्ध होणारा मजकूर मार्मिक तर खराच शिवाय गमतीदार असल्यानें वाङ्मयाचे दृष्टीनेंही त्या मजकुरास महत्व आहे. केवळ वर्तमानपत्रीं लिखाणापेक्षां ही ‘आका–

शवाणी ' कितीतरी वरच्या दर्जाची वाटते. 'संजीवनी' ची रहाणी जर अदयावत् होईल तरच तिच्याकडे कोणी पाहील अशी तिला माझी सूचना आहे. ' संजीवनी ' तून प्रसिद्ध होणाऱ्या काव्यांइतकी मधुर प्रणयगीतें दुसऱ्या कोणत्याच नियतकालिकांतून आढळत नाहींत आणि ती बहुतेक तरुणींनींच लिहिलेली असतात हा विशेष होय.

दुसरे ' प्रतिभा ' हें पाक्षिक साहित्यविषयक असून या विषयाचे तरी तें मराठातील प्रमुख नियतकालिक होय. या वर्षी या पाक्षिकानें केलेले कार्य गेल्या सालप्रमाणेंच महत्वाचे आहे. विशेषतां ' रामशास्त्री ' या टोपण नांवानें जो लेखक या मासिकांतून चर्चा करतो त्याची स्फुटें विद्वत्ताप्रचुर, मार्मिक, चिकित्सक, निर्भिड आणि निःपक्षपाती असतात. मात्र पुस्तकपरीक्षणांकडे या पाक्षिकानें अधिक लक्ष दिले पाहिजे. पुस्तकपरीक्षणांकडे न्यायनिष्ठुरपणें पहावयाचें ठरविल्यास प्रतिभेच्या संपादकांची प्रियता कमी होईल हे खरे असले तरी लेखकांच्या घुश्यांकडे बेपर्वाईनें बघण्याइतकें भाग्य त्यांना लाभलें आहे. त्यामुळें ग्रंथकारांच्या रागलोभाची त्यांनीं तरी पर्वा करूं नये. वाङ्मयांतील कांहीं साहित्यकांची टाळकी कंपूशाहीच्या कैफानें बिथरली असता प्रतिभेनें त्याना उतारा देण्याचे कार्य या वर्षी केलेच कीं नाहीं ? प्रतिभेतून या साली अनेक वाचनीय लेख प्रसिद्ध झाले आहेत. वर्षाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेली लेखक व लेख यांची यादी पाहिली म्हणजे प्रतिभेच्या कार्यांची कल्पना येईल. काव्याचे बाबतींत संपादक कठोर असावेत असें वाटते. मला स्वतःला मात्र हें धोरण पसंत आहे. ' विविधज्ञान विस्तार ' मासिकाचे कार्य पूर्वीप्रमाणें जोमानें नसले तरी चालू आहे ही समाधानाची गोष्ट होय. अनियमीतपणा हा दोष अद्यापीही नाहींसा झाला नाहीं. ' विविधज्ञानविस्तार ' हे

अव्वल दर्जाचे भारदस्त मासिक आहे. एक काळ असा होता की आपले लेख विस्तारातूनच प्रसिद्ध व्हावे असा विद्वानांचा आग्रह असे. अलिकडे तें प्रेम विद्वानांच्या मनांत राहिलें नाहीं. विशेषतः एका कंपूच्या हातीं या मासिकाची सूत्रें गेल्यामुळें तर इतरांना या मासिकापासून दूर रहावें असे वाटणें साहाजिकच होय.

श्री. नारायण रामचंद्र मोरे यांचीं 'नवजीवन' आणि 'सुवर्ण' हीं दोन मासिकें चालू सालीं घरंदाज झालीं असें म्हणावयास हरकत नाहीं. होतकरूं लेखकांस उत्तेजन देण्याचे कार्य या दोन्ही मासिकांकडून चांगले होते. या मासिकांतील कविता बऱ्याच चांगल्या असतात. होतकरूं लेखकांबरोबर नाणावलेल्या लेखकांचे लेखसुद्धां या मासिकांतून प्रसिद्ध होतात. किर्लोस्करांची मासिकें जितकी वाचली जातात तितकी दुसरी मासिकें वाचली जात नाहींत. 'किर्लोस्कर' मासिकानें खपाच्या बाबतींत मिळविलेले यश कितीतरी वाखाणण्यासारखे आहे. यांत प्रसिद्ध होणारे लेख व गोष्टी सर्वतोमुखीं होतात. प्रो. ना. सी. फडके या नामांकित लेखकाचे बरेंच लेख या मासिकांतूनच गेल्या सालीं प्रसिद्ध झाले आहेत. या मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या बहुतेक गोष्टी कलेच्या दृष्टीनें बऱ्याच हलक्या असल्या तरी अनेक लेखकांची प्रसिद्धीची भूक या मासिकाकडून भागविली जाते. सामाजिक अन्यायाविरुद्ध या मासिकांतून प्रसिद्ध होणारे लेख मात्र बहुतेक विवाहविषयक नीती पुरतेंच असतात. कोणाचे तरी चरित्र व प्रेमविषयक गोष्टींचा भरणा या मासिकांतून भरपुर असतो. डॉ. वासुदेवराव किर्लोस्करांनीं लिहिले आहेत तसे किंवा श्री. दिवेकर व बॅ. सावरकर यांनीं लिहिले आहेत तसे लेख आजच्यापेक्षा अधिक प्रमाणांत आले पाहिजेत. शिवाय 'किर्लोस्कर' मासिकातून तरी व्यापार व तद्-विषयक महत्वाकांक्षा वाढविण्याऱ्या वाङ्मयास अधिक स्थान द्यावे असी

बहुतेकांची अपेक्षा आहे. कोणत्या तरुणीनें कोणत्या तरुणावर कसे प्रेम करावे किंवा हृदयाची भूक भागविण्यासाठीं काय काय उपाय योजावेत या विषयापेक्षां औद्योगिक विषयाचे महत्व आजकाल अधिक आहे. किर्लोस्कर मासिक म्हणजे लैंगिक विषयाचे मासिक नाहीं. या विषयीं बरीच चर्चा पूर्वी झाली आहे पण कोणी काय करावें व कसें असावें हें प्रतोद घेऊन सांगण्याचा कोणाला अधिकार नाहीं तोपर्यंत अशा टीकांकडे लक्ष देण्याची अवश्यकतां टीका-विषयक व्यक्तीला कां भासावी? पण तें सोडून दिले तरी किर्लोस्कर कंपनीकडून आजकाल मराठी वाचकांची गोष्टी वाचण्याची आवड बरीच पुरविली जात आहे यांत शंका नाहीं. ‘ मनोहर ’ मासिक आणि ‘ किर्लोस्कर ’ मासिक यामध्यें पृष्ठांच्या संख्येपलीकडे फारसे अंतर नाहीं. स्त्री मासिकाविषयींही तसेंच म्हणावें लागते. ‘ स्त्री ’ हे महिलांसाठीं मासिक काढले; पण महिलांच्या गुणदोषांची चर्चा करणारे व त्याच्या सुधारणेस उपयोगी पडेल असे वाङ्मय या मासि-कांतून कितीसे प्रसिद्ध होते? ‘ स्त्री ’ पेक्षां मग ‘ संजीवनी ’ पाक्षिक अधिक बरे. शिवाय अलिकडे मला असें वाटूं लागले आहे कीं स्त्रियांसाठीं मासिके किंवा पाक्षिके काढणें हे स्त्रीसमाज मागस-लेला आहे याचा फायदा घेण्यासारखे होय. त्यांच्या नांवावर स्वतांचा व्यापार करण्यासारखें हें दिसतें. स्त्रियांसाठीं स्वतंत्र मासिक पाहिजे काय हे संपादकांनीं एकदा स्त्रियांनाच विचारून पहावें. सह-शिक्षणाच्या अभिमान्यांकडून तरी नियतकालिकांतील या सवत्या सुभ्याचा तिरस्कारच केला होईल. ‘ स्त्री ’ मासिकांत अनेक लेखिकांचे लेख प्रसिद्ध होतात पण त्या गोष्टी अगर लेख इतर दोन मासिकांतील गोष्टींहून कितीशा भिन्न स्वरूपाच्या अगर धोरणाच्या असतात? तात्पर्य ‘ स्त्री ’ हे स्त्रियांचे मासिक आहे ही केवळ दिशाभूल होय. स्वयंपाकांतील एक दोन जिन्नसांच्या कृतीची माहिती

दिली म्हणजे स्त्रीमासिक उपयुक्त झाले अशी संपादकांखेरीज कोणाची समजूत असेल असें दिसत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचे तर ' मनोहर ' ' स्त्री ' व ' किर्लोस्कर ' या मासिकांतून प्रसिद्ध होणारे साहित्य बहुतेक अशा स्वरूपाचे असते कीं ' किर्लोस्कर ' मासिकाचा मजकूर ' मनोहर ' मासिकाचा म्हणून छापला काय, ' मनोहर ' मासिकाचा मजकूर ' स्त्री ' मासिकाचा म्हणून छापला काय आणि ' स्त्री ' मासिकाचा मजकूर ' किर्लोस्कर ' मासिकाचा म्हणून छापला काय, ग्राहकांना कांहीं चुकले असे वाटणार नाहीं इतका या तिन्ही मासिकांत सारखेपणा आहे.

या तिन्ही मासिकांच्या मुखपृष्ठावर तीन रंगी चित्रे घालण्यांत येतात व मनोहर मासिकांत आधिक चित्र दर महिन्यांस देण्यांत येते. पण या मासिकांतून देण्यांत येणारी तीनरंगीं चित्रे ही चित्रकलेची निवळ थट्टा होय असा स्पष्ट अभिप्राय एका प्रख्यात चित्रकारानें दिला आहे. दरमहा तीन वेळा तीन रंगात होत असलेले चित्रकलेचे हे विडंबन संपादक थांबवतील तर चित्रकलेवर त्यांचे खचित उपकार होणार आहेत. या तीन मासिकांपैकीं किर्लोस्कर मासिकातून उपासनीबुवाविरूद्ध आलेल्या लेखानें या सालीं समाजांत बरीच खळबळ उडाली. लघुकथांचे बाबतींत जे स्पष्ट उद्गार वर नोंदले ते केवळ ' किर्लोस्कर ' मासिकांपुरतेच आहेत असें नव्हें तर बहुतेक सर्वत्रच तसा प्रकार दिसून येतो.

श्री. सातवळेकर यांचे 'पुरुषार्थ' मासिक एका विशिष्ट धोरणानें आपले कार्य करीत आहे. त्याचे धार्मिक कार्य कांहीं कमी महत्वाचे नव्हे ! पण ' पुरुषार्थ ' हें केवळ पेन्शरांचे मासिक होऊन बसले आहे असें कां याचा संपादकानीं अवश्य विचार करावा. 'यशवंत' मासिक यापुढें पूर्ववत निघेल अशी आशा वाटू लागली आहे. या मासिकाचे जे अंक निघाले ते पूर्वीपेक्षां पृष्ठसंखेने मोठे आहेत.

आजच्या लघुकथा वाङ्मयाच्या जोरांत प्रसार करण्यास प्रथम ' यशवंत ' मासिकानेंच सुरवात केली. व्यवहाराचा अडचणी आडव्या आल्या नसल्या तर या मासिकाचा प्रसार आजही कितीतरी झालेला दिसता. नुकत्याच निघालेल्या ' यशवंत ' मासिकाचे अंकांत श्री. शामराव ओक यानी लिहिलेला प्रवासवर्णन एक नमुनेदार लेख आहे व शक्य असेल त्याने तो अवश्य वाचावा. प्रवासवर्णन लिहिण्याची ही पद्धत अभिनंदनीय होय. याच अंकातील श्री. सोपानदेव चौधरी यांच्या ' काव्य केतकी ' या पुस्तकावरील टीका निर्भिड आहे. स्पष्ट परीक्षण केल्याबद्दल लेखकाची स्तुति केली पाहिजे. पण या परीक्षणांत व्यक्तीविषयक निंदेचा जो दुर्गंध येतो तो लेखकानें टाळावयास पाहिजे होता. चार आणे माला आणि आठ आणे माला यांचे प्रकाशनही अद्याप व्यवस्थित होत नाहीं.

एकीकडे असतांही नागपूर येथें निघणाऱ्या ' उद्यम ' या मासिकाची जेवढी स्तुति करावी तितकी थोडीच होय. निदान आजच्या काळांत तरी असें म्हटलें पाहिजे. औद्योगिक विषयाला वाहिलेले ' उद्यम ' हेच एक महत्वाचे असे मासिक आहे. या मासिकानें आपले प्रकाशन व्यवस्थित चालू ठेऊन इतरांना उत्कृष्ट उदाहरण घातले आहे. महाराष्ट्रीय लोकांचे दिवसेंदिवस व्यापाराकडे लक्ष जात असल्यानें अशा मासिकांची त्यांना जरूरी आहे. श्री. का. म. ताम्हणकर यांचे 'प्राविण्य' मासिक या वर्षी जरा मागें आलेले दिसते. या मासिकातही औद्योगिक विषयासंबंधी बराच मजकूर येत असतो. रावसाहेब नारायण गोविंद चापेकर यांचा सावकार व कुळें यासंबंधीचा लेख वाचनीय आहे. त्याचप्रमाणें एका लेखकाने 'आदर्श खेड्या'ची मांडलेली कल्पनाही चटकदार आहे. इतर विषयांचा परामर्ष घेण्याचे धोरण संपादकांनीं सोडून स्वतांला मर्यादा घालून घेतली तर यापेक्षांही अधिक वाचनीय मजकूर ' प्राविण्या '

ला देतां येईल. श्री. ताम्हणकर यांना ‘ बाजारा ’ चें ज्ञान बरेंच आहे असें म्हणतात. त्याचा फायदा त्यांनीं ‘ प्राविण्या’ स देण्याचा निश्चय करून पहावा. ‘भोळा शेतकरी ’ हे मासिक अगदीं अव्यवस्थित कां होईना चालू आहे. या मासिकाच्या कमालीच्या अव्यवस्थितपणाकडे दुर्लक्ष देण्याचे कारण इतकेंच कीं त्यांतील विषय असें असतात कीं या मासिकास अर्धपोटीं जगण्या इतकेही ग्राहक मिळणें मुष्कीलीचे होय. या मासिकांत सहकारी पतपेढ्यांसंबंधीं व शेतकरी आणि सावकार यांच्या विषयींच मजकूर प्रसिद्ध होत असतो. मराठींत केवळ असा मजकूर देणारे हेंच मासिक माझ्या वाचण्यांत येत असते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या व्यापाऱ्यांच्या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी ‘ मासिक पत्रिका ’ चांगली निघत असते. यांतील व्यापारविषयक लेख व्यापाऱ्यांना मार्गदर्शक होत असतात असा व्यापारी लोकांचा अभिप्राय आहे. ‘ व्यापारी जगत् ’ या नांवाचें एक मासिक पुणें येथें सुरुं झाले.

जग बदलेले पण ‘चित्रमयजगत्’ मात्र अद्याप आहे तसेच आहे. या मासिकांत भरपूर वाचनीय मजकूर आणि तोही विविधरूपाचा असतो. माई वरेकर या कुमारिकेनें चालविलेलें ‘महिला’ मासिक यासाली बरेंच अनियमित निघू लागले. या मासिकानें कोणतेच उपयुक्त कार्य आतांपर्यंत केले नाहीं. यासाली कांहीं नवी मासिके निघाली त्यापैकीं ‘सह्याद्री’ या मासिकाचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. ‘ सह्याद्री ’नें जुन्या ‘ रत्नाकर ’ मासिकासही मागें टाकलें आहे. यांत प्रसिद्ध होणारे विविध लेख जितके अभ्यासपूर्वक लिहिलेले उद्बोधक असतात तितके ते ‘ लोकशिक्षण ’ आणि ‘ विविधज्ञानविसार ’ या मासिकाखेरीज क्वचितच आढळतील. खरें म्हणावयाचे तर सह्याद्रीचे महत्व वाङ्मयविषयक लेखांचे दृष्टीनेंही ‘प्रतिभे’पेक्षां अधिक आहे. सुंदर छपाई, पद्धतशीर मांडणी व प्रसंगोपात

विषयांची निवड हे आणखी इतरत्र न दिसणारे तीन गुण 'सह्या- द्री'त आहेत. 'सह्याद्री'नें नमुनेदार मासिकाची मराठींतील उणीव भरून काढली आहे. 'मॉडर्न रेव्हू' या मासिकाच्या अगदीं तोडीचे हे मासिक आहे यांत शंकाच नाहीं. उणीव असलीच तर एका तरुणीनें दोन तरुणावर एकाच वेळीं प्रेम करावे किंवा नाहीं अशांसारख्या आजकाल सर्वत्र बोकाळलेल्या विषयाचींच असेल! वाचकवर्गानें या मासिकास चांगलाच आश्रय दिला आहे. पहिल्याच वर्षांत चार पांच हजार वर्गणीदार मिळणारे ' सह्याद्री ' हेंच मराठींतील पहिले मासिक होय. या मासिकाचे संचालकत्व श्री. न. चिं. केळकर यांच्या- सारख्या साहित्यसम्राटाकडे असल्यानें व 'केसरी' सारखी संपन्न संस्था मागें असल्यानें ' सह्याद्री ' मासिक इतके नमुनेंदार निघाले नसते तरच आश्चर्य ! मात्र श्री. न चिं. केळकर यांनी ' संपादक ' या शब्दाचें ' सह्याद्री 'चे संचालक होऊन विडंबन केले आहे. ' लोक- शिक्षण ' या एका नामवंत मासिकाचे कांहीं अंक यासालीं प्रसिद्ध झाले. हे मासिक लिमिटेड कंपनीतर्फे प्रसिद्ध होत असते. भारदस्त विषयामुळें या मासिकास कितीसे ग्राहक लाभतील याची मात्र शंका वाटते. ' विविधज्ञानविस्तार ' ' सह्याद्री ' आणि 'प्रतिभा' ह्या तीन नियतकालिकांपुढें ' लोकशिक्षणा'चा प्रकाश लोकाना दिसेल असें वाटत नाहीं. तोटा सोसण्याची कंपनीची जों- पर्यंत हिंमत असेल तोंपर्यंत हें मासिक निघेल. मासिकाचा प्रसार फारच कमी असल्यामुळें अशा मासिकांतून चांगले लेख प्रसिद्ध करणें म्हणजे एक प्रकारें कालाचा व बुद्धीचा अपव्ययच होय. ह्या मासिकांत शेवटीं परराष्ट्रीय राजकारणाची जी माहिती येते ती अनुकरणीय आहे. आमचे लेखक, संपादक व वाचक यांना परराष्ट्रीय राजकारणाचे मासिकापुरते तरी महत्व वाटत नसावें असे दिसते.

मुंबईचे सुप्रसिद्ध प्रकाशक दामोदर सांवळाराम आणि मंडळी यांनीं 'ज्ञानमंदीर' मासिक सुरू केलें. थोडक्या किंमतींत भरपूर मजकूर देणारें हें मासिक आहे. संपादकांचा ओढा राजाश्रय मिळविण्याकडे असतो; पण व्यवहारापुरते या धोरणाकडे दुर्लक्ष केलें तरी किंमतीच्या मानानें यांतील मजकूर फार असतो. या मासिकाचा खप सहा सात हजारपर्यंत आहे असें म्हणतात. यांत विविधविषय येत असतात पण एकंदर स्वरूप असमाधानकारक आहे. 'महाराष्ट्र शारदा' मासिक ठीक चालले आहे. पणजी येथें 'कला' या नांवाचें एक मासिक या सालीं निघालें. आटोपशीर आकार व गोड छपाई यामुळें याचा अंक डोळ्यांत भरतो. लेखही छोटेसे आणि चांगले असतात. आतांपर्यंत या मासिकाचे आठ अंक प्रसिद्ध झाले आहेत. 'कलादर्श' हें जळगांवचें मासिक बंदच झालें. 'वाग्विलास' या नांवाचें एक मासिक मुंबईस सुरू झालें होतें तेंहि बंदच पडलेलें दिसतें. 'पारिजात' या नांवाचें एक चांगल्यांपैकीं मासिक यासाला बंद झालें. ह्या मासिकाकडून चांगलें कार्य होईल अशी माझी अपेक्षा होती. मासिक बंद करण्याची कारणें या मासिकाच्या चालकांनीं हिशेबासुद्धां प्रसिद्ध केली तर इतरांना त्यापासून बोध घेतां येईल. या मासिकाचे संपादक श्री. सामंत हे लेखक आहेत त्यांनीं याचा विचार करावा. उमरावतीस गेल्यासालीं निघालेल्या 'विकास' या मासिकाचीहि तीच रड. मागच्या समालोचनांत मी असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, हें मासिक नागपूरकडे निघालेल्या मासिकाचीहि बरोबरी करूं शकणार नाहीं व बरोबरीची भाषा मागेच पडून मासिकच बंद झालें. वस्तुतः असें व्हावयास नको होतें. 'विहंगम' हें श्री. पाठकांचें मासिक पहिल्यासारखे राहिले नाहीं. पाठकांच्या संकल्पाप्रमाणें खरोखरच दहा हजार रुपये संपलें काय ? 'विश्ववाणी'नें दुसरा घरोबा केल्यापासून तिचें सुरळींत चाललें आहे. 'वागेश्वरी'

मासिक बंदच पडलें असावें.'नवमत'या नांवाचें एक मासिक श्री.मा. कृ. शिंदे यांनीं मुंबईस सुरू केलें व त्याचें या सालांत तीन अंक प्रसिद्ध झाले. मासिक नियमित निघेल तर 'नवमताला' चांगला आश्रय मिळेल असें वाटतें. मात्र पहिल्याच अंकाच्या मुखपृष्ठावर घाणेरडें चित्र छापून द्वाड अभिरुचीचा आरोप श्री. शिंदे यांनीं स्वतःवर निष्कारण ओढवून घेतला ! त्यांच्या लेखणींत चुरचुरीतपणा असतो. वाचन आणि मनन करण्याची जर ते सवय लावून घेतील तर या गुणाचा कांहीं प्रकाश पडेल. 'नाटक' या नांवाचें एक मासिक श्री. निफाडकर यांनीं नाशिक येथें सुरू केलें पण या मासिकाचें स्वरूप व आजची परिस्थिति विचारांत घेतां हें मासिक फार दिवस चालणें शक्यच नव्हतें. 'वाङ्मय' या नांवाचें कांहीं वर्षे चाललेलें मासिकहि निधन नाहींसें झालें आहे.

'तत्वज्ञान मंदिर' 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' वगैरे कांहीं त्रैमासिके प्रसिद्ध होतात. 'साहित्य पत्रिका' महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र होय. पैसे आहेत पण वक्तशीरपणा कसा तो या पत्रिकेला नाहींच. भारतइतिहाससंशोधक मंडळाचे त्रैमासिक, शिवाय धुळ्यास निघणारे राजवाडे संशोधन मंडळाचे नियतकालिक आणि रामदास-रामदासी हे मासिक पूर्वीप्रमाणें ठराविक पद्धतीनें निघत आहे. जातिविषयक मासिके, पाक्षिके व त्रैमासिकेंही कांहीं कमी नाहींत. 'प्रभुप्रभात' हे अशा मासिकांत एक बरेंच चांगल्या पैकीं निघणारे मासिक आहे. जातिविषयक विविध माहिती व चळवळी यांची हकीगत नियममीतपणें देण्याकडे ह्या मासिकाचे प्रथम लक्ष असते. तेंच 'प्रभुतरुण' हें पाक्षिक पहा. दोन्ही नियतकालिके एकाच समाजाचीं पण दोघांच्या धोरणांत व उपयुक्ततेच्याहि दृष्टीनें जमीन अस्मानचे अंतर ! प्रि. खाड्ये यांच्या संचालकत्वाखालीं यंदा 'आदर्शवैश्य' या नांवाचे एक मासिक सुरू झाले. यांत

महाभारतावर प्रि. खाड्ये यांनी एक लेखमाला सुरू केली आहे. ही लेखमाला विद्वत्ता, उपयुक्तता व चिकित्सा या दृष्टीनें किती योग्यतेची आहे हें ती पुरी झाल्याखेरीज सांगता येणार नाहीं. पण अशी लेखमाला प्रसिद्ध करण्याचे ' आदर्शवैश्य ' मासिक हें मात्र स्थान नव्हे. ' आदर्शवैश्य ' हे जातिविषक माहिती देण्याकरतां निघालेलें समाजाचे मासिक होय आणि त्यांत येणारे लेख मासिकाच्या ध्येयाला साजेल असेच असले पाहिजेत.

स्वतंत्रपणे नमुद करण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रो. काळे या प्रसिद्ध महाराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञांनीं चालू सालीं ' अर्थ ' या नांवाचे साप्ताहिक सुरू केले. आपल्याकडे बहुतेक ठिकाणी असें दिसून येतें की ज्याचा जो विषय नसतो त्या विषयाची देवघेव व चर्चा करण्याची आमच्यांत फार दुष्ट खोड आहे. सिनेमाशास्त्राचे ज्याला ज्ञान नाहीं तो सिनेमाविषयक मासिक काढतो, ज्याला दोन ओळीसुद्धां लिहितां येत नाहींत तो संपादक बनतो, राजकारणाचे ज्याचे वाचन नाहीं तो राजकारणाचे साप्ताहिक सुरू करतो व ज्याला नार्सिंग किंवा वैद्यकी यांची थोडीसुद्धां माहिती नसते तो प्रसूतिशास्त्र व स्त्रियांचे रोग यांची माहिती देणारे मासिक काढतो.'जननी' या नांवाचे निघणारे पुण्याचेच मासिक पहा. त्यामुळें होते काय, संपादकांना दुसऱ्याचे पाय धरावे लागतात व वेळीं मिळेल तो मजकूर छापावा लागतो ! अशी बहुतेक ठिकाणी स्थिति दिसून येत असल्यानें योग्य माणसानें स्वतांला कळणाऱ्या विषयाचें साप्ताहिक सुरूं करणें ही आपल्याकडे क्वचितच घडणारी गोष्ट पुण्यास घडून आली म्हणूनच ' अर्थ ' हें साप्ताहिक प्रो. काळे यांनीं सुरू केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

' मन्वन्तर ' या नांवाचे एक आणा मालेच्या धर्तीवर मासिक पुणे येथें हनुमान प्रिंटींग प्रेसनें सुरूं केले आहे. नियतपणा

या मासिकानें राखल्यमुळें व मजकूरही विविध असल्यामुळें मासिकाचा खप आहे ह्यापेक्षां वाढेल अशी कल्पना आहे. पण मजकूर मात्र अधिक वाचनीय देण्याची सोय चालक करतील तर बरें होईल. ‘ ध्रुव ’ या नांवाचें एक मासिक चित्रशाळाप्रेसनें या सालीं सुरूं केले. हें मासिक बरेंच वाचनीय असते. किर्लोस्करांच्या ‘मनोहर’ मासिकापेक्षां या मासिकांत अधिक वाचनीय मजकूर असतो. साहित्यकांचा परिचय या सदराखालीं येणाऱ्या मजकूराचा प्रमुखपणें उल्लेख केला पाहिजे. विशिष्ट विषयक नियत कालिकेंही नियत असतात. त्यांत मुंबईचे प्रख्यात वैद्य आप्पाशास्त्री साठे यांचे मासिक चांगले चालले आहे. शिवाय ‘ समाजस्वास्थ्य ’ ‘ भविष्य भास्कर ’ ‘ भविष्य ’ ‘ भारतीय संगीत ’ ‘ व्यायाम ’ इत्यादि नियतकालिके आहेतच. खानापुरचे ‘ लोकमित्र ’ जळगांवचें ‘ काव्यरत्नावली ’ मासिक इत्यादि जुनी किंवा भुसावळचे ‘ पूर्णेंदु ’ यांच्यासारखी शेंडा बुडखा नसलेली मासिकें नियत असतात. या खेरीज आणखी कांहीं मासिकें सुरूं झाली व पूर्वींची कांहीं बंद पडली. या मासिकाबद्दल लिहिण्यासारखे असें कांहीं विशेष नाहीं. कांहीं शाळांची व कॉलेजांची त्रैमासिके व षण्मासिके आपआपल्या रीतीप्रमाणें आपल्यापुरते कार्य करीत आहेतच.

जातिविषयक, विविधविषयक, विशिष्टविषयक, प्रांतीक व जिल्हानिहाय असे अनेक भेद नियतकालिकांत आहेत. विशिष्ट मत प्रतिपादन करणाऱ्या नियतकालिकांत साताऱ्चे ‘ हंस ’ आणि पुण्याचे ‘ भाला ’ इत्यादि पत्रांचा समावेश होतो. पैकीं ‘ भाला ’ प्रसिद्ध होणें हे त्याच्या चालकांच्या फुरसतीवर अवलंबून आहे. पत्राचे प्रसिद्धकरण चालकांच्या फुरसतीवर अवलंबून रहातें ही गोष्ट बहुधा मराठींतच पचली जात असावी. एका चालकानें तर आपण नागपूर कलकत्याकडे जात असल्यामुळें पुढील अंक बंद ठेवला

आहे असे धडधडीत जाहीर केले ! सांगावयाचा हेतू इतकाच कीं, यावरून आमच्याकडील नियतकालिकांचे चालकसंपादक आपल्यावरील जबाबदारीची काय किंमत ठेवतात हें दिसून येत नाहीं काय ? एक दुसऱ्याची नक्कल करूं पाहतो. पण त्या नकलेबरोबर स्वतांचे असे कांहीं असेल तर ती नक्कल टिकते. उसनवारी तर आमच्या वाङ्मयांत भरपूर बोकाळली आहे. 'ज्ञानप्रकाश'मध्यें संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या इतर दैनिकें उघडउघड उद्धृत करतात. स्वतांचे श्रम व पैसा खर्च करण्याकडे आमची मनोवृत्तीच दिसत नाहीं. श्रम आणि पैसा यांच्या अभावीं चोरी करण्यास प्रवृत्त झालेला माणूस आणि बातम्या छापणारा संपादक एका दृष्टीनें दोघेही सारखच होत. निदान उसवारीबद्दल नामनिर्देश करण्याइतकीहीं कृतज्ञता हे लोक दाखवीत नाहीं याचे आश्चर्य वाटते ! आमची दैनिके पूर्वीपेक्षां चांगली चालतात हे खरे असले तरी त्यापैकीं बहुतेक वरीच मागासलेली आहेत. पण घडत आहे तेंही विशेष होय असे मी मानतो. स्पर्धा असावी पण दुसऱ्याला मारण्यासाठीं असूं नये आणि स्पर्धा करावी ती दुसऱ्याचे उणे काढण्यासाठीं करूं नये. दैनिकें काय, मासिकें काय किंवा साप्ताहिके काय यानी हे लक्षांत ठेवावें कीं दुसऱ्यात नाहीं ते आपल्यात कांहीं विशिष्ट आहे असे त्याना सांगतां आले पाहिजे. वाङ्मयाचेच काय पण सर्वच बाबतींत राष्ट्राची उन्नत्ति व्हावयास नियतकालिके हेंच मोठे साधन होय. भविष्यकाळाची दोरी नियतकालिकें चालविणाऱ्या लोकांच्या हातांत आहे. ही जबाबदारी आमचे संपादक जर ओळखतील तर सोन्याहून पिवळें होईल.

नियतकालिकांची वाङ्मयाच्या वाढीस जशी प्रत्यक्ष मदत होते तशीच सम्मेलनांची मदत होत असते. गेल्या तीनचार वर्षांत प्रांतिक सम्मेलनें भरूं लागलीं आहेत. पण शिस्त आणि नियमीतपणा

यांचा अभाव अद्याप दिसून येतो. यंदा प्रांतिक अशीं तीनच प्रमुख सम्मेलनें झालीं. एक मडगांव येथें भरलेलें गोवे प्रांतिक साहित्यसम्मेलन, दुसरें पुणें येथील शारदा मंदिरातर्फे भरलेलें सम्मेलन व तिसरें दादर येथें भरलेलें मुंबई साहित्य सम्मेलन. याबाबतीत विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट अशी कीं या तिन्ही सम्मेलनांचे अध्यक्षपद श्री. वि. स. खांडेकर यांनाच लाभले. मडगांव येथील अध्यक्षीय स्थानावरून त्यानीं जें भाषण केलें तें इतर ठिकाणच्या अध्यक्षीय भाषणापेक्षां अधिक उद्‌बोधक, विचारपरिप्लुत आणि चटकदार झालें. पुणें येथील भाषणासंबंधीं प्रतिभेंत जी टीका आली ती कोण चुकीची म्हणेल ! मडगांव येथील भाषणाची कांहीं पानेच पुणें येथें त्यांनीं वाचून दाखविली असा आक्षेप अगदींच उपेक्षणीय नाहीं. कला व जीवन आणि कला व नीती या संबधीं त्यांची अनिश्चित मनोवृत्ती मुंबई येथील भाषणांत बरीच स्थिरावली. अध्यक्षीय भाषण म्हणजे एक उत्कृष्ट निबंध वाचणें असाच समज रूढ झालेला दिसतो. त्यामुळें श्री. खांडेकर यांनीं आपल्या तिन्ही भाषणांत आंग्ल व रशियन लेखकांचा उद्धार केला आहे. आपल्या समोर बसलेले श्रोते हे विद्वान व बहुश्रुत आहेत असें समजून हा उद्धार योग्यच ठरेल, पण दुर्दैवानें तशी वस्तुस्थिती नाहीं. त्यामुळें असलीं भाषणें चार विद्वानांना पसंती पडतात; बहुजन समाजास ती बऱ्याच प्रमाणांत कळतहि नसावीत. बरें विद्वानांना तरी मान्य होतील असें म्हणावें तर तेंहि कठीणच दिसतें. कारण विद्वानांत बहुधा एक वाक्यता दिसत नाहीं. खुद्द खांडेकर यांच्या भाषणांत तरी एकवाक्यता कोठें आहे ! पुणें येथें भाषण करतांना त्यांनीं एकदां स्वच्छ सांगून टाकलें कीं, मागणी तसा पुरवठा करणें लेखकाला भाग पडते. उलट मडगांव येथील अध्यक्षीय भाषणांत ते असें म्हणतात कीं प्रेमगीते आणि प्रेमकथा खपतात म्हणून लिहाव्यात यांत काय

अर्थ आहे ? " या दोन्ही विचारांचा मेळ कसा घालावयाचा याचा वाचकांनींच विचार करावा! त्यांनीं अध्यक्षस्थानांवरून केलेली भाषणें एकंदरींत चांगल्यापैकीं आहेत यांत शंका नाहीं. पण श्री. खांडेकर यांनी बरेंच लिहिले असले आणि बरीच भाषणें केली असली तरी मतांचा ठामपणा त्यांच्यात अजून यावयाचा आहे. असें बोलूं का तसे बोलू ही अडचण अजून त्यांच्या पुढें येते. समाजसत्तावादी लोकांच्या मेळ्यांत ते असले कीं कला आणि जीवन या वादांत जीवनाची बाजू मांडतील. आणि जरा अधिक रसिक व हौशी लोकांच्या कच्ट्यांत ते सापडले कीं नीतीचा मुरड घालून व होईल कलेची पाठराखण करतील. श्री. खांडेकर यांच्या भाषणांत विवेचकपणा असतो हे खरे. पण त्यांत धरसोड अधिक. त्यांतूनही मनुष्य एकदा लोकप्रियतेच्या मागें लागला म्हणजे त्याच्या अंगीं आलेल्या मोठे-पणाची तो उधळपट्टी करतांना पुढचामागचा विचारही करीत नाहीं. मराठीचे वाचक वेडे आहेत असे मी म्हणत नाहीं व म्हणू तरी कसे ? पण एवढे खरें कीं मराठीत जसें विद्वान व व्यासंगी लेखक नाहींत तसें वाङ्मयाचें अव्वल दर्जाचे परीक्षकही नाहींत असें माझें ठाम मत झाले आहे; विशेषतां ललितवाङ्मयाला महत्व आल्या-पासून इतर कांहीं साहित्य वाचले पाहिजे यांची ललितवाङ्मयाच्या उपासकांना कल्पनाच नाहीं कीं काय ? कोटी आणि उपमा यांच्या मागे लागलेल्या लेखकांकडून चिरंतन स्वरूपाचे म्हणजे कोणत्याही काळीं समाधान देणारे वाङ्मय निर्माण होणें कठीण आहे. श्री. वि. स. खांडेकर यांची लोकप्रियता पहातां खरं आणि स्पष्ट सांगावयाचे तर त्यांच्या योग्यतेपेक्षां ती त्यांना अधिक मिळाली आहे; मात्र याबद्दल कोणी हेवादावा न करतां त्यांना अधिक उत्साह उत्पन्न होईल असेंच बोललेचालले पाहिजे. आणि म्हणूनच उगवत्या सूर्याच्या मागें लागणाऱ्या समाजाला संमेलनाचे अध्यक्षपक्ष श्री. वि.

स. खांडेकर यांना देण्यांत नेहमींच्या रीतीविरुद्ध कांहींच झाले नाहीं. असें असतांहि संमेलनाचे अध्यक्षस्थान जर थोर वाङ्मयसेवे-बद्दल कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याचे साधन मानले तर श्री. खांडेकर यांच्यापेक्षां अधिक विद्वान साहित्यिकांची निवड व्हावयास पाहिजे होती. माझें हें मत कित्येकांना कडक वाटेल हे मला नमुद केलेच पाहिजे; पण आजकाल साहित्यप्रांतातही कसें वारे वाहतात हे कळवावयास या सालीं श्री. खांडेकर यांची तीन संमेलनाचे अध्यक्ष म्हणून झालेली निवड हें एक उत्तम साधन होय. महाराष्ट्राचें म्हणून असे इंदूर येथे जे मुख्य संमेलन झाले त्या संमेलनाच्या अध्यक्षाचे निवडणूकीसंबंधीं मी मागें लिहीलेच आहे. मुंबई येथें अध्यक्ष निवडणूकीचे बाबतींत जो विलक्षण वाद माजला तोही डोळ्यांआड करून चालणार नाहीं. मुंबईचे वर्तमानपत्रांचे मोठे व्यापारी श्री. विठ्ठलराव बागवे यांचें नांव सुचवून जो पोरखेळ सजविण्यांत आला तसा प्रकार यापूर्वी झाल्याचे तरी माझ्या वाचनांत नाहीं. बेजबाबदार लोकांच्या साहाय्यावर कार्ये करायची म्हटलीं म्हणजे त्या कार्याला पोरखेळाचे स्वरूप यावयाचेच ! मुंबई संमेलनाचे बाबतींत तर डॉ. भालेराव, श्री. वर्दे वगैरे चारपांच लोकांखेरीज बहुतेक लोक स्वतांच्याच प्रतिष्ठेच्या मागें लागलेले दिसून आले. केलें कीं आम्ही संमेलन अशी फुशारकी मारवयास सांपडली म्हणजे झाले त्याचे समाधान ! रावसाहेब मुकुंदराव पाटील यांचे नांव सुचवून श्री भास्करराव जाधव यांनीं स्वतांचे हसें करून घेतले. साहित्यसमेलनाचे अध्यक्षस्थान म्हणजे कौन्सिलनिवडणूकीची सभा असें श्री. भास्करराव जाधव समजत होते कीं काय नकळे ! कोठे मुकुंदराव पाटील आणि कोठें सरदेसाईखांडेकर ! पण जातीवर गेल नाहीत तर भास्करराव जाधव कसले ! आज मिरवावयास सांपडलें ना उद्याचे उद्यां पहाता येईल ही मनोवृत्ती कार्यक-

त्याला शोभत नाहीं. मुंबईतील संमेलनाचे बाबतींत तर हा दोष कमालीचा दिसून आला. साहित्य म्हणजे काय व साहित्यविषयक परिस्थिती कशी आहे याचे ज्यांना ज्ञान नाहीं, ज्यांचे वाचन नाही, मराठींत लेखक कोण आहेत, विचार प्रवाह कसे वहात आहेत यांची ज्याना कल्पना नाही व आज साहित्यसंमेलन, उद्या अस्पृशांचे संमेलन, परवा नटांचे संमेलन, त्यानंतर राजबद्यांचे संमेलन अशा जे उड्या मारतात म्हणजे ज्यांच्यात कार्यनिष्ठा नाही असे बाजारबुणगे लोक साहित्य-प्रांतांतही शिरूं लागलेले दिसतात. आणि हें सर्व पाहिलें म्हणजे मला असा इषारा द्यावासा वाटतो कीं, अशा संमेलनांपासून निदान ग्रंथ-कारांनीं तरी दोन पावले दूरच रहावें. मुंबईस काय किंवा इंदूर येथें काय जो प्रकार घडला त्यावरून मी अशा विचाराचा बनलो आहे. आजची संमेलने म्हणजे ग्रंथकारांची संमेलने नव्हेत ! मुंबई साहित्य-संमेलनांत सुसंगतपणा नव्हता, ठरावांत पद्धतशीरपणा नव्हता व वक्त्यांत मुद्देसूदपणा नव्हता. सरकारचा निषेध करणें एवढेच ज्यांचें कार्य अशा उठवळांनीं मुंबई साहित्य संमेलन घेरलें आणि त्यामुळेंच संमेलनांत बहुतेक प्रतिष्ठित साहित्यप्रेमी व प्रसिद्ध लेखक हजरहि राहिले नाहींत. तसाच बहुतेक प्रकार इंदूर येथें घडला. साहित्य संमेलन आणि परिषद यांच्यातील वाद विकोपास जाऊन परिषदेतील प्रमुख कार्यकर्त्यांनीं संमेलनावर बहिष्कार घालावयास कमी केलें नाहीं. इंदूरचे या सालचे संमेलन म्हणजे निव्वळ बजबजपुरी होती. प्रतिनिधींचा अधिकार गाजविण्याची हुक्की या साला कांही उनाड-टप्पूना इतकी आली कीं संमेलनाचा चुथडा झाला. परिषद म्हणजे साहित्यसमेलनाची कार्यकारी कमेटी ठरविली जाणार आहे असें म्हणतात ! याचा अर्थ असा कीं परिषदेकडून आज जे कांहीं कार्य थोडेबहुत होते तेंही करण्यासाठी यानतर कोणी पुढें येणार नाहीं.

परिषदेची घटना संमेलनानें मंजुर करावी म्हणजे परिषद पूर्ण प्रातिनिधिक होते हे खरें असले तरी परिषदेला संमेलनांचे बंधन घालण्यांत आल्यास मोठी अनवस्था प्राप्त होईल. कीर्ती किंवा पैसा याचा लोभ असल्याखेरीज कोणी सहसा कार्यासाठीं सदोदित पुढें येत नसतो. परिषदेच्या कार्यात पैशाची प्राप्ती नाहीं आणि कीर्तीची आशाही नाही! मग संमेलनांची बंधने स्वीकारून कोण पुढें येणार? शिवाय साहित्य कार्य म्हणजे राजकारण नव्हे. साहित्यसंमेलन आणि परिषद यांचा हा तंटा असाच चालविण्यापेक्षां दोघांची फारकत होईल तर अधिक भलेपणा आहे. फार तर संमेलन बोलाविण्याचा अधिकार परिषदेकडे असावा. संमेलनांच्या कार्यांत परिषदेनें मुळींच ढवळाढवळ करूं नये. संमेलन एकादे सालीं भरत नसल्यास तेवढ्यापुरते परिषदेनें पुढें व्हावे. संमेलनांत खंड पडूं नये यासाठींच एवढें तरी अधिकार परिषदेनें स्वाधीन ठेविले पाहिजेत. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासंबधीं परिषदेची ढवळाढवळ अनेकांना आवडत नाही. या व्यवस्थेमुळें त्याही वादाचा आपोआपच निकाल लागेल.

मुंबईच्या साहित्यसंमेलनाचे बाबतींत आज नाहीं उद्यां परिषदेप्रमाणेंच तंटे माजणार असा माझा तर्क आहे. मुंबईसाहित्यसंमेलनें दरसाल भरविण्यासाटीं एक संघ निर्माण करण्यांत आला आहे. प्रश्न असा कीं मुंबई साहित्यसंमेलनानें कांहीं ठराव मंजूर केले तर त्या प्रमाणें या संघानें वागले पाहिजे किंवा नाहीं? संघाचे चालक संमेलनाची बंधनें मान्य करावयास तयार होणें कठीण दिसतें. समजा, उद्यां राजकारणांतून हांकलून लावलेल्या कांहीं उठवळ लोकांनीं संमेलनांत कांहीं ठराव मताधिक्याच्या जोरावर मंजूर करून घेतले आणि ते संघाच्या प्रातिनिधिक स्वरूपाला धोका आणण्यासारखे असले तर संघ एकपक्षीय बनेल. आणि साहित्यकार्य हे असे आहे कीं तें पूर्णपणें पक्षभेदांतीत असावयास पाहिजे. इंदूर आणि

मुंबई येथील संमेलनांवरून मला असेंही वाटूं लागलें कीं राजकारणांतून बेकार झालेले लोक आपलें नांव वर्तमानपत्रांतून यावें म्हणून जोरजोरानें प्रयत्न करीत असावेत. निदान आजच्या स्थितींत तरी अशा लोकांपासून सावध असलें पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीमुळें कांहीं विचार बोलून दाखवितां येत नाहींत हें खरें. पण ही परिस्थिती संमेलनांत निषेधाचे ठराव आणून कां बदलणार आहे ? यासाठीं संमेलनाबाहेरच चळवळ झाली पाहिजे आणि तशी चळवळ करण्याची कोणी खटपट केली तर संमेलनांतून व साहित्यविषयक कार्यांतून पुढारपणा घेणारे बहुतेक लोक त्यांतही अवश्य भाग घेतील. ज्या ठरावांना साहित्यसंमेलनांतून मज्जाव व्हावा असे जे कोणी लोक म्हणतात तेच लोक संमेलनाबाहेर दुसरी सभा भरविल्यास तेच ठराव स्वतां पुढें मांडतील.

साहित्यसंमेलनास यापेक्षां अधिक व्यवस्थित स्वरूप येऊन पद्धतशीर कार्य होईल तरच अशा संमेलनामुळें साहित्यविषयक चळवळीस प्रत्यक्ष मदत घडेल. ठराव करण्यांतही आतां कांहीं सुमार राहिला नाहीं. शक्य काय, अशक्य काय, शक्य असतांही अडचणी काय आहेत याचा विचार न करतां बरेंच ठराव मंजूर करण्यांत येतात. कार्य करणारी संस्था असली म्हणजे त्या संस्थेंतर्फे म्हणून जे ठराव मांडले जातील त्यांना अधिक महत्व आहे. मुंबई येथें संमेलनानें जे ठराव पास केले ते बहुतेक या आक्षेपांपासून अलिप्त नाहींत.

संमेलनाबरोबर पोटसंमेलनें भरविण्याची प्रथा कोल्हापुर संमेलनापासून सुरू झाली. पण अशा व्यवस्थेमुळें एकापेक्षां अनेक लोकांचा सत्कार करतां येत असला तरी बरीच गैरव्यवस्था माजते. एक ना धड भाराभर चिंध्या अशातला प्रकार होतो. मोठ्यांचे अनुकरण चांगलें असलें तरी तें करण्याची कुवत पाहिजे. ओरिएंटल कान्फ-

न्समध्यें पॉटसंमेलनें भरतात म्हणून मराठी साहित्यसंमेलनानें तसे करावे यांत तर्त अर्थ नाहीं. इंदूरच्या संमेलनांत त्यामुळेंही गैरव्यवस्थेंस मदत झाली.

महाराष्ट्रसाहित्य संमेलनांत ठराव मंजुर व्हावेत हें साहजिकच आहे पण प्रांतिक संमेलनातून ठरावांची अडगळ नसावी. एकदा दुसरा असलाच तर तो निव्वळ प्रांतिकस्वरूपाचा असावा. प्रांतिक संमेलनानीं अशी सुधारणा केली तर बरें होईल. पुण्यास भरणारे संमेलन सर्वांत नमुनेदार असते. तेथील कार्यपद्धति अनुकरणीय आहे. ठराव करण्यांत येत नाहींत ही मुख्य गोष्ट होय. एकादा विषय वादविवादासाठीं निवडण्यांत येतो व चर्चेसाठीं ठेवलेल्या विषयासंबंधीं ज्याना गोडी असते असे विवेचक चर्चा करतात. त्यावेळीं होणारी विद्वत्ताप्रचुर भाषणें, मुद्देसुद चर्चा विषयाच्या उलटसुलट बाजू ऐकून वक्ते आणि श्रोते यांना जो आनंद वाटतो तो और खरा. पुण्याच्या संमेलनासाठीं वर्गणी नसते त्याच प्रमाणें स्वागतमंडळ आणि स्वागतोपचाराचें तंत्र याची आवश्यकताही ठेवलेली नसते. खाजगी निमंत्रणें नसतात. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणारे जाहीर आमंत्रण हेच खासगी आमंत्रण समजून सर्व साहित्यप्रेमी व विद्वान संमेलनास हजर रहातात. त्यामुळें मला निमंत्रण नाहीं अशा तक्रारी होत नाहींत. प्रांतिक संमेलनें याच स्वरूपाची असावीत.

यंदा इंदूर येथील साहित्य संमेलनांत काव्यगायनाच्या कार्यक्रमांस मज्जाव करण्यांत आला. झाले हे एकाअर्थी कांहीं वाईट झाले नाहीं! कविवर्ग रागावल्याचे वाचले. पण कवि रागावले तर काय करतील हो? दोन चार अधिक कविता खरडतील एवढेंच! काव्यांनीं गांजलेल्या लोकानां अधिक पैदासीनें कांहीं नवी जखम होणार नाही! पण काव्यगायनाला अजिबात मनाई करण्याचें धारण

मात्र अभिनंदनीय नव्हते. स्वतंत्र कार्यक्रम जरी ठेवता आला नाहीं तरी अधिवेशनांत मधूनमधून काव्य गायनास स्थान देण्यानें श्रोत्यांची करमणूक झाली नसती काय? आणि शेवटीं तसेंच करावें लागले आहे. आजकाल होणारे काव्यगायनाचे कार्यक्रम पाहिले म्हणजे ते होऊ नयेत असे वाटते हें खरें. पण त्यांचीं कारणे मात्र वेगळी आहेत आणि तीं शोधून नाहींशीं करण्याचा प्रयत्न संमेलनाच्या चालकांनीं करावयास पाहिजे होता. याबाबतींत ज्ञानप्रकाशनें कवि गिरीश यांचे पत्र छापले आहे तें पहाता श्री. गिरीश यांनीं आपल्या इतर बंधूंची शिस्तीचे नांवाखर जीं अवहेलना केली तीं न्यायाला धरून दिसत नाहीं. आजकाल गायककवि कोण आहेत याची महाराष्ट्रांतील श्रोत्यांना चांगली कल्पना आहे. अशा नाणावलेल्या काव्यगायकांचा जरी कार्यक्रम ठेवला असता तरी बरें झाले असते. बाहेर गायक म्हणून कीर्ती मिळवावी आणि त्याचे कौतुक संमेलनाने खास निमंत्रण देऊन करावे अशी जर प्रथा सुरू होईल तर गायनकार्यामधील दोष नाहास होतील. असा उपक्रम झाला तर संमेलनाचें निमंत्रण हा एक सन्मान समजण्याची प्रथा पडेल. इंदूरकरांची ही चूक जळगांव येथें सुधारली जाईल अशी अपेक्षा आहे.

इंदूर येथील मुख्य संमेलन आणि तीन प्रांतिक संमेलनें मिळून चार साहित्यसंमेलनें झाली हें वर सांगितलेंच आहे. नाशिक व नगर मिळून साहित्यसंमेलनें भरत असत. गेल्या सालीं नामांकित लेखक व वक्ते ह.भ.प. लक्ष्मणराव पांगारकर यांच्या अध्यक्षतेखालीं संमेलन भरले होते. पण यंदा मात्र भरविण्यांत आले नाहीं. नाशिकनगर मिळून संमेलन भरविण्याची कल्पना चांगली होती व कांहीं वर्षे अशी संमेलनें भरली. यंदाच काय अडचण आली तें समजत नाहीं. नगर येथील साहित्यसंघांत चांगले लोक आहेत. संघाकडून मधूनमधून सभा, प्रकाशन वगैरे कार्यें चालू असतात. मग संमेलनासच

का फाटा देण्यांत आला? येत्या सालींतरी संमेलन भरविण्यांत यावे. पुण्यास अग्निहोत्र मंदिरांत गेल्यासालीं श्री. शंकरराव राजवाडे यांच्या पुरस्कारानें वाङ्मयपरिषद झाली. यंदा तीही भरली नाहीं. अहिताग्नी राजवाडे आणि त्यांचे स्नेही यांचा उत्साह एकच वर्षापुरता ठरावयास नको होता. पण गेल्या सालीं वाङ्मयपरिषदेनें ठराव करून संस्कृतिसंरक्षकमंडळ नेमले होते. त्या मंडळाचे श्री. कृष्णराव मराठे हे अध्वर्यु आहेत. या मंडळानें त्यांना वाटणाऱ्या अश्लील व संस्कृतिविध्वंसक वाङ्मयाचा वेळोवेळी निषेध करण्याचे मात्र कार्य केले आहे. वाचकांसाठीं मंडळाच्या कामाचा थोडक्यांत अहवाल देतो. मंडळानें पुढील लिखाणांचा निषेध केला. १ श्री. रांगणेकर यांची 'नीमोघन' कादंबरी व त्या कादंबरीचे प्रस्तावनेंत श्री. वरेरकर यांनीं सीतादेवीचे चारित्र्यावर उडविलेला शिंतोडा. २ 'कला' मासिकानें सुरू केलेला नीती अनीतीचा प्रश्न ३ 'वागूविला'स मासिकांतील 'तिचे पाय' हा लेख ४ श्री. पंडित यांचे 'सामाजिक समोलंघन' नाटक ५ वसंत मासिकांतील 'आदर्श भ्रष्टता' हा लेख ६ श्री. फाटकशास्त्री यांचे 'घर जांवई' नाटक ७ नवमत मासिकावरील मुखपृष्ठावर दिलेलं चित्र ८ प्रो. फडके यांच्या 'उद्धार' कादंबरीतील अनैतिक भाग ९ कवि मनमोहन यानीं लिहिलेली 'मूर्तिभंजन' ही कविता १० 'नटीचे आत्मवृत्त' ही कादंबरी ११ तेज पत्रांतील 'विसकटलेला संसार' ही कादंबरी १२ 'विलासी ईश्वर' हा सिनेमा. मंडळानें पुढील गोष्टींचे अभिनंदन केले.

कोल्हापुर इलाखा भगिनीमंडळाची सभा होऊन कुलीन स्त्रियांनीं सिनेमांत कामें केल्याबद्दल निषेध करणारा ठराव पास केला त्याबद्दल त्या मंडळाचें अभिनंदन २ मिरज जैन महिला परिषदेंत कुलीन स्त्रियांनीं रंगभूमिवर कामें करूं नयेत असा ठराव पास केला त्याबद्दल अभिनंदन ३ श्री. कवीश्वर यांचे 'नीती व कलोपासना' हें

पुस्तक ४ श्री. रहाळकर यांचे ' नवेडोळे ' नाटक ५ प्रो. बेहेरे यांचा ' पावित्र्यविडंबन ' हा लेख. ६ पारशी स्त्रियांनीं सिनेमांत कामें करूं नयेत असा मुंबईच्या पारशी सभेनें पास केलेला ठराव. ७ या संस्कृतीमंडळाच्या कांहीं सभासदांनीं पुणे येथें ' आल्हिस्को ' नांवाचा जुगारी अड्डा चालविला त्याबद्दल चालकावर फिर्याद केली.

त्याप्रमाणेंच मंडळानें कांहीं ठरावही पास केले आहेत ते येथें सर्वत्र देता येत नाहीं. त्यापैकीं एक ठराव पुढील प्रमाणें आहे. शाळा कॉलेजातील विद्यार्थ्यांसमोर धंदेवाईक स्त्रियांची गाणीं करणें संमेलनांतून असभ्य आणि अनीतिकारक नाटकें करणें, संततिनियमन, घटस्फोट, तात्पुरती लग्नें वगैरे विषयावर बेजबाबदारपणें व अशास्त्रीय रीतीनें वादविवाद होऊं देणें वगैरे गोष्टी संस्कृति विघातक असून विद्यार्थ्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम करणाऱ्या आहेत. त्यास आळा घालण्याबद्दल शाळाकॉलेजांच्या अधिकाऱ्यांना ही परिषद विनंती करीत आहे.

ही थोडक्यांत माहिती देण्याचे कारण इतकेंच कीं, विशिष्ट दृष्टीनें विचार करणाऱ्या लोकांची मनोभूमि येवढ्यावरून स्पष्ट होते. व वरील सारख्या विचारांचा एक प्रवाह समाजांत वहात आहे याचीही नोंद येथें व्हावी. बडोदे येथें दरसाल साहित्यसंमेलन भरते. यंदा श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या सत्कारसमारंभाच्या कामामुळें ते भरले नाहीं. वऱ्हाड, उमरावती नागपूर इकडेही प्रांतिक संमेलने सुरूं झाली पाहिजेत. प्रत्यक्ष संमेलनाप्रमाणें जरी नसलीं तरी कॉलेजांतून स्थापन झालेल्या वाङ्मय मंडळाची संमेलने यंदा बरीच झाली. प्रो. वामन मल्हार जोशी, प्रो. पटवर्धन, प्रो. फडके, श्री. वि. स. खांडेकर वगैरे नामांकित लोकांना अध्यक्ष निवडून त्यांचा आदर–सत्कार करण्यांत आला. हैद्राबाद येथें एक संमेलन भरावयाचे होते; श्री. वि. स. खांडेकर यांची अध्यक्ष

म्हणून निवड झाली होती; पण ते संमेलन अखेर भरलेंच नाहीं. सांगलीकोल्हापुर येथील साहित्यकांनीं दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलन भरविण्याचे ठरविलें होते. अध्यक्षस्वागताध्यक्ष म्हणून राजेमहाराजांची निवडही झाली. पण अखेर तें स्वप्नच ठरलें. वस्तुतां कोल्हापुर येथें दरसाल संमेलनें भरवावयास अडचण पडूं नये. हा उपक्रम कोल्हापुरच्या साहित्यप्रेमी जनतेनें शक्य तितक्या लवकर सुरूं करावा. एकदां संमेलनें सुरूं झाली व कांहीं कार्य होत आहे असें दिसून आलें कीं कोल्हापुरास भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे वेळीं श्रीमंतांनीं दिलेलें अभिवचन श्रीमंत छत्रपतींना पुरें करतां येईल अशी आशा आहे. उत्तरेकडील मराठी राज्यांतही साहित्यसेवेबद्दलची आवड वाढती असून तिकडेही संमेलनें सुरूं झाली आहेत. ही खाचित अभिमानाची गोष्ट होय. ग्वाल्हेर, इंदूर व देवास या संपन्न मराठी संस्थानिकांनीं आपल्या मायभाषेच्या अडचणी दूर करावयाचें मनांत आणल्यास त्यांना काय अशक्य आहे ? इंदूरच्या महाराजांनीं यंदा इंदूर साहित्यसभेस २५ हजारांची इमारत दिलीच कीं नाहीं ? आपटेस्मृतिदिन, रे. टिळकस्मृतिदिन वगैरे प्रसंगींही झालेलीं भाषणें दृष्टीआड करण्यासारखीं नाहींत. प्रांतिक साहित्यसंमेलनासंबंधीं श्री ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं 'नवजीवन' मासिकाच्या दिवाळी अंकांत लिहिलेला लेख प्रांतिक साहित्यसंमेलनाची आवश्यकता व फायदे समजून घेण्यास उपयोगी पडेल.

साहित्यसंमेलनें आणि नियतकालिकें यांचा येथवर विचार झाला. आतां पुस्तकप्रकाशनाचा विचार करूं. गेल्या दोन सालच्या समालोचनांत मी सांगितलें तेंच याही सालीं सांगावें लागत आहे. पुस्तक प्रकाशन ही मोठी अडचणींची बाब होऊन गेली असल्यानें दिवसेंदिवस या धंदा जोखमाचा होणार अशी भीति वाटते. गेल्या तीनचार वर्षांपासून मराठी पुस्तकांचे गिऱ्हाइक निदान सत्तर टक्क्यानीं

घटलें आहे. पुढील म्हणजे सन १९३६ हें साल अधिक भयप्रद दिसतें. अतिशयोक्ती नव्हे ही सत्यकथा आहे. मुंबईत लोकप्रिय नाटककाराची कृती प्रथम रंगभूमीवर आली कीं दोन तीन महिन्यांत कमींत कमी तीन हजार प्रती खपत असत. आतां हजारही जात नाहींत. कादंबऱ्या आणि लघुकथा यांचे प्रमाण याहून निराळें नाहीं. अश्लील वाङ्मय जास्त संपते असे सनातनी लोक ओरड करीत असतात. पण त्यांत कांहीं अर्थ कां आहे ? 'कळ्यांचे निश्वास' या पुस्तकाबद्दल केवढा गवगवा झाला. टीका, प्रतिटीका आणि वादविवादांची वादळें केवढाली तरी झाली. पण विचार करा या पुस्तकाच्या कितीशा प्रती खपल्या ? झालेल्या ओरडीच्या मानानें कमीत कमी दहा हजार प्रती खपावयास पाहिजे होत्या. पण या पुस्तकाची द्वितीय आवृत्ती सुमारें वर्षांपूर्वींच निघाली; आणि कोठें अभ्यासाठीं मंजूर न झाल्यास आणखी ७-८ वर्षे तरी तिसऱ्या आवृत्तीचा विचार सुद्धां करावयास नको ! केव्हां केव्हां असे मला वाटतें कीं अश्लील लिहिण्यानें कां होईना ग्राहकवर्ग वाढत असेल तर लेखकांनीं खुशाल अश्लील लिहावें ! हळूहळू ही वाचनाची आवड सुविचारप्रधान प्रकाशनाकडे वळवितां येईल. आमच्यांत वाचनाची आवड नाहीं तर ग्राहक वाढणार कसे ? प्रतिभा पाक्षिकाच्या शेवटच्या अंकांत श्री. ह. वि. मोटे यांनीं आपल्या संपादकीय मजकुरांत याविषयीं जे उद्गार काढले ते अगदी खरे आहेत. 'वाचक' हें क्षेत्र इतकें आकुंचित होत आलें आहे कीं तुमचा लेखकवर्ग एवढाच आजचा वाचकवर्ग आहे अशीही शंका येऊं लागली आहे असें श्री. मोटे म्हणतात. जास्त खप होत असेल तर तो कादंबऱ्यांचा होतो. पण कोणाच्या ? ज्यांनीं कादंबरीकार म्हणून कीर्ति मिळविली त्यांच्या; इतरांच्या नव्हे. चालू सालीं 'भंगलेले देऊळ' या कादंबरीची बऱ्यापैकीं खपली व त्यापेक्षां

'उद्धार' या कादंबरीस फार अधिक मागणी आली आहे. एव-ढेंच ! अत्रे. फडके, खांडेकर, गुर्जर व माडखोलकर ह्यांच्या पुस्त-कांना इतरांपेक्षां अधिक मागणी असते. या खेरीज जे लेखक आहेत त्यांची पुस्तकें प्रसिद्ध करणें मोठें कठीण काम होय. आणि याही लेख-कांची पुस्तकें खपतात म्हणजे काय तर जेमतेम एक वर्षांत मेहनत घेतली तर पुस्तकांनिमित्त झालेला छपाई खर्च भरून येतो. नव्या व लोकप्रिय लेखकांच्या पुस्तकविक्रीचें मान इतपत आहे. नाथमाधव व गडकरी यांना आता पहिल्या मानानें मागणी मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. मात्र कै. हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या अद्यापही बऱ्याच खपतात. फडके, खांडेकर याच्या कादंबऱ्या असल्यास दोन हजाराची आवृत्ती दोन चार वर्षांत खलास होते. त्यांची लघुकथांची पुस्तकें कादंबऱ्यांच्या मानानें बरीच कमी खपतात. काव्यग्रंथांत 'यशवंत' कवींचे 'यशोधन' पुस्तक व अत्रे यांची 'झेंडूची फुलें' यांना मागणी असते. माधव-ज्यूलियन यांच्या योग्यतेच्या मानानें त्यांच्या पुस्तकांचा खप नाहीं. 'गिरिश' 'टेकाडे' 'चंद्रशेखर' 'बी' 'तांबे' यांची पुस्तकेंही तुरळक मागविली जातात. मग गोविंदाग्रज, विनायक, बी. लेंभे, बालकवी इत्यादि कवींचे संग्रह कितीसे खपत असावेत यांचा वाचकांनींच विचार करावा गंभीर विषयावरील पुस्तकांची विक्री पहिल्या वर्षी जास्तींत जास्त झाली तर तीनशेंपर्यंत होते. विभावरीचें पुस्तकास इतरांच्या मानानें जास्त मागणी आहे. नाटकांच्या पुस्तकांत अत्रे, शुक्ल, वरेरकर व खाडिलकर या चार लेखकांच्या नाटकांना ग्राहकवर्ग नेहमीं असतो. लघुकथांच्या पुस्तकांत य. ग. जोशी, बोकील, खांडे-कर, यांच्या संग्रहांना थोडीफार मागणी असते. स्वतांचे ठराविक ग्राहक आहेत अशा मालांतर्फे प्रसिद्ध होणारी किंवा स्वतांच्या खास परिश्रमानें खपविली जाणारी पुस्तकें वरील विक्रीच्या अंदाजांतून

बाद केली पाहिजेत. पण बाकीच्या ग्रथांचें काय ? घटत चाललेली ग्राहकशक्ती कशी वाढेल याचा विचार मात्र कोणीच करीत नाहीं. साहित्यसंमेलनांतून या विषयाच्या चर्चेला प्रमुख स्थान दिले पाहिजे. इंदूरच्या साहित्यसंमेलनांत एक फंड काढण्याची योजना अध्यक्ष-स्थानी सुचविली आहे. त्यामुळें परिषदेचे सामर्थ्य वाढेल ? व तसे वाढलें पाहिजे हें खरे असले तरी ग्रंथकारांना पारितोषिकें देण्याची तरतूद करण्यापेक्षां त्याचे ग्रंथ कसे अधिक खपले जातील याचा प्रथम विचार करावयास नको काय ? उत्तेजनासाठीं द्यावयाच्या पारितोषिकापेक्षां लेखकाला त्याच्या पुस्तक विक्रीमुळेंच अधिक लाभ होणें शक्य आहे. देणगी म्हणून रक्कम दिली तरी किती देणार आणि कोणाकोणाला देणार ! तीच त्यांची पुस्तके खपली तर आपोआप लेखकांच्या खिशांत मोबदला येऊन पडेल. कादंबऱ्यां-मुळें लेखकांना पैसे मिळतात. पण कादंबऱ्यांचा खप कमीतकमी पांच हजारपर्यंत गेला तर वर्षाकाठीं एक कादंबरी लिहून महिना पाऊणशें रुपयांची प्राप्ती लेखकांस सहज होईल.

पण खप वाढविण्याकडे साहित्यविषयक कार्यकर्ते लक्षच देत नाहींत. मुंबई शहर ही साहित्याची प्रमुख पेठ आहे. पण गेल्या दोन्ही संमेलनांत मुंबईचे हें महत्व लक्षांत घेऊन कांहीं विचार झाला आहे कां ? भाषा अशी लिहावी आणि भाषा तशी लिहावी हा उपदेश करण्यास श्रम लागत नाहीत. पण कशीहि भाषा लिहिली तरी बाजारांत त्याची किंमत आगेंमागें होत नसते. सुशिक्षित वाचकांचा इंग्रजी पुस्तकांकडे कल असतो असें म्हणतात पण मला ती थाप वाटते; आमचे सुशिक्षित लोक कांहींच वाचत नाहींत अशी माझी कल्पना आहे. इकडेतिकडे प्रसिद्ध झालेले अभिप्राय वाचून ग्रंथ वाचल्याची ते बतावणी करीत असतात ! खरा वाचक म्हणजे इंग्रजीचे ज्ञान बेताबातेचा असलेला किंवा मुळीच नसलेला महा-

राष्ट्रातील सामान्य लोकांचा वर्ग ! माझा हा अनुभव आहे आणि स्वत:च्या अनुभवावर मी हें विधान करीत आहे. पुस्तकांच्या मागण्या नीट तपासा त्यांत हजारांमधें दोन तीन पदवीधरही आढळणार नाहींत ! वाचनप्रियता वाढविण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न झाले पाहिजेत; सन १९३५ साल पुस्तकांच्या विक्रीचे बाबतींत असमाधानकारक गेले आहे.

विक्री वाढविण्यासाठी ठिकठिकाणी वाङ्मयव्यापारी पुढे आले पाहिजेत. त्याप्रमाणें संग्राहालये स्थापन झाली पाहिजेत. पण नवीन निर्माण होण्याऐवजी आहेत तीच ग्रंथसंग्रहालये दिवसेंदिवस कमीच होत असलेली दिसतात. एवढें मोठे मुंबईग्रंथसंग्राहलय ! पण त्या संग्रहालयांस प्रसिद्ध होणारी पुस्तके वेळेवर विकत घेता येत नाहींत. संग्रहालयांच्या वाढीबरोबरच प्रकाशक कंपन्या वाढल्या पाहिजेत. एकट्या दुकट्यांचे प्रयत्न आज होत असले तरी शेवटीं निराशा, अपमान आणि खोटेपणा प्रकाशकांच्या पदरी पडतो. सामुदायिक व्यापार होईल तर बरें पण दोघांचे पटले तर महाराष्ट्रीय कसले ! अशा मनोरचनेच्या लोकांकडून सहकारितेनें व्यापार होण्याची अपेक्षा करणेच चुकीचे होय. लिमिटेड कंपन्या महाराष्ट्रांत दोन तीनच आहेत. प्रो. बनहट्टी यांच्या प्रयत्नामुळें नागपुर येथें एक लिमिटेड प्रकाशक कंपनी स्थापन झाली आहे. लोकशिक्षण मंडळ व महाराष्ट्र पब्लीशिंग हाऊस या दोन कंपन्या आहेत पण त्यांचीही स्थितीही समाधान कारक नाहीं. मे. परचुरे पुराणिक आणे मंडळी कर्नाटक हाऊस, रामकृष्ण बुकडेपो, तुकाराम पुंडलीक शेटे, ह. वि. मोटे, मॉडर्न बुकडेपो, य. गो. जोशी. वि. वा. हडप व कांहीं माला यांनी यासालीं प्रकाशन केले आहे. त्याखेरीज कांहीं वाङ्मय मंडळाकडून पुस्तकें प्रसिद्ध झालेली दिसतात. श्री. प्र. श्री. कोल्हटकर यानींही दोन चार पुस्तके प्रसिद्ध केली.

' सागर साहित्य ' याच्यासारखी कांहीं मंडळें उदयास आली. व कांहीं नामशेष झाली. महाराष्ट्र प्रकाशन संस्थेनें बरेंच प्रकाशन केलें. मौज प्रिंटींग ब्युरो, मन्वन्तर छापखाना, चित्रशाळा, कोल्हापुर येथील मोघे यांचा बुकडेपो यानींही कांहीं पुस्तकें प्रसिद्ध केली. कर्नाटक प्रेसने ' नवसाहित्यमाला ' व नागपुर येथें प्रो. बनहट्टी यांची माला या दोन नव्या माला या सालीं सुरू झाल्या. पैकीं पहिल्या मालेनें कमीं किंमतींत पुस्तकें देण्याचा हेतू आपल्यापुढें ठेवलेला दिसतो. दुसऱ्या मालेतर्फे इतर भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथ मराठींत प्रसिद्ध होणार आहे. असा प्रयत्न अवश्य झाला पाहिजे. मराठी भाषा अधिक लौकर संपन्न करावयास परकीय वाङ्मयाची लैलूट होईल तितकी बरी. गॉर्की असे म्हणतो आणि टॉलस्टाय असे सांगतात अशा प्रकारें व्याख्यानांतून बोलणाऱ्या वक्त्याचे उद्गार कितपत सत्य आहेत तें कळावयास व त्यांच्या अनुरोधानें वाचक व लेखकांचे विचार सुसंपन्न व अद्यावत् व्हावयास जगविख्यात ग्रंथकारांचे लिखाण मराठींतून छापल्यास कितीतरी कामगिरी होईल. पूर्वीं अशी कामगिरी कांहीं लोकांनीं केली आहे. कै. विजापूरकर यांनीं ग्रंथमालेतर्फे इंग्रजी ग्रंथांवरून बरीच पुस्तकें प्रसिद्ध केली. कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं 'भाषांतर' नांवाचे स्वतंत्र मासिक याच उद्देशानें आढले होते. 'दाभोळकर आणि मंडळी' या प्रकाशकानीही कांहीं इंग्रजी ग्रंथाची भाषांतरें प्रसिद्ध केली. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यानीं राष्ट्रकथामाला आणि महाराष्ट्र ग्रंथमाला अशा दोन माला सुरू केल्या होत्या. या मालांतून पुराणिक, काथवटे, आठवले, बेलवलकर, ओक, गायकवाड, सरदेसाई, बोडस, इत्यादि लेखकाची भाषांतरें प्रसिद्ध झालेली आढळतात. श्रीसयाजी साहित्यमालेतर्फेही अद्याप भाषांतरात्मक ग्रंथ मधुनमधुन उजेडांत येत आहेत. प्रो. बनहट्टी यानीं

अभिजात साहित्य–माला, नामांकित ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध करण्यासाठीं काढली याबद्दल मी त्यांचे व सहकार्यांचे अभिनंदन करतो. प्रकाशनांचे कामीं वैयक्तिक प्रयत्न कांहीं थोडे झाले नाहींत. पण प्रकाशकानी हे लक्षांत ठेवावे कीं पुस्तक प्रसिद्ध करणे हें जितकें कठीण त्याच्या शंभरपट त्याची विक्री करणें कठीण असते. म्हणून प्रकाशनाची खटपट होते त्याचवेळीं विक्रीची खटपट झाली पाहिजे पुस्तक छापलेले पाहण्याच्या आनंदापेक्षां ते वाचले गेल्याचा आनंद आधिक असतो, पण एकटे प्रकाशक काय करणार ! वाचक वर्ग जेथें नाहीं तेथे पुस्तक विक्रीवाले तरी कसे पुढें येणार. सर्वांपेक्षां ग्राहक वर्ग कसा वाढेल हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आतांपर्यंत कोणीच केला नाहीं. मग तो या सालींही झाला नसेल तर आश्चर्य नव्हे. यासाठीं राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचे साहाय्य घेऊन वाचनालयें वाढविण्याची खटपट झाली पाहिजे. वाङ्मय प्रांताची स्थिती जवळ जवळ बेवारशी जागे प्रमाणे आहे. जातिविषक संस्थाच्या इमारतीस व कार्यास फंड जमतो पण ग्रंथसंग्रहालयांस पुरेसे वर्गणीदारही मिळत नाहींत. मग कायम स्वरूपाची तजवीज होणे कठिणच ! मराठी भाषेच्या प्रगतीचे कार्य सर्वांनींच उचलले पाहिजे. पण तसें घडत नाहीं एवढें खरे.

असो, अशाही केवीलवाण्या स्थितींत प्रकाशनाचे कार्य करणाऱ्या लोकांचे कौतुक करावे तेवढें थोडे होईल. यंदा दरसाल प्रमाणें कांहीं महत्वाचे प्रकाशन झाले. काव्यविभागकडेच पहा. एकाकाळीं नांवाजलेले कवि ‘ माधव ’ यांचा संग्रह श्री. मोटे यांनीं या सालीं प्रसिद्ध केला. श्री. माधव हे ऐतिहासिक काव्यें लिहीण्यांत पटाईत आहेत. रेखीव मांडणी हा त्यांचा विशेष होय. पण त्यांची कविता कळावयास टीपांचे सहाय्य पाहिजे. आजच्या बोलींतून फरारी

झालेले शब्द पकडून त्यांस काव्यांत डांबून ठेवण्याची माधव या कवीस हौस दिसते. ऐटदार घडण व शब्दप्रभुत्व याखेरीज त्यांच्या वाखाणण्यासारखा दुसरा गुण नाहीं. ऐतिहासिक काव्याखेरीज त्यांची जी इतर काव्यें आहेत ती यथातथाच आहेत. कुंजविहारी या सोलापुरच्या कवीनें लिहिलेल्या तान्हाजी मालुसऱ्यावरील लहानशा पोवाड्यांत जो शाहीरी थाट व तडफ आहे ती माधवांच्या काव्यांतून आढळत नाहीं. असें असले तरी ऐतिहासिक प्रसंग शोधून त्यावर आवडीनें गीतें गाणारा गेल्या काळांत माधव हाच एक प्रमुख कवि झाला आणि अशा कवीचा संग्रह प्रसिद्ध झाल्यानें ती कवनें आतां वाचण्यागाण्याची सोय झाली. पुस्तकाची छपाई छान झाली आहे. ‘ ताम्बे यांची समग्र कविता ’ या सालीं प्रो. मायदेव यांनीं प्रसिद्ध केली. या पुस्तकाचे संपादनकार्य प्रो. माधव त्र्यंबक पटवर्धन यानीं केले आहे. प्रो. पटवर्धनानीं केलेले संपादन पाहिले म्हणजे त्यांच्या अतिशहाणपणाची कींव येते ! ‘मूळ काव्यांतील रूपें बदलून संपादकांनी जागोजागीं जी अक्कल पाघळली त्यामुळें ताम्बे यांच्या काव्यांतील कांहीं ठिकाणचें सौंदर्य आजिबात नष्ट झाले. ‘महाराष्ट्रां’तील अभिप्रायांत म्हटल्याप्रमाणें त्यांनीं तांबे यांनीं मागील आवृत्तींतून दिलेल्या टीपा संपादकांनी खचित गाळावयास नको होत्या. वाचकहो, मराठी भाषेला सुधारण्यासाठीं पुढें आलेल्या या प्रोफेसराला लवकरच आवरा नाहीं तर मराठी भाषेतील सौंदर्य नष्ट व्हावयास फारसी अवधी लागणार नाहीं. भाषा शुद्धीच्या छंदामुळें या गृहस्थाला वेड तर लागले नाहीं ना असा कित्येक वेळ भास होतो. ‘ विशेष व सामान्य जनहो ’ असा आरंभ करून इंदूर संमेलनांत हंसें उत्पन्न करणारे हे पंडित मराठी भाषेला दुर्बोध करणार किंवा काय कळत नाहीं ! तांबे यांची कविता या गृहस्थाच्या तावडीत न जाती तर किती तरी बरे झाले असते ! तांबे यांची

योग्यता आधुनिक कवींत फार श्रेष्ठ प्रकारची आहे. त्यांनीं स्वतांचे असे तंत्र निर्माण केलें व अनेकांना आपल्या गीतमाधुर्यानें मुग्ध केले, आजचा काळ म्हणजे गेली १०।१५ वर्षे तांबे यांनीं गाजविली आहेत. एवढे यशवंत लोकप्रिय कवीं ना पण त्यानाही तांबे यांच्या पुढें जातां आले नाहीं. काव्यमंदीरातील दुसरें बुद्धिमान जादुगार केशवकुमार होत. विडंबन काव्याचे केशवकुमार हे प्रवर्तक आहेत. 'झेंडूच्या फुलां' पलीकडे अद्याप यांची नजर गेली नसली तरी 'गीतगंगे' तील रंगदार कवनें म्हणजे त्यांच्या रंगेल भावनेचा विलास होय. 'झेंडूच्या फुलां' त त्यांची बुद्धि बोलते तर 'गीतगंगेंत' त्यांची भावना बोलताना आढळते. 'गीतगंगे'नें त्याना कवीची प्रतिष्टा मिळवून दिली. प्रतिष्ठित विद्वान लोक आधुनिक नाटयलेखकांकडे विद्वत्तेच्या आदरानें पहात नाहींत असा माझा समज आहे. आणि त्यामुळें ग्रंथकार व कवि म्हणून वरच्या लोकांकडून प्रिं. प्र. के. अत्रे ( केशवकुमार ) यांस पाहिजे तितका अंत:करणपूर्वक आदर व मानसन्मान अद्याप लाभला नाहीं. माझ्या या अभिप्रायाचें रहस्य खुद्द अत्रे हेच बरोबर जाणतील; पण यासाली प्रसिद्ध झालेल्या 'गीतगंगा' या त्यांच्या काव्यसंग्रहानें प्रतिष्ठित म्हणविणाऱ्या विद्वानांनीही माना डोलावल्या. सरळ व प्रासादिक रचना हा केशवकुमारांच्या काव्याचा विशेष होय. बालकवि खेरीज इतकी गोड व कोणासही समजेल अशी काव्यरचना 'केशवकुमारां' खेरीज बहुधा दुसऱ्या कोणत्याच कवींत आढळणार नाहीं. माझ्यामतें यापुढें प्रिं. प्र. के. अत्रे यांच्याकडून काव्यरचना होणे कठीणच दिसते. याचे कारण भावनेपेक्षा बुद्धीनें त्यांच्यावर विजय मिळविला आहे तो, इतका कीं त्यांची भावना यापुढे बुद्धी खेळविल तशी खेळणार. आणि बुद्धीचा विलास या अमर्याद खरा पण जगाला धरून असतो. त्यामुळें केवळ काव्य

आंतापुरतेच भावनेच रंगण त्यांना मर्यादित राहिले नाहीं. ' स्वप्न रंजन ' हा माधवज्यूलीयन यांच्या स्फूट काव्यांचा संग्रह या साली प्रसिद्ध झाला. आधुनिक मराठी कवींमधें माधवज्यूलीयन यांची मोठी योग्यता आहे असें श्री. श्रीखंडे यांचा 'लोकशिक्षणा'तील लेख वाचूनहि मला वाटतें. विशेषतां प्रणयात्मक कविता मोहक असतात. रंगेल मनाचा ढंगदार विलास त्यांच्या काव्यांत उत्तम प्रकारें प्रतीत झाला आहे. भावनेची विविध दृष्यें, चालींची विपुलता व शृंगाराचे निरनिराळे बहाणें त्यांच्या काव्यांतून वाचताना तरुणतरुणींचें प्रणय-विचार उत्फुल्ल होतीलच पण गेल्या आयुष्याच्या मनोरम काळांतलि स्मृतिचित्रें वृद्धांच्याही दृष्टीपुढें उभीं राहतील. त्यानीं आपल्या योग्यतेनें स्वतांचा वाचक वर्ग निर्माण केला. या विलासप्रिय कवीची एकांत-प्रियता दुर्दैवानें बरीच वाढल्यामुळें लोकांना या कविश्रेष्ठाची योग्य कल्पना अद्याप झालेली नाहीं. 'यशोगंध' हा यशवंत कवीचा दुसरा संग्रह या सालीं प्रसिद्ध झाला. या संग्रहातील कांहीं कविता वगळ-ल्यास लोकाना नवे असे त्यांत कांहीं नाहीं ' यशोधना ' चा लौकिक या संग्रहास लाभणें कठीण दिसते. दुसरे असे कीं यशवं-ताच्या यांतील कविता वाचतांना असा भास होतो कीं त्याच त्याच कविता आपल्यापुढें येत असाव्यात.

यानंतर ' आकाशगंगा ' 'संराक' 'वाण्डगूळ' या ग्रहांचा उल्लेख केला पाहिजे. तिन्ही पुस्तकाचा विशेष म्हणजे त्यांत विडंबनात्मक, विनोदी आणि उपहासात्मक कविता आहेत. या काव्यतंत्राचे प्रि.अत्रे हे आद्यप्रणेते होत. 'संराक' यांच्या काव्यांत विचारांचा बराच साधे-पणा आहे. त्यामुळें त्यांच्या विनोदी व विडंबन या दोन्ही काव्यतलवा-रींच्या धार बऱ्याच बोथट आहेत. विडंबन आणि उपहासात्मक काव्य मुख्यतः बुद्धिनिष्ठ असते. अशाप्रकारची काव्यें लिहिण्याचा आतां-पर्यंत अनेकानीं प्रयत्न केला. पण प्रि. अत्रे यांच्या ' झेंडुच्या फुलां-

तील संग्रहाशी बरोबरी करील जसे कवन बहुधा क्वचितच आढळतें. याचें कारण प्रि. अत्रे यांच्या बरोबरीचा बुद्धीवान असा एकहि कवि नाहीं. या तीन संग्रहांखेरीज 'गाजराच्या पुंग्या' या नांवाचा एक संग्रह प्रसिद्ध झाल्याचे ऐकतो, मीं हें पुस्तक पाहिलें नाहीं. यांत अनेकांच्या कवितांचा समावेश होणार असल्याचे प्रसिद्ध झाले होते. शिवाय इतर जे कांहीं लहान मोठे संग्रह प्रसिद्ध झाले त्यांतूनही अशा प्रकारच्या कविता मधूनमधून आढळतात. 'भ्रमाचा भोपळा' या नाटकांत घातलेलें 'उपास मज लागला' हें कु. मालती किर्लोस्कर हिचें कवन मूळ कुमारी अक्का पंतप्रतिनिधी हिने संपादिलेल्या काव्यसंग्रहातून घेतलेले अनेकाच्या परिचयाचें झाले आहे. कुमारी अक्का पंतप्रतिनिधी हिचे खरें नांव मला ठाऊक नाहीं पण औंधच्या राजे साहेबांची ही नात असल्याकारणानें हिचा उल्लेख 'अक्कासाहेब पंतप्रतिनिधी' असाच सर्वत्र केलला आढळला. पाळण्यातलें नांव 'अक्का' नसावे. धनवान लोक नांवापासूनही श्रीमंतीची मिजास दाखवितात त्यातलाच हा प्रकार आहे. 'आकाशगंगें'तील बहुतेक कविता म्हणजे वडील माणसांची नक्कल करणाऱ्या मुलांचा खेळ दिसतो. 'बाडगूळ' हे काव्याचें नांव मात्र मला आवडत नाहीं. पण या संग्रहातील काव्यें बरीच सरस आहेत; श्री. चं. ग. दिक्षित यांनीं नव्या व्यवसाया-मागें लागूनही हा नाद सोडू नये अशी माझी त्याना सूचना आहे.

दादरचे एक सुस्वभावी कवि श्री. दत्तप्रसन्न कारखानीस यांचा काव्यसंग्रह सौ. उषाबाई जोशी यानीं प्रसिद्ध केला. 'क्षितिजावर' या संग्रहांतील कविता गोड तर खऱ्याच शिवाय विकार आणि विचार यांचे बरेंच पावित्र्य श्री. कारखानीस यांच्या कावितेंत आढळतें. यांच्या बहुतेक कविता अशा आहेत कीं त्या लहानापासून वृद्धां-पर्यंत जमलेल्या मंडळींत गावून दाखविल्या तर त्या ऐकताना कोणा-

सही चमत्कारिक वाटणार नाहीं. प्रसादगुणामुळें काव्यांतील प्रत्येक पंक्ती माधुर्यानें नटली आहे. या खेरीज कांहीं स्फुटसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. माळव्यांतील कांहीं कवींचा एक संग्रह या साली 'मालविका' या नांवानें प्रसिद्ध झाला. त्याचा मुद्दाम उल्लेख अभिमानानें केला पाहिजे. 'झेंडूंची फुले' या लोकविख्यात पुस्तकाची तिसरी आवृत्ती निघाली. 'चंद्रप्रभा' या नांवाचे श्री. अ. ज. करंदीकर यांचे काव्य, 'काव्यकुसुमकलिका' हा हैद्राबाद संस्थानातील एका कवींचा संग्रह, 'अरुणोदय' हा कवि पटवर्धन यांचा संग्रह, खाडीलकर यांचे तीन नवीन पोवाडे, धुळ्याचे मुचोटी यांचा 'तान्हाजी मालुसऱ्यांचा पोवाडा, श्री. प्रल्हादराय यांचा लिहीलेला 'बाजीप्रभू देशपांडे' यांच्यावरील पोवाडा, श्रीमती सीताबाई पाटील यांची 'मातृभूमी'वरील कवनें, श्री. साने यांचा 'पत्री' या नांवानें प्रसिद्ध झालेला संग्रह, किरण कवि यांचा संग्रह इत्यादी पुस्तकें या साली प्रसिद्ध झाली. काव्यशास्त्रावर या साली एकही ग्रंथ अथवा टीकात्मक प्रबंध प्रसिद्ध झाला नाहीं. मात्र नियतकालिकांतून काव्य विषयावर चर्चात्मक लेख प्रसिद्ध झालेले आढळतात; त्यांत प्रो. मा. त्र्यं. पटवर्धन व प्रो. साळगांवकर यांच्या 'प्रतिभे'तील लेखांचा मी येथे मुद्दाम नामनादर्श करतो. काव्याच्या बाबतींत महाराष्ट्रशारदा दिवसेंदिवस दरिद्री होत चाललेली दिसते यांचे कारण टीकाकारानीं अवश्य शोधून पहावें. 'काव्यशास्त्र विनोद' या ज्ञानप्रकाशच्या पुरवणींत कांहीं नमुनेदार काव्यें आढळलीं. विस्तारभयास्तव त्यांचा तपशील देणें कठीण आहे.

लघुकथांच्या पुस्तकांत या वर्षीही बरीच भर पडली. नियतकालिकांमधून तर कितीतरी गोष्टी प्रसिद्ध होतात. दिवसेंदिवस भाषेचा डौलदारपणा वाढत आहे. त्याचप्रमाणें कलात्मक लिहीण्याची आवडही वाढती दिसते. ही वेळ अशी आहे की आतां

निर्भीड टीका लिहून रुळलेल्या मार्गाच्या बऱ्यावाईटाची कल्पना लेखकांना आणून दिली पाहिजे. गोष्टींतून विषयाची विविधतां नाहीं किंवा भावनेच्या स्वतंत्रपणा नाहीं. मेचके लिखाण लिहीण्याच्या पद्धतीचा बराच विस्तार झाला आहे एवढे खरे. आपटे, सरस्वती कुमार, गुर्जर, देशपांडे, गिरजिबाई केळकर, इत्यादि जुन्या लेखकांची धाटणी व आजचे लोकप्रिय लघुकथालेखक यांची लिहीण्याची पद्धत यांत बरेंच अंतर पडले आहे. कथात्मक वाङ्मय असे आहे कीं व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार व प्रचार करण्यास फार उपयोगी पडते. पण या व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार आमचे लघुकथा लेखक केवळ प्रणय अथवा लैंगिक भावनेपुरताच करीत असतात. 'प्रतिभे' मधें प्रसिद्ध झालेली 'गृहिणींचा सत्याग्रह' ही गोष्ट मनोरंजक असली तरी ती इतकी प्रचारात्मक आहे कीं कलेला त्यांत स्थानच नाहीं. अशा गोष्टी वाचतानाच मनोरंजन होते. त्याचा परिणाम मात्र मनावर टिकत नाहीं. दिवसेंदिवस अशा गोष्टी लिहीण्याचा व वाचण्याचा कंटाळा येत आहे. उदाहरणासाठींच या गोष्टीचा उल्लेख केला. कला आणि नीती, कला आणि जीवन या विषयावर व चर्चेवर वाद होतात. त्याचप्रमाणें कला आणि प्रचार याचा जर एकदां विचार होईल तर बरे. ललितवाङ्मयाचा उपयोग प्रचाराकडे करावा हे कोणीच नाकबूल करीत नाहीं. पण तो मुख्य हेतू नसावा. प्रचार हा मुख्य उद्देश धरून लिहीलेले वाङ्मय ललितकलेंत मोडू नये असें माझे म्हणणें आहे. केवळ वेषावरून पारख करण्यासारखे तें होईल. प्रचार हे कलेचे परिणाम आहे हे लक्षांत ठेवले पाहिजे. गोष्टी काय, कादंबऱ्या काय अगर नाटके काय यांतील पात्रें वर्तमान काळापुढें तसूभरही उतरूं शकत नाहींत. सत्यकथन हा ललितवाङ्मयाचा आत्मा आहे. आणि सत्यकथन म्हणजेच प्रचार होय असें मानावयास हरकत नाहीं. ललितवाङ्मयाचा

उपयोग प्रचाराकडे करावा असें मी म्हणतो तें याच अर्थानें. शारदा नाटक किंवा त्याच्या अलीकडे पलीकडे झालेली नाटकें आपण जर पाहिली तर तीं बहुतेक मतप्रचारासाठीं लिहीलेली दिसतील. पण त्या नाटकांतून ' सत्यकथन ' करण्याकडे किती तरी लक्ष पुरविले गेले आहे. तीं नाटके तशी असोत अथवा नसोत, कथात्मक वाङ्मयास भविष्यकालीन घटनात्मक गोष्टींचा आणि मतांचा प्रचार हा बराच वावडा आहे यांत शंका नाहीं. इंदूरच्या साहित्य संमेलनांत प्रो. चिंतामणराव जोशी यानी वाचलेल्या एका निबंधांत साहित्याला कलेचा सासुरवास होतो असे लिहीलेले आहे ! त्यांच्या स्वतःच्या वाङ्मयांसी हे त्यांचे मत ताडून पहाता लेखकाने केलेल्या विधानाबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. प्रो. चिंतामणराव जोशांच्या निबंधावर बरीच टीका करता येईल. या निबंधांत पूर्वीसारख्या अघळपघळ गोष्टी हल्लीं वाचावयास मिळत नाहींत अशी तक्रार केली आहे ! आजकाल कलात्मक गोष्ट लिहीण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते. स्थलैकता, कार्यैकता आणि कालैकता सांभाळण्याकडे लेखकवर्ग लक्ष देतो. पण तेवढ्यानेंच कलाविकास साधला असें होत नाहीं. आजच्या बहुतेक लघुकथा प्रणयात्मक घटनेनें खचलेल्या असतात हे खरे आहे व त्याविरूद्ध माझेही मत आहे. पण लक्षांत ठेवले पाहिजे कीं कोणत्याहि वाङ्मयांत प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टी पहा त्यांत अशाच गोष्टी विपुल असतात. आमच्या संसारांत आणि रोजच्या राहणींत व कार्यांत जसजसा बदल होत जाईल त्याप्रमाणें गोष्टीचे विषय व प्रसंग वाढत जातील, एऱ्हवीं नाहीं. अलीकडे नाविन्य आणि सुलभ प्रसिद्धीसाठीं कांहीं लेखक मजूर व शेतकऱ्यांच्या जीवनावर गोष्टी लिहूं लागलेले दिसतात ! या गोष्टीसंबंधीं प्रो. चिंतामणराव जोशी यानी व्यक्त केलेले मत वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे. मजूर आणि शेतकरी यांच्या जीवनातील प्रसंगावर

लिहावयाच्या गोष्टी स्वानुभवाच्या नसल्या तरी स्वतां पाहिलेल्या असल्या पाहिजेत.

लघुकथांचे संग्रह या सालीं प्रसिद्ध झाले असले तरी ती गेल्या सालपेक्षां कमी आहेत. 'आवडत्या गोष्टी' या संग्रहाचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. ह्या संग्रहांत एकूण अनेक लेखकांच्या गोष्टी असून आतांपर्यंतच्या कथावाङ्मयाचा हाच मोठा व वाखाणण्यासारखा प्रातिनिधिक संग्रह होय. मराठी कथावाङ्मयाचे सर्व गुणदोष या एका संग्रहाच्या वाचनानें समजून येतात. या संग्रहास प्रो. लागू यांनीं लिहीलेली प्रस्तावना मार्मिक, विद्वताप्रचुर व मार्गदर्शक आहे. या संग्रहाच्या सहाय्यानें लघुकथा वाङ्मयाच्या विकासावर उत्कृष्ट निबंध लहीता येईल. विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रमांत पुढें कांहीं वर्षे तरी या संग्रहाचा अखंड समावेश करावा लागेल. प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या गोष्टींचा दुसरा संग्रह 'सागराच्या लाटा' या नांवानें प्रसिद्ध झाला. मला वाटते प्रो. सरदेसाई यांनीं लघुकथा वाङ्मयाचा दर्जा आपल्या कलाकुशल लेखणीनें वाढविला आहे. 'कल्पवृक्षाच्या छायेत' या गेल्या साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पहिल्या संग्रहाप्रमाणेंच हा संग्रहही लोकादरास पात्र होईल. विशिष्ट मांडणी, मेचकी वर्णनें, रेखीव रचना हे गुण त्यांच्या गोष्टी मधून आढळतात. त्यांनीं हल्लीप्रमाणें प्रसंगाची विविधता राखून जर आणखी गोष्टी लिहिल्या तर मराठी भाषासेवकांत त्यांना मानाचे स्थान लाभेल. 'खेड्यातील स्वभावचित्रें' या पुस्तकांत गोष्टींचा संग्रह नसला तरी त्या एक प्रकारें समाजांतील कथाच म्हणावयास हरकत नाहीं. खेडेगांवांतील अनेक चालिरीतींची चित्रें सूक्ष्मपणें रेखाटली आहेत कोटीबाजपणा हा गुण लेखकांत बराच दिसतो. मांडणी व भाषा ओघवती व कसलेली वाटते. श्री. सोमण यांच्या या पुस्तकाचा सामाजिक इतिहास लेखकाला बराच उपयोग होईल.

मधूनमधून विनोदही साधला आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांच्या गोष्टींचा आणखी एक संग्रह श्री. ब्रह्मानंद मुकुंद नाडकर्णी ह्यानीं प्रसिद्ध केला. या 'दवबिंदू'ची चालचुणूक त्याच्या वडील भावंडाप्रमाणेंच आहे. श्री. पेंडसे यांच्या 'संगमां'त कथात्मक वाङ्मयाचाच अधिक भरणा दिसतो. या संग्राहास श्री. प्र. के. अत्रे यांनीं लिहिलेली प्रस्तावना मूळ पुस्तकांतील मजकुरापेक्षां अधिक वाचनीय आहे. श्री. वि. ल. बर्वे यांचा एक कथासंग्रह 'कोवळी पोफळे' या नांवानें मुंबईच्या रामकृष्ण बुकडेपो मार्फत प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहाची छपाई यासालीं प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही संग्रहापेक्षां कमी प्रतीची आहे व संग्रहही फारसा महत्वाचा नाहीं. सौ. मालतीबाई दांडेकर या लेखिकेनें आपल्या लघुकथा 'कथामालती' या नांवाच्या संग्रहांत समाविष्ट केल्या आहेत. सौ. आनंदीबाई शिर्के आणि प्रस्तुत लेखिका यांच्या गोष्टींची धाटणी बरीच सारखी आहे. वाङ्मयांत या संग्रहाला महत्वाचे स्थान जरी लाभले नाहीं तरी साधीभोळी रचना व क्षणभर करमणूक करण्याइतके घरगुति प्रसंगवैपुल्य 'कथा मालती'मध्यें आढळतें.

'दीपकळी' या प्रो. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या गोष्टींचा संग्रह यावर्षी प्रसिद्ध झालेल्या संग्रहांत पहिल्या प्रतीचा ठरतो. प्रासादिक भाषा, वेचक विचार व मुळकल्पनेचा परिपोष करण्यासाठीं बनवलेली घटना लेखिकेच्या योग्यतेची साक्ष पटविते. हें पुस्तक श्री. प्र. श्री. कोल्हटकर यांनीं प्रसिद्ध केले आहे. याच प्रकाशकांनीं गेल्यासालीं 'कृष्णाबाई' या लेखिकेचा 'मानसलहरी' हा उत्कृष्ट कथासंग्रह प्रसिद्ध केला होता. औंधच्या कु. अक्का पंतप्रतिनिधी हिनें 'हिमकालिका' या नांवाचा अनेक लेखकांच्या गोष्टींचा एक लहान संग्रह प्रसिद्ध केला आहे. श्री. लोहोकर यांच्या गोष्टी 'विसावा' या नांवानें स्वतंत्र पुस्तकांत पुनर्मुद्रित झाल्या आहेत.

याखेरीज ' कथासुवर्ण ' ह्या नांवाचा अनेक लेखकांच्या कथा-संग्रहाची भर पडली. ' फुलोर ' आणि ' पंखरण ' या नांवाच्या पुस्तकांत केवळ गोष्टी नसल्या तरी मी त्यांचा समावेश सोयींसाठीं याच विभागांत करतो. या साली कालेजांतून स्थापन झालेल्या वाङ्मय मंडळानी हे दोन संग्रह प्रसिद्ध केले. पहिला संग्रह नागपूर येथील एका कॉलेजांतील वाङ्मय मंडळातर्फे प्रो. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध झाला. दुसऱ्याचे प्रकाशन मुंबई येथील सेंटझेविअर कॉलेजांतील मंडळामार्फत प्रिं. प्रल्हाद केशव अत्रे यांच्या अध्यक्षतेखालीं झाले. मुंबईचे लेखक श्री. के. मु. नाडकर्णी यांच्या गोष्टींचा एक संग्रह 'हृदयनिनाद' या नांवानें बकुलमालनें प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकाच्या जाहिरातींत येणारा श्री. वि. स. खांडेकर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेंतील उताराच येथें देतो. म्हणजे या 'हृदयनिनाद' संग्रहासंबंधीं वेगळे असें लिहि-ण्याचे कारण नाहीं. "श्री. नाडकर्णी यांची गणना साहित्यकांतील कलमी आंब्यांत होवो वा न होवो ! कित्येक रायवळ आंबे प्रसंगीं कलमी आंब्याहूनहीं रसमधुर असतात असा अनुभव येतोच कीं नाहीं ? त्यांच्या कथालेखनांतले विविधगुण अधिक स्पष्टपणें प्रगट होतील, तर मराठी कथालेखकांत त्याना स्वतःचे स्थान मिळविणें कांहीं अशक्य नाहीं, असे श्री. खांडेकर यानीं आपलें मत दिले आहे. या खेरीज श्री. नी. म. केळकर, श्री. साठे इत्यादिकांचे छोटेसंग्रह प्रसिद्ध झाले आहेतच.

आजचे लघुकथा लेखक बहुतेक हौशी आहेत. मजेसाठीं लिहा-वयाचें एवढेंच त्यांच्यापुढें लेखनाचे वैशिष्ट असते. कथावाङ्मय निर्माण करण्यांतच ज्यांच्या लेखनशक्तीची करामत दिसते व तेवढ्या वाङ्मयांत आपण नांव लौकिक मिळवूं असें ध्येय ज्या लेखकांपुढें आहे असे मला दोनच लेखक दिसतात. एक श्री. य. गो. जोशी

व दुसरे प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई आणि म्हणूनच अनेक लेखकांनीं आपल्या गोष्टी पुस्तकरूपानें जरी संग्रहीत केल्या तरी लघुकथा-लेखन हेच ज्याचे वैशिष्टय अशा लेखकांच्या संग्रहाला मी अधिक महत्व देतो. कथावाङमयांत श्री. वि. स. खांडेकर यांनींही अव्वल दर्जाचा लौकिक मिळविला आहे. पण कथा वाङ्मयाच्या 'बंड गार्डन' मधून ते कादंबरी वाङ्मयाच्या 'ऐंप्रेस गार्डन' मधेंच अधिक झुलणारझुलणार असा रंग दिसतो; मराठी साहित्यांत आतांपर्यंत लघुकथांची बरीच भर पडली आहे. याच ठिकाणी 'कला' या मासिकानें काढलेल्या लघुकथा खास अंकाचा उल्लेख करावयास हरकत नाहीं. हा अंक छपाईच्या दृष्टीनें चांगला आहे; मात्र बहुतेक गोष्टी वाखाणण्यासारख्या नाहींत. नाट्यवाङ्मयांत या साली महत्वाची अशी भर पडली नाहीं. दिवसेंदिवस ह्या विभागाचे वैशिष्ट कमी होत आहे असें दिसते. नाटकाची पुस्तकें वाचण्याकडे आमच्या वाचकवर्गाचा मुळींच कल नसतो. रंगभूमिवर नाटक असेल तोंपर्यंत पुस्तकांना मागणी असते. रंगभूमीवर नाट्यकृति येणें दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. एक दोन कंपन्याखेरीज मराठींत नांवाजण्यासारख्या नाटक कंपन्या आतां राहिल्या नाहींत. मागील साली मी असे स्पष्ट लिहिले होते कीं चित्रपटामुळें रंगभूमी मागें पडत चालली आहे. ही स्थिति या सालींही सुधारली नाहीं. उलट पूर्वीपेक्षां वाईट झाली. बालमोहन संगीत मंडळानें प्रिं. प्र. के. अत्रे यांची नाटकें रंगभूमिवर आणण्यास सुरवात केल्यापासून ह्या कंपनीचा लौकिक वाढला. पण एकटी एक कंपनी कितीशी पुरी पडणार ! या कंपनीनें जाहिराती देतांना रंगभूमि मरणार किंवा काय या वादग्रस्त प्रश्नास आमचीं नाटकें पहा म्हणजे आपोआप उत्तर मिळेल असें प्रसिद्ध केलें होते. पण कांहीं झालें तरी ती जाहिरात आहे. तेव्हां त्यांत कितीसे तथ्य

असणार हें स्पष्ट करून सांगण्याचे कारण नाहीं. प्रि. अत्रे याचे 'भ्रमाचा भोपळा' हे नाटक याच कंपनीनें यासाली रंगभूमीवर आणलें 'भ्रमाचा भोपळा' हें केवळ करमणुकीच्या हेतूनें लिहिलेले नाटक आहे. कांहीं शिकवावे असा नाटककाराच्या मनांतही उद्देशही नव्हता. त्यामुळें या नाटकांत वास्तवतेच्या दृष्टीनें दोष असले तरी भरपूर करमणूक करणारी मराठींत जी दोन चार नाटके आहेत त्यांत 'भ्रमाचा भोपळा' हें एक सरस नाटक या सालीं प्रसिद्ध झाले. महाराष्ट्राची मनोभूमीच कांहीं और खरी! महाराष्ट्रीयांना विनोद समजत नाहीं असे म्हणावें तर तेही चुकीचे ठरेल व समजतो असें म्हटले तर तसेही दिसून येत नाहीं! 'भ्रमाचा भोपळा' या नाटकावर 'ज्ञानप्रकाश' मध्यें जो संपादकीय चार कालमी लेख प्रसिद्ध झाला त्यांत अशा प्रकारच्या नाट्यकृतीचे विद्वत्ताप्रचूर समर्थन केले आहे. वाचकांनीं व टीकाकारानीं तें अवश्य वाचावे. मला स्वतांला 'भ्रमाचा भोपळा' हे नाटक फार आवडते.' 'भावबंधन' या कै गडकऱ्यांच्या नाटकाशी तुलना करून पहावी. ज्या वेळीं 'भावबंधन' हें नाटक रंगभूमीवर आले त्याचवेळीं 'भ्रमाचा भोपळा' हे नाटक रंगभूमीवर आले असते तर प्रेक्षकांच्या उड्या याच नाटकावर अधिक पडल्या असत्या. 'भ्रमाचा भोपळा' हे नाटक कांहीं बाबतींत 'भावबंधन' या नाटकापेक्षाही सरस आहे. या नाटकावर बऱ्याच टीका झाल्या आहेत. नाटकाचे बाबतींत काय किंवा गोष्टींच्या बाबतीत काय चौर्याचा चटकन आरोप करून लेखकांचे महत्व कमी करण्याची हीन बुद्धी अनेकांकडून दाखविली जाते. अत्रे यांच्या नाटकांवर असा आरोप करण्यांत आलेला होता. याबाबतींत थोडेसें स्पष्ट लिहिलेलें बरें. आरोप करणारे कोणी निघाले तरी ते प्रसिद्ध करणाऱ्यानीं सत्या-सत्यतेचा विचार केला पाहिजे. वाटेल त्यानें उठावे आणि म्हणावे कीं, कल्पना व

संविधानक चोरले आहे आणि त संपादकानें निर्लज्जपणानें छापावें ही फार खेदाची गोष्ट होय ! असे लिहिणें छापणें हे मागून वार करण्यासारखे होय. एकाद्याचे यश कलंकित करण्यास हा वर्तमानपत्रांच्या हातीं असलेला अगदीं सोपा इलाज आहे. एकाला सुचलें तसे दुसऱ्याला सुचत नसलेच पाहिजे असा का कोठें नियम आहे ? प्रसिद्ध नाटककार व नाटयटीकाकार सेंट जॉन आयर्विन यानें स्वतांचा म्हणून दिलेला अनुभव पुढीलप्रमाणें आहे. सेंट जॉन आयर्विन म्हणतो कीं,

I remember meeting Mr. Somerset Manghan one after-noon, and telling him the story of a play I had just written. He listened to me with a patience that was heroic, and then said, "That's a story of my play, 'The Constant Wife", which is to be produeed next week.' Collapse of me ! This incident causes me to remark that charges of plagiarism, in my experience, nearly alwayes turn out to be unfounded. Certain themes are in the air, and it is inevitable that they should occur simultaneously in several minds. There is no copyright in ideas.

वरील मत आमच्या संपादकांनी व लेखकांनी लक्षांत ठेवलें पाहिजे. विशेषतः अत्रे यांच्या बाबतींत अशा प्रकारचा म्हणजे चौर्याचा आरोप करण्याचा कांहीं हलकट वृत्तीच्या लोकांनीं जाणूनबुजून केलेला ऐकला म्हणून त्याचा खुलासा या ठिकाणीं केला आहे. आपल्यांत कर्तृत्व नाहींच, निदान दुसऱ्याचा पराक्रम पाहून आनंदित होण्याइतकाही आमच्यांत उदारपणा नाहीं याचे हे उत्कृष्ट उदाहरण होय. तसेच मला संविधानक स्वप्नांत सुचले असें कोणी म्हणेल तर त्याबद्दलही चेष्टा करण्यांत येत; पण स्वप्नांत संविधानकेंच काय, संपूर्ण कविताही तयार होतात व जागे झाल्यावर त्यांचीं नोंद

होते. सुप्रसिद्ध लेखक किरात यांनीं स्वतांचे अनुभव देतांना एक कविता स्वप्नांत तयार झाली व जागे झाल्यावर उतरून काढली असें प्रसिद्ध केलें आहे. आंग्ल ग्रंथकारांचीही अशी उदाहरणें देता येतील. असो, ' भ्रमाचा भोपळा ' हें नाटक ज्यावेळीं रंगभूमीवर आले त्याच वेळीं ' पैसाच पैसा ' हे श्री. माधवराव जोशी यांचे नाटक प्रसिद्ध झाले. श्री. जोशी हे एक बुद्धिमान व सूक्ष्म-निरक्षक नाटककार आहेत यांत शंकाच नाहीं. बुद्धीमत्ता आणि निरक्षणशक्ती हे दोन्ही गुण याही नाटकांत उतरले आहेत. पण ही नाट्यकृती तंत्रदृष्टया न साधल्यामुळें नाटक परिणामकारक झाले नाहीं. या नाटकांत श्री. जोशी यांनीं हल्लीचा ' प्रोफेसर वर्ग ' व ' संपादक वर्ग ' यांच्यावर बरीच टीका केली आहे. या सालीं प्रसिद्ध झालेली महत्वाची अशी हीं दोनच नाटके होत. 'बायकांचे बंड' ह्या गद्य नाटकास यंदा संगीत पहेराव चढविण्यांत आला. या खेरीज आणखी पांच दहा नाटके प्रसिद्ध झाली. श्री. दा. प्र. केतकर यांचें ' हरिहर युद्ध ' हे मेळ्यानें प्रसिद्ध केले व गणपति उत्सवांत त्याचा प्रयोगही झाला. मराठींतील एक विनोदी लेखक श्री. वा. रा. टिपणीस यांचे 'सावकार', श्री. ओक यांचे 'यज्ञमंडप', ' मजूरांच्या साम्राज्यांत ' इत्यादी कांहीं नाटके नाट्यसमाजाकडून एक दोनदा रंगभूमीवर झळकली. श्री. गंगाधर विश्वनाथ गोखले यांनीं लिहिलेल्या ' सैरंध्री ', ' महारवाडा ' इत्यादी छोटीं नाटिका या सालीं प्रसिद्ध झाल्या आहेत. याखेरीज ' त्याग ' हें औंधच्या दाभाड्यांचे नाटक, ' नवे डोळे ' हें नाशिकच्या श्री. रहाळकरांचे नाटक, त्याचप्रमाणें कोल्हापुरचे श्री. चव्हाण यांचे शीलसौभाग्य व नागपूरकडील श्री. पंडित यांचे ' सामाजिक सीमोल्लंघन ' हे नाटक शिवाय ' बायकी कावा ' ' समईतील ज्योत ' इत्यादी नाटकेंही पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली आहेत. श्री. फाटक शास्त्री यांची

'घरजावई' इ. नाटके यासालीं प्रसिद्ध झाली. ज्या नाटकांना रंगभूमीवर येण्याचे भाग्य लाभले नाहीं. ती नाटकें निदान वाङ्मयाच्या दृष्टीनें तरी चांगली असावयास लागतात. हीं नाटकें वाचतांना वाचकाना समाधान होणें नाट्यकृतीच्या विशिष्ट गुणांवर अवलंबून आहे. वरील बहुतेक नाटकें वाचूनही आपण कांहीं विशेष चांगले वाङ्मय वाचले असे वाटत नाहीं. कादंबऱ्या आणि लघुकथा वाचण्याची आवड आहे त्याप्रमाणें नाटके वाचण्याची गोडी वाढल्यास नाटक कंपन्यांची गरज रहाणार नाहीं व लेखकांच्या कृतीचे समाजाकडून योग्य चीज केले जाईल. पण आज तरी तशी स्थिति नाहीं ही खेदाची गोष्ट होय. त्यामुळें अनेक लेखक मागे पडले आहेत हे मला ठाऊक आहे. यासालीं नाटकांवर पाहिजे तितकी सविस्तर व चिकित्सक परीक्षणें प्रसिद्धच झाली नाहींत. मात्र 'घराबाहेर' ह्या नाटकावर निर्भिडने एक स्पेशल अंक काढला हे येथें नमूद केलें पाहिजे. या अंकांतील प्रिं. अत्रे यांच्या लेखाबद्दल मागे उल्लेख आलाच आहे. याखेरीज या अंकांत एक दोन लेखकांचे लेख वाचनीय आहेत. 'प्रतिभे' मध्यें 'कृष्णाबाई' या लेखिकेनें 'घराबाहेर' या नाटकावर एक चांगला लेख लिहिलेला वाचला; नाट्यसंमेलन झाले; पण त्यांत नाट्यकलेच्या दृष्टीनें मार्गदर्शक अशी कांहींच चर्चा झाली नाहीं. 'संपूर्ण किर्लोस्कर' हे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल प्रकाशकांचे अभिनंदन केले पाहिजे. अधुनिक नाट्यकलेच्या लोकप्रियतेचे खरे पुरस्कर्ते कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांची सर्व नाटके आतां एकत्रित वाचण्याची चांगली सोय झाली. गेल्यासालीं सूचना केल्याप्रमाणें 'संपूर्ण कोल्हटकर' प्रसिद्ध होणार किंवा नाहीं कळत नाहीं. त्याचप्रमाणें 'संपूर्ण गडकरी' प्रसिद्ध व्हावा असेहि कोणास वाटणार नाहीं ? महाराष्ट्र-साहित्यसंमेलनांतून नाट्य वाङ्मयाकडे बरेंच दुर्लक्ष केले जाते, असें

दिसत आहे. नाहीं म्हणावयास बडोदें येथील संमेलनांत श्री. य. ना. टिपणीस यांस या विभागाचें अध्यक्षपद देण्यांत आले होते. तात्पर्य, चालू साल नाटयवाङ्मयाचें दृष्टीनें प्रतिगामी आहे. या विभागाची दौलत वाढली असली तरी श्रीमंती वाढली नाहीं.

काव्याचा विचार झाला, लघुकथांचा विचार झाला, नाटकांचा विचार झाला, आतां कादंबऱ्यांचा विचार करूं. कादंबरीकार म्हणून प्रो. फडके, श्री. भा. वि. वरेरकर, श्री. वि. स. खांडेकर, श्री. वि. स. गुर्जर आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे लेखक विशेष प्रसिद्ध आहेत. उमरावतीस असलेले श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांची 'वृंदा' ही कादंबरी प्रसिद्ध झाली; पण ती अपूर्ण आहे. श्री. गडकरी यांचा कांहीं ठिकाणीं प्रख्यात लेखक म्हणून उल्लेख केलेला वाचला; पण ही कादंबरी वाचून त्यांच्या अंगीं कादंबरीकारास अवश्य असलेले गुण नसावेत असा माझा समज झाला आहे. विद्यासंपादनार्थ पाश्चात्य देशांत जाणाऱ्या हिंदी तरुणांची मनोभूमिका कशा प्रकारची असावी याचा आदर्श दाखविण्याच्या उद्देशानें 'वृंदा' ही कादंबरी लिहिण्यांत आली आहे. या कादंबरीचे कथानक विविध घटनात्मक असले तरी वाचकांना त्यामुळें नवीन असे कांहीं वाटणार नाहीं. शिवाय मानसशास्त्राचे साधे नियमही कांहीं ठिकाणीं न पाळले गेल्यामुळें अनेक ठिकाणीं प्रबुद्ध वाचकांचा विरस होतो. अलौकिकता ही ध्येयनिदर्शनाचे हेतूनें लिहिलेल्या कादंबरींत असल्यास तो दोष नव्हे असें कादंबरीकारांनीं आपल्या प्रस्तावनेंत लिहिले आहे. क्षणभर हे विधान मान्य केलें तरी नैसर्गिक नियम हे कांहीं इतक्या झपाटयानें बदलतात असें वाटत नाहीं. सूर्यही पूर्वीपेक्षां कांहीं अंशानें जेथें कलला तेथें नैसर्गिक रचनाही बदलू शकेल, पण ती लेखकाच्या कल्पनासृष्टींत येण्याइतकी खास जवळची नाहीं. 'वृन्दा' हीचे जे थोडेसे चरित्र या भागांत

आले आहे, त्यावरून ती आदर्श महिला मानावयास कोणी तयार होईल काय ? श्री. गडकरी हे आपणास हरी नारायण आपटे यांच्या परंपरेंतील समजत असतात. पण हरीभाऊंचे अनुकरण केवळ विस्तृत विवेचन व कथानकाची लांबण एवढ्या पुरतेच त्यांनीं केलेले दिसते. ही कादंबरी बरीच मोठी आहे. छपाई विशेष चांगली नाहीं. यांतील कथानकांतील हालचाली विलायतेंत झाल्याचे दाखविले असल्यानें कादंबरीच्या ह्या पूर्वार्धास 'विलायतखंड' असें मानण्यांत आले आहे. पाश्चिमात्य वातावरणाचे बरेचसें चित्रण डॉ. केतकरांच्या एका कादंबरींत आले होते. तेथील हालचालीचे वर्णन करणारी 'वृंदा' ही मराठीमधील दुसरी कादंबरी होय. प्रो. फडके यांची 'उद्धार' ही कादंबरी या सालीं प्रसिद्ध झाली. ही कादंबरी 'किर्लोस्कर' मासिकांतून क्रमशः येत होती. खपाच्या दृष्टीनें या सालीं 'उद्धार' कादंबरीचा दुसरा नंबर लागतो. प्रो. फडके यांचे बहुतेक ललितकलात्मक लेखन तरुणतरुणींच्या हंसण्या-खिदळ्याचें म्हणजे प्रणयात्मक असते. या कादंबरींतील कांहीं प्रसंग अश्लील असल्याची ओरड झाली होती. प्रो. फडक्यांचे बहुतेक गुण-दोष याही कादंबरीत आले आहेत. ही कादंबरी लेखकानें कुमारी रत्नप्रभा रणदिवे हीस प्रीतीपूर्वक अर्पण केली आहे. 'उद्धार' या कादंबरींतील पात्रांचे मनोविश्लेशण मात्र शास्त्रशुद्ध दिसते. आणि त्या दृष्टीनें विचार केला, तर पात्रांचा स्वभाव-परिपोष व कृतींचा एकमेकाशीं संबंध प्रो. फडके कौशल्यानें खुलवितात हे जितके खरे तितकेच तें वर्णन शरीरशास्त्र व मानसशास्त्र यांचे अध्ययन करून लिहीलेले असते हेंही खरे होय. तरुण आणि तरुणी अथवा यांच्यांतील प्रणयप्रसंग व प्रणयविचार इतक्या शास्त्रशुद्धतेनें कादंबऱ्यांतून मांडणारे प्रो. फडके हेंच मराठींतील पहिले कादंबरीकार होत.

'नंदादीप' ही प्रो. य. ग. नाईक यांची एक मोठी कादंबरी या साली प्रसिद्ध झाली आहे. 'विद्यार्थी' या टोपण नांवानें एका काळीं लघुकथा लिहिणारे म्हणून प्रो. नाईक कित्येकांच्या परिचयांचे असतील. त्यांची ही कादंबरी अनेक दृष्टींनें वाखाणण्यासारखी आहे; मात्र या कादंबरींतील कांहीं प्रसंग व पात्रे अस्वाभाविक भासतात; त्याला लेखकानें उत्तर दिले आहे कीं, काल्पनिक गोष्टींत अशक्य गोष्टी संभवनीय दाखविणें हेच लेखकाचे काम असते. पण हें विधान मात्र पटत नाहीं. अशक्य गोष्टी संभवनीय दाखवावयाच्या तर स्वभाव परिपोष व रचनाचातुर्य वगैरे विशिष्ट नियम यापुढें जाळूनच टाकावें लागतील. प्रो. नाईक यांनीं आपल्या विधानांची एकदा सविस्तर चर्चा केली तर बरें होईल. प्रो. नाईक यांनीं आपलें लेखन सतत चालू ठेवलें तर त्यांना लेखकाचा लौकिक दुर्मिळ नाहीं. सुप्रसिद्ध लेखक श्री. वि. सी. गुर्जर यांची 'संगम' या नांवाची एक कादंबरी पुण्याच्या मॉडर्न बुक डेपोनें प्रसिद्ध केली आहे. ही कादबरी डॉ. रविंद्रनाथ टागोर यांच्या 'योगायोग' या उपन्यासाचा अनुवाद होय. श्री. गुर्जर भाषांतर अथवा रूपांतर करण्यांत इतके प्रवीण आहेत कीं त्यांची कोणतीही कादंबरी घ्या तींत भाषेचा ओघ कोठेंच अडखळल्यासारखा वाटत नाहीं. साधी-सापी रचना करण्यांत श्री. गुर्जर हे तरबेज आहेत यांत शंका नाहीं. परवाङ्मयातील उत्कृष्ठ पुस्तकांचे अनुवाद मराठीतून होतील तितके बरें. या दृष्टीनें 'संगम' ही कादंबरी लिहील्याबद्दल मी श्री. गुर्जर यांचे मी अभिनंदन करतो, अनुवादाची योग्यता कमी नव्हे व मराठींत कलावंत अनुवादक जितके निर्माण होतील तितके तूर्त पाहिजेत. बंगाली वाङ्मयाचा हा एक नमुना वाचकांनीं सवडीप्रमाणें एकवार वाचण्यासारखा आहे. त्याच प्रमाणें 'कथाकदंब' यां नावाचा टागोर यांच्या गोष्टींचा संग्रहही वाचावा. अनुवादात्मक व स्वतंत्र

लेखन या संबंधीं आरंभीं गुर्जरानीं काढलेले उद्गार सर्वस्वी खरे आहेत.

'आत्मदान' या श्री. के. आर. पुरोहितांच्या कादंबरीचा उल्लेख केला पाहिजे. केवळ लेखनावर संसार करणारे मराठींत जे लेखक आहेत त्यापैकीं श्री. पुरोहित होत. आंतापर्यंत त्यांच्या तीन चार कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्या वाचल्या म्हणजे श्री. पुरोहित यांचे या लेखन प्रांतातील स्थान निश्चित समजते. समाजांतील हरघडी दृष्टीस पडणाऱ्या सामाजिक चित्रांचे नमुनेदार मिश्रण करून त्यावर कादंबरी लिहीण्याचे कसब श्री. पुरोहित यांच्या आंगीं असलेले दिसते. पूर्वीप्रमाणेंच 'आत्मदान' या कादंबरींत लेखकाची शुद्ध व ओघवती भाषा वाचतांना वाचकांची भरपूर करमणूक झाल्याखेरीज रहाणार नाही. श्री. पुरोहित हे मराठीतील आजचे एक लोकप्रिय कादंबरीकार आहेत; मात्र ही कादंबरी छपाईच्या दृष्टीनें इतर कादंबऱ्या इतपत तरी चांगली निघावयास पाहिजे होती. 'अनियमित जग' इत्यादी कादंबऱ्यांनीं प्रसिद्धीस आलेल्या लेखिका कुमारी कुमुदिनी प्रभावळकर बी. ए. यांची 'निर्माल्यातील कळी' या नांवाची एक कादंबरी या सालीं प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीचे कथानक वेश्याव्यवसायविषयक असले तरी त्यांत अनेक दोष आहेत व त्यामुळें ही कादंबरी कु. प्रभावळकरांच्या इतर कादंबऱ्याप्रमाणें उतरली नाहीं. प्रचारात्मक भाग बराच असल्यानें व कांहीं प्रसंग लेखिकेला वर्णन करणेंच कठीण असल्यामुळें ही कादंबरी वाचताना जरासा कंटाळाच येतो. श्री. दत्त रघुनाथ कवठेकर या नांवाचे एक लेखक कादंबरीकार म्हणून या सालीं उदयास आले. त्यांची 'विखुरलेले प्रेम' ही कादंबरी पहिलीच असून सरस आहे यांत शंका नाहीं. दोन तरुणांवर प्रेम बसले असता तरुणींच्या मनाची होणारी मनस्थिती व वर्तन यांचे चित्रण श्री. कवठेकर यानीं खरेंच चांगलें केलं आहे. विषय रम्य व तितकाच

महत्वाचा असला तरी या विषयावरील कादंबरीच्या कथानकाचा शेवट कसा करावा व आज नाहीं तरी भविष्यकाळीं हा प्रश्न कसा सोडला जाईल याचा निकाल आज देणें कितीतरी कठीण आहे. आणि या कठीण प्रश्नाला बगल देण्यास उत्तम उपाय म्हणजे नायिकेला आपल्या वर्तनाचा होणारा पश्चाताप दाखविला म्हणजे काम झाले ! रा. कवठेकर यांनीं तेंच केले आहे. पण पश्चातापदग्ध नायिका दाखविल्याने उदात्तपणा कादंबरींत आणता आला तरी तें समाजाचे मात्र चित्र होत नाहीं. उलट अशी पश्चातापाने झुरणारी स्त्रीच सहसा दिसावयाची नाहीं. या कादंबरींतील मुख्य नायिका शालन हिची मनस्थिती लेखकानें चांगली रंगवून आदर्श शेवट केला आहे हें खरें, पण नवमतवादा-साठी नव्हे तर सत्यकथनाचे दृष्टीनें समाजांत या उलटच वागणाऱ्या अनेक व्यक्ति दिसत असतात त्याचा विचार लेखकानें केला नाहीं. शिवाय या कादंबरीचा दुसरा पण महत्वाचा दोष म्हणजे कादंबरी निष्कारण लांबली आहे. नव्या लेखकांकडून हा दोष हटकून घडतो. श्री. कवठेकरांच्या पुढील कृतींतून हें वैगुण्य आढळणार नाहीं अशी आशा वाटते. मात्र श्री. कवठेकर या लेखकाबद्दल मला मोठी आशा आहे.

अहमदनगर येथील वाङ्मयोपासक मंडळानें 'स्नेहबंधन' ही एक कादंबरी प्रसिद्ध केली. कादंबरी मोठी आहे एवढाच ह्या कादंबरीचा विशेष होय, कादंबरीच्या विषयाचे महत्व मात्र मोठे आहे. त्या शिवाय 'विरलेले वस्त्र' ही सदाशिव ॲडव्होकेट यांनीं लिहीलेली कादंबरी' 'हृदयाचे कढ' ही एका लेखिकाची कादंबरी, 'विलक्षण चौर्य' ही श्री. गो. गं. पोतदार यांची कादंबरी 'दुहेरी संसार' ही श्री. चं. ग. दिक्षीत यांची कादंबरी इत्यादि पुस्तकांची या विभागांत भर पडली. 'जाळ्यांतील माशा' ही श्री. हडप यांनी

बुवाबाजीवर एक कादंबरी प्रसिद्ध केली. परचुरे पुराणिक आणि मंडळीनें आपल्या कादंबरीमय पेशवाईचा पुढील भाग या सालीं प्रसिद्ध केला नसला तरी सांगलीचे एक लेखक श्री. साधुदास यांच्या ऐतिहासिक कादंबरीमालेचे दुसरे पुष्प 'मराठेशाहीची नवप्रतिपदा' ह्यासालीं प्रसिद्ध झाले. श्री. हडप यांच्या कादंबऱ्या-पेक्षां ही कादंबरी अधिक सरस असून इतिहासाला धरून लिहिण्याचा अभिनंदनीय प्रयत्न केला आहे. मात्र हडपांच्या भाषेचा चटकदारपणा या कादंबरीतून नाहीं. श्री. साधुदास यानी ही माला मात्र पुरी केल्यास बरेंच उपयुक्त कार्य होईल. साधुदास हे सांगलीचे रहिवाशी व सांगली दरबारचे राजकवि आहेत. असा विद्वान साहि-त्यिक सांगली येथें असणें हे सांगलीस एक भूषण होय. सांगलीच्या राजेसाहेबांनीं मनांत आणल्यास साधुदासांची ही ऐतिहासिक कादंबरीमाला दरबारमार्फत अथवा खाजगींतून प्रसिद्ध करण्यास कांहीं अडचण भासणार नाहीं.

भारतगौरवग्रंथमालेंतर्फे प्रसिद्ध झालेली 'पराधीन' ही कादंबरी चांगल्यापैकीं आहे. स्त्रियांना अस्तित्वात असलेल्या कायद्यांत कोणते हक्क आहेत हे समजून घेण्यास या कादंबरीचा फार उपयोग होईल. ही कादंबरी बडोद्याचे वकील श्री. वासुदेव विनायक जोशी यानीं लिहिली आहे एवढे सांगितले म्हणजे त्यांतील विषयाचें प्रतिपादन किती बिनचूक झाले असेल ह्याची मराठीच्या वाचकाना पुन्हां ओळख करून देण्याचे कारण नाहीं. कथानकाची गुंफणही साधी असून चटकदार आहे. श्री. भा. वि. वरेरकर यांची 'उघड झांप' ही कादंबरी मुंबईच्या रामकृष्ण बुकडेपोनें प्रसिद्ध केली. स्त्रीस्वातं-त्र्याच्या नांवावर उनाड व चवचाल स्त्रीपात्रें निर्माण करण्याचे मनोवांच्छित कार्य लेखकानें याही कादंबरींत साधले आहे. पुरुष हलकट व स्त्री तेवढी निष्पाप हे पुन्हा पुन्हा दाखविण्यांत ज्यानें

आपली लेखणी आयुष्यभर झिजवली असे श्री. वरेरकर हेच एक कलावंत लेखक मराठींत आहेत. पुरुष समाजावर लेखकानें वेळोवेळीं ओढलेले कोरडे खरे मानले तरी त्यांतून स्त्री निष्कलंक सुटते हें सांगण्याचा इट्टहास निःसंशय एकतर्फी होय. 'उघडझाप' ही कादंबरी लिहिण्यांत लेखकानें इतका निष्काजीपणा दाखविलेला दिसतो कीं त्यामुळें पुढील पुस्तक लोक आवडीनें घेणे जरा कठीणच. वेळ मारून नेणें हीसुद्धा एक कला असली तरी लेखन कलेशी तिचे वैर आहे हे मी श्री. भा. वि. वरेरकर यांच्या निदर्शनास आणतो. कादंबरी विभागांत वर दिलेल्या पैकीं दोन तीन कादंऱ्यांच काय त्या महत्वाच्या आहेत. 'भंगलेले देऊळ' ही एक चांगली कादंबरी श्री. माडखोलकर यानीं लिहिली. 'सम्राट अशोक' ही लोकप्रिय कादंबरी आतापर्यंत मिळत नव्हती. या सालीं तिची दुसरी आवृत्ती छापली. या कादंबरीचे लेखक श्री. शहा यांच्यांत कादंबरीकाराचे बरेंच गुण आहेत. ते पुन्हा लिहू लागतील तर या विभागांत चांगली भर पडेल. 'उषा' नांवाची कादंबरी प्रसिद्ध करण्याचे त्यानी जाहीर केले आहे. विरलेले स्वप्न' हे 'प्रसिद्ध लेखिका विभावरी शिरूरकर बी.ए. हिचे पुस्तक या सालीं प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकाचाही खप जवळजवळ 'उद्धार'या कादंबरी इतकाच झाला. ही एक संपूर्ण भावकथा असून अभिनव पद्धतीनें लिहिली आहे. मेचके शब्द वापरावयाचे हा एक महत्वाचा गुण या भावकथेत दिसून येतो. या सालीं प्रसिद्ध झालेल्या ललितवाङ्मयांत या पुस्तकाचा नंबर पहिला लागतो यांत शंका नाहीं. कांहीं वाचकांना हें स्वप्न आवडले नाहीं आणि तसें होणें शक्य आहे; कारण या पुस्तकांतील आचार व विचार प्रदर्शित करण्याची रीत भारदस्त व उच्च अभिरुचीच्या आणि उच्च विचारांच्या लोकानांच अधिक रम्य वाटेल.

मराठींत चरित्रें व तीही चटकदार व उद्बोधक अशी कोणी लिहिलींच नाहींत. चरित्रविभागांत मराठीवाङ्मय बरेंच मागें आहे. याचें विस्तृत समालोचन प्रो. बनहट्टी यानीं याच साली प्रसिद्ध झालेल्या 'अर्वाचीन मराठी साहित्य' या पुस्तकांत केले आहे. शक्य असेल त्यानें तें एकवार दृष्टी घालून अवश्य घालावे. या साली त्यांतल्या त्यांत चांगलें असें 'अरविंदबाबू घोष' यांचे चरित्र प्रसिद्ध झाले. हें चरित्र श्री. पु. बा. कुळकर्णी यानीं लिहिलेले आहे. श्री. कुळकर्णी याना चरित्र लेखनाची बरीच आवड असल्यानें त्यांचे पुस्तक श्रमपूर्वक लिहिलेले असते. पंडित यांचे चरित्र श्री. कर्नाटकी यानीं प्रसिद्ध केले. 'गोविंदसुता' चे चरित्र प्रसिद्ध झाले आहे. केशव भिकाजी ढवळे यानीं रिसायतकार रावसाहेब सरदेसाई यांच्याकडून शहाजी, शिवाजी व संभाजी याची छोटी चरित्रें लिहून घेतली आहेत. चरित्रात्मक वाङ्मयांत या साली लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेल्या 'स्मृति चित्रांच्या' दोन्हीं भागास अग्रस्थान दिले पाहिजे. कविवर्य टिळकांचे चरित्र या विभागांत संपूर्ण करण्यांत आले आहे. सरळ व सोपी भाषा, आकर्षक लेखनशैली व चटकदार मांडणी या मुळें हे तिन्ही भाग मराठी वाङ्मयास भूषणभूत होऊन राहतील यांत शंका नाहीं. 'संगीत शास्त्रकार व कलावंताचा इतिहास' हें या सालीं श्री. ल. द. जोशी यांनीं लिहिलेलें पुस्तक एका दृष्टीनें अपूर्व होय. या पुस्तकांत शास्त्रकार, ग्रंथकार, धृपद, धमार, ख्याल, टप्पा, ठुमरी, लावणी वगैरे सारख्या चीजा गाणारे कलावंत व बीन, सतार, सुरसिंघार, रबाब, जलतरंग हार्मोनियम, पखवाज, तबला वगैरे वाद्ये वाजविणारे वादक आणि नृत्यकलेंत नांव मिळवणारे नर्तक अशा सुमारें ४५० वर व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश झाला आहे. अशा प्रकारचे चरित्रात्मक माहिती देणारे मराठींतील तरी हेंच पहिले पुस्तक होय. संगीत

शास्त्रावर मराठींत नांव घेण्यासारखीं पुस्तकें नाहींत. ' भारतीय संगीत ' या नांवाचे एक नियतकालिक अलीकडे निघू लागलें आहे. या मासिकाच्या द्वारें संगीत शास्त्रावर पुस्तकें प्रसिद्ध होतील तर बरें होईल. वरील मासिक भारत गायन समजातर्फे निघत असल्यानें समाजाला अशीं पुस्तकें प्रसिद्ध करणें कठीण जाणार नाहीं असा समज आहे. या समाजांत अनेक संगीतकलाकोविद व संपन्न लोक आहेत; त्यांनी माझ्या या सूचनेचा अवश्य विचार करावा.

महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. आजगांवकर यांनीं लिहिलेलीं दोन चरित्रें प्रसिद्ध झालीं. ' श्रीसमर्थ चरित्र ' हें केशव भिकाजी ढवळे यांनीं व ' तुकाराम चरित्र ' श्री. मंगेश नारायण कुळकर्णी यांनीं प्रसिद्ध केलें आहे. श्री. आजगांवकर हें संतवाङ्मयाचे अभ्यासी म्हणून प्रसिद्ध आहेत. तेव्हां त्यांच्या चरित्रातून भावभक्तिपूर्वक विचार झाला असेल हें निराळें सांगावयास नकोच. या खेरीज बर्नार्ड मॅक्फेडन, सखाराम बापू, केमालपाशा, बालगंधर्वांच्या नवल-कथा इत्यादी कांहीं चरित्रात्मक पुस्तकें प्रसिद्ध झाली आहेत. श्री. देशपांडे यांचे ' आद्य मराठी कवियत्री ' प्रोफेसर कोलते यांचे ' भास्करभट्ट बारींकर ' व पुण्याचे रा. लेले यांनीं लिहिलेले 'दुर्दैवी मोहरे' या पुस्तकांचा विभागांत उल्लेख केला म्हणजे सदर विभागाची माहिती पूर्ण होते.

या खेरीज महत्वाची अशी कांहीं पुस्तकें निघाली. त्यांचा स्वतंत्रपणें उल्लेख करणें जरूर आहे; ' महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास ' हा डॉ. केतकर यांनीं एक मोठा ग्रंथ लिहावयास घेतला असल्याचें वाचकांना ठाऊकच असेल. ह्या ग्रंथाचा एक भाग शालिवाहान पर्व ( पूर्वार्ध ) म्हणून प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथावर ' प्रतिभे 'त मधूनसूदनसरस्वती यांचेच काय तें म्हणण्यासारखें परीक्षण आलें. या विषयाचे ज्ञाते मराठींत एका हातांचे बोटावर मोजण्याइतकेही

भरणार नाहींत. आणि त्याचमुळें अशा ग्रंथावर टीका अथवा परीक्षणें करण्यास कोणी पुढें येत नाहीं. डॉ. केतकर यांच्याकडून संकलित भाग शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध होतील तर मराठींत महत्वाच्या ग्रंथाची भर पडणार आहे. ह. भ. प. श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यानीं लिहावयास घेतलेल्या ' मराठी वाङ्मयाच्या इतिहासा'चा दुसरा खंड चालू सालींच प्रसिद्ध झाला. श्री. पांगारकर यांची वाणी जितकी गोड तितकीच लेखणीही मधूर असते.

मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचा हाच पहिला व मोठा प्रयत्न होय. श्री. पांगारकर यांच्याकडून तो संपूर्ण व्हावा असें कोण इच्छिणार नाहीं! मात्र कांहीं कांहीं ठिकाणीं द्विरुक्ती झाली आहे. तीन तपापेक्षां अधिक काल मराठी भाषेची सेवा करणाऱ्या या निगर्वी, भोळ्या, व सत्शील विद्वानाची अद्याप साहित्यसंमेलनाची अध्यक्षस्थानीं निवड होऊं नये ही कितीतरी आश्चर्याची गोष्ट होय. एक रागिणी कादंबरी आणि एक नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिल्याने रा. जोशी अध्यक्ष होऊ शकतात. वर्तमानपत्रांतून टीकात्मक व चर्चात्मक असे दहावीस लेख लिहिल्याने रा. माधव श्रीहरी अणे अध्यक्ष होऊं शकतात, साहित्यपरिषदेचा संसार आपलेपणानें पहातात म्हणून सरदार माधवराव किबे अध्यक्ष होऊं शकतात, पण ज्यानीं तीन तपांपेक्षां अधिक काळ वाङ्मयाची सेवा केली असे श्री. लक्ष्मणराव पांगारकर यांचे नांव अध्यक्ष म्हणून सुचविलेंही जाऊं नये ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. एकच ध्यास व एकच विषय घेऊन त्याच्यामागें तनमनधन खर्च करणारे श्री. पांगारकर यांच्यासारखें मराठींत कितीसे ग्रंथकार आहेत ? हा एकच विषयाचा छंद त्याना वस्तुतां भूषणावह असतां इतरांच्या दृष्टीनें मात्र तो महत्वाचा वाटूं नये ही आश्चर्याची गोष्ट होय. संतवांङ्मयाचे शोधन, प्रकाशन व विवेचन ही वाङ्मयसेवा नव्हे कीं काय? पांगारकरां-

सारखा, मोरोपंत व तुकाराम यांचे चरित्रग्रंथ लिहिण्याइतका कितीशा विद्वानांचा अभ्यास आहे ? आणि आतांपर्यंत जे दोन भाग प्रसिद्ध झाले ते लिहिण्यास समर्थ असे तरी किती लेखक महाराष्ट्रांत आहेत ? पण अध्यक्ष व्हावयासाठीं सभोवतीं शिष्य किंवा भक्तगणाचे कडे करण्याची पांगारकरांना हौस नाहीं हा त्यांचाच दोष ! श्री. पांगारकर यांच्याकडून हें इतिहासलेखनाचे कार्य होत आहे ही बरीच समाधानाची गोष्ट होय. कारण आरंभीचें वाङ्मय बहुतेक संत लोकांनीं लिहिलेलें व या वाङ्मयाचा ज्यांचा अभ्यास आहे असे आपल्यांत दोनतीनच विद्वान लेखक आहेत. त्यांत पांगारकरांची योग्यता मोठी आहे. हा इतिहास लिहितांना जे वादग्रंथ प्रश्न आहेत त्यांची माहिती टीपांतून जागोजागीं दिली असती तर अधिक बरें होतें. पुढील भाग लिहितांना पांगारकरांनीं या सूचनेचा अवश्य विचार करावा.

'विज्ञानबोध' ह्या ग्रंथाला एका दृष्टीनें फार महत्व आहे. हा ग्रंथ न्यायमूर्ती माधवरावजी रानडे यांचे वाङ्मयस्मारक म्हणून प्रकाशित करण्यांत आला आहे. मागें मी सांगितलेच आहे कीं इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथाचीं जितकी भाषांतरें प्रसिद्ध होतील तितकी पाहिजेत. त्याचप्रमाणें आम्हास आधिभौतिक प्रगतीचे ज्ञान करून घेणे अवश्य असल्यामुळें ह्या वाङ्मयाचाही सर्वांना परीचय झाला पाहिजे. या हेतूनेंच प्रो. श्रीपाद महादेव माटे यानी हा 'विज्ञान बोध' ग्रंथ निरनिराळ्या तज्ञांकडून लिहून घेऊन अल्प किंमतीला विक्रीस ठेवला. या ग्रंथाला श्री. माटे यांनीं एक अतिशय उद्बोधक व विस्तृत प्रस्तावना लिहीली असून त्या प्रस्तावनेंतील विचारसरणी कोणासही मान्य करावीच लागेल. लेखकांची मागेंपुढें पहाण्याची दृष्टी इतकी विशाल आहे कीं त्यावरून श्री. माटे हे मोठें इतिहासकार होऊं शकतील असें वाटतें. ही प्रस्तावना स्वतं-

त्रपणें छापावी अशी माझी सूचना आहे. प्रो. माटे यांचा दुसरा महत्वाचा व अभिनंदनीय उद्योग म्हणजे 'महाराष्ट्र सांवत्सरिका'चे त्यानीं चालवलेले कार्य. हें कार्य लोकमान्य टिळकांचे वाङ्मय स्मारक होय. 'महाराष्ट्र सांवत्सरिक' दरसाल अखंड प्रकाशन होईल अशी कांहीं ठाम योजना श्री. माटे यानी केली तर त्याचे मोठे उपकार होतील. शिवाय या बाबतींत माझ्या अनुभविक दृष्टीस जें वाटते ते लिहीतोः वाचकांचा व प्रकाशकांचा उत्साह आरंभीं असतो तो पुढें टिकत नाहीं. प्रकाशकाला वाटतें कीं आपल्या कामाचे वाचकांकडून चांगले चीज होईल. वाचकांना वाटते पुस्तक चांगले काढले आहे; घेतले पाहिजे; त्याना नुसते वाटते. प्रत्यक्ष विकत घेणारे लोक कल्पनेपेक्षांहीं कमी असतात. त्यांतूनही आरंभी आरंभी जे ग्राहक लाभतात ते पुढे टिकत नाहींत. व त्यामुळें दरसालचे प्रकाशन दरसाल तोट्यांत येत जाते. आरंभींचा अंदाज चुकतो व नंतर प्रकाशकांचा उत्साह पहिल्याप्रमाणें रहात नाहीं. 'महाराष्ट्र सांवत्सरिक' या वार्षिक प्रकाशनाचे कामी प्रो. श्री. म. माटे यांना काय अनुभव आला तें मात्र माहीत नाहीं. पण मी सांगतो तसाच त्याना अनुभव आला असला पाहिजे. म्हणून असें कार्य हे एकट्याच्या जबाबदारीवर काढणें कठीण असते. याकरतां 'महाराष्ट्र सांवत्सरिक' दरसाल प्रसिद्ध केले जाईल अशी काहीं आर्थिकयोजना प्रो. माटे यानीं करून ठेवावी अशी त्याना माझी सूचना आहे.

'पेशवेकालीन महाराष्ट्र' हे श्री. वासुदेव कृष्ण भावे यांचे पुस्तकही कांहीं कमी महत्वाचे नाहीं. यांतील माहिती शक्य तितकी विस्तृत व खरी देण्याचा लेखकांनीं प्रयत्न केला आहे. विषय इतका महत्वाचा आहे कीं पुस्तकांचे वाचन कादंबरी इतके मनोरंजक वाटते. या पुस्तकांत पेशवेकालीन परिस्थिती विषयवार दिली आहे.

या सालीं टीकात्मक अशी दोन पुस्तकें प्रसिद्ध झाली. त्या पैकीं हरीभाऊ आपटे यांच्या 'मी' कादंबरींवरील प्रो. तुळपुळे यांचे पुस्तक यापेक्षां अधिक चिकित्सक दृष्टीनें लिहीले जावयास पाहिजे होते. श्री सहस्त्रबुद्धे याचे 'खाडीलकरांची नाट्यसृष्टी' हें पुस्तक बरेंच विस्तृत आहे व त्यांत माहितीही विपूल आहे यांत शंका नाहीं. पण टीकाकारांही दृष्टी श्री. सहस्त्रबुद्धे यांच्यांत जरा कमीच असलेली दिसते. त्या मानानें श्री. वारपुरे यानीं कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेले खाडिलकरांच्या नाटकांवरील टीकात्मक पुस्तक अधिक मार्मिक व चिकित्सक आहे.

'अर्वाचीन मराठी साहित्य' हें पुस्तक समालोचनात्मक या दृष्टीनें महत्वाचे आहे. यांतील लेख निरनिराळ्या तज्ञांकडूनच लिहून घेतले आहेत. लेखकांनीं मधूनमधून केलेली कांहीं विधानें अमान्य होतील अशी असली तरी निरनिराळ्या विषयांचे एकत्रित समालोचन पहावयास हा ग्रंथ उपयोगी पडेल. हा ग्रंथ श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या रजतमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध करण्यांत आला आहे. मराठी भाषेच्या अभ्यासकांना व टीकाकारांना हा ग्रंथ संग्रहणीय वाटेल. 'मानस मंदिर' हे प्रो. फडके यांचें पुस्तक स्वतंत्रपण प्रसिद्ध झाले. 'संसार आणि धर्म साधन' हें श्री. द्वा. गो. वैद्य यांचे पुस्तक, डॉ. खैर यांचे 'समाजक्रांती आणि हिंदुस्तान' श्री. दिवेकर शास्त्रांचे 'ब्रह्मज्ञान आणि बुवाबाजी' इत्यादी आणखी कांहीं पुस्तकें पसिद्ध झाली. 'बुवाबाजी' हा जसा समाजांत एक धंदा आहे त्याचप्रमाणे 'बुवाबाजी विध्वसन' हाही एक नवा धंदा शास्त्री बुवांनी सुरू केला. दिवेकर यांचे लेखन पल्लेदार असले तरी विवरण भ्रामक असते. वरील पुस्तकानें मात्र त्यांच्या पोटापाण्याची या वर्षापुरती सोय झाली. कु. मैना शहाणे आणि डॉ. आळतेकर यांची दोन शिक्षण विषयक पुस्तकें

प्रसिद्ध झाली आहेत. पैकीं डॉ० आळतेकर यांचे ' प्राचीन भारतीय शिक्षण पद्धति ' हे पुस्तक शैक्षणिक इतिहास या दृष्टीनें महत्वाचे आहे.

'हिंदूसमाजदर्शन' हें एक प्रासंगिक पुस्तक असले तरी सामाजिक इतिहास लिहीणाऱ्यास या पुस्तकाचा बराच उपयोग होईल. मात्र हें पुस्तक यापेक्षां आधिक उपयुक्त व्हावयास पाहिजे होते. प्रयत्न अभिनंदनीय असल्यानें या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. मराठींत चित्रकला व तिच्यासंबधीं माहीती देणारे पुस्तके नाहींत. अशा स्थितीत औंधचे श्री. दाभाडे यांनी ' भारतीय चित्रकला' हे पुस्तक लिहील्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. याखेरीज ज्योतिष, आरोग्यशास्त्र व धर्मशास्त्र विषयक थोडी पुस्तके निघाली आहेत. मुंबईचे सुप्रसिद्ध पंडित प्रो.पां.वा.काणे यांचे'धर्मशास्त्र विचार' हें पुस्तक महत्वाचे आहे, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेने प्रसिद्ध केलेले ' हिंदूधर्माची मूलतत्वे ' हेही पुस्तक संग्रहणीय आहेत. प्रवासवर्णनपर अशी प्रो. गो. चिं. भाटे यांची 'आमची पायगाडीची सफरें ' 'केरलचे वर्णन व वृत्तांत' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध झाली. कै. हरी नारायण आपटे यांचे करमणूकीतील कांहीं निबंध स्वतंत्र पुस्तक रूपानें बाहेर आले. आपटेवाङ्मयांत या पुस्तकानें भर पडली.

' आजकालचा महाराष्ट्र ' हे एक महत्वाचे पुस्तक श्री. पाध्ये व रा. टीकेकर या दोन लेखकानीं लिहून तें भारत गौरवग्रंथमालेनें केले. पुस्तकांतील रा. पाध्ये आणि टीकेकर यांनीं लिहीलेली प्रकरणें कोणती यांची फोड प्रस्तावनेंत केली आहे. या पुस्तकांत सामाजिक व राजकीय विचाराचें समालोचन केले असल्यानें अशा प्रकारचा मराठीतील हाच पहिला ग्रंथ होय. यांतील कांहीं विधानें कित्येकांना रुचणार नाहींत व कांहीं विधानें तर एकतर्फी आहेत. आरंभींची तीन प्रकरणें तर लेखकाच्या अपुऱ्या माहितीची

व अपुऱ्या वाचनाची उदाहरणें होत. ‘ लोकहितवादीं ’ ची पत्रें व सरदेसाई यांच्या रियासती यांपेक्षां केवढतरी ऐतिहासिक ग्रंथसंग्रह वाचनीय म्हणून सर्वांनाही मान्य झाला असतां या प्रकरणांच्या लेखकाला त्याचें ज्ञानही असूं नये ही खेदाची गोष्ट होय ! पेशवाईच्या अस्ताची कारणें बहुतेक लोकहितवादींच्या लेखनांवरून ठरवण्यात आली त्या ग्रंथांतील पहिलीं प्रकरणें काय योग्यतेची समजावी हे वाचकांनींच ठरवावें. मराठेशाहीच्या अस्ताचे इतके बाष्कळ–लेखन प्रकाशकानीं कसें प्रसिद्ध केले व रा. पाध्ये यांनीं तरी ते कसें समाविष्ट केलें याचें आश्चर्य वाटते. शेवटचें प्रकरण मात्र सरस आहे यांत शंका नाहीं. सामाजिक व राजकीय विचाराची दिशा निश्चित करताना बांधलेले तर्क कांहीं प्रसंगीं दुराग्रहाचे वाटतात. या पुस्तकावर टीका करण्याचे हे स्थळ नव्हे; पण एवढे मात्र खरें कीं यापेक्षा अधिक निरीक्षण व मनन करून हा ग्रंथ लिहिला गेला असता तर बरे झाले असते. अशा ग्रंथाची तयारी केवळ चारसहा दिवसांत कांही ग्रंथ जमवून व ते झटपट वाचून होत नाहीं. तर अनेक वर्षे त्या दृष्टीनें निरीक्षण व वाचन आणि मनन व्हावयास पाहिजे. याच विषयावर दुसरा गंथ लिहावयाचा झाल्यास ‘ आजकालचा महाराष्ट्र ’ ह्या ग्रंथाचा उपयोग मात्र बराच होईल. श्री. पाध्ये व टींकेकर यांनीं या उपयुक्त व महत्वाचा विषयावर पुस्तक लिहिल्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

‘ साहित्य आणि समाज जीवन ’ ह्या पुस्तकाचा उल्लेख करण्याइतकेही तें पुस्तक किंमतीचे नाहीं. पण या पुस्तकावर अनुकूल अभिप्राय इतके प्रसिद्ध झाले कीं त्याबद्दल दोन शब्द लिहिणें जरूर आहे. हे पुस्तक मला तर कळेच ना ! अभिप्राय वाचावे तर मनमुराद स्तुती ! हे पुस्तक इतरांना कळावे व त्यावर स्तुतिपर कॉलमचे कॉलम प्रसिद्ध व्हावेत आणि मला मात्र त्या पुस्तकांत कांहीं कळेना

व त्यातले जो अनेक ठिकाणी वाङ्मयातील व्यक्तित्वाचा एकच मुद्दा मांडला आहे तो पटेना. म्हणून प्रि. अत्रे यांना हे पुस्तक किती समजले म्हणून विचारले. प्रि. अत्रे यांनीं ' सोशॅलिझम ' या विषयाचा नुकताच अभ्यास सुरू केला आहे. ते म्हणाले ' अहो तें पुस्तक मराठी भाषेंत लिहिले नाहीं, मराठी लिपींत लिहिले आहे; त्यानंतर माझे स्नेही व विद्वान कामगार पुढारी श्री. व. भ. कर्णिक यांना मी विचारले. त्यांचा अभिप्राय पुढील प्रमाणें पडला. ' या पुस्तकांत ना इतिहासाचे, ना साहित्यशास्त्राचे किंवा मार्क्सवादाचें पुरेसें ज्ञान लेखकाच्या संग्रहातच नाहीं. झाडावरील फळ तोडून घेण्याचा प्रयत्न वामन बटू करूं लागला म्हणजे त्याचें जसें हसूं होतें तसेंच आपल्या आवाक्याबाहेरील क्षेत्राला गवसणी घालण्याच्या खुळचट प्रयत्नांत पडून लेखकानें या पुस्तकाच्या बाबतींत करून घेतले आहे. चार इंग्रजी पुस्तकें व मुंबई सरकारचे तुरुंगखात्याचे रिपोर्टस वाचून ' गुन्हेगार ' लिहावयाचे अगर नवमतवाद म्हणजेच समाजसत्तावाद असें कल्पून समाजसत्तावादावर पाचपंचवीस पानें खरडावयाची होती तोंवर ठीक होते. गुडघाभर पाण्यांत डुबकायला शिकलेल्या माणसानें जागतिक इतिहास व साहित्य यांच्या महोदधींत पोहण्याचा वेडा हट्ट लेखकानें धरलेला आहे. या पुस्तकाच्या वाचनानें मार्क्सवादाबद्दल व मार्क्सवादी साहित्यपरीक्षणा बद्दल वाचकांचें मत कलुषित होण्याचाच जास्त संभव आहे. मार्क्सवाद न कळल्यामुळें व इतिहास आणि साहित्य यांच्या तुटपुंज्या अभ्यासामुळें लेखकानें व्यक्ती, वांङ्मय व ऐतिहासिक घटना यावर प्रदर्शित केलेली मतें व त्याविषयीं केलेले विवेचन अनेक ठिकाणीं अपुरे, चुकीचे व बऱ्याच ठिकाणीं धादांत खोटे आहे असें स्पष्टपणें नमुद केले पाहिजे. अर्धसत्य हें सत्यापेक्षांहीं जास्त भयंकर असते या सिद्धांताची जाणीव हें पुस्तक वाचतांना पदोपदी होते. पुस्त-

काची भाषा अतिशय क्लिष्ट व कठीण आहे; विवेचनपद्धति शास्त्रीय नाहींच. अशातऱ्हेचे हें पुस्तक असल्याकारणानें मराठी भाषेंत त्यानें चांगली भर पडली आहे असें म्हणता येणार नाहीं.' श्री. वसंतराव कार्णिक यांचा हा अभिप्राय कोणासही मान्य होईल. चालू सालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत सर्वांत दरिद्री पुस्तक जर कोणते असेल तर तें हें 'साहित्य आणि समाजजीवन' पुस्तक होय. कागद व छपाई यांची निरर्थक उधळपट्टी या पुस्तकाइतकी दुसरी आढळत नाहीं. आणि काहीं न समजल्यामुळेच मला वाटते या पुस्तकावर सर्वत्र स्तुतिपर अभिप्राय आले असावेत. कळत नाहीं असें सांगणे हे आमच्या अभिप्रायलेखकांना मोठे कठीण वाटत असते. समाज सत्तावादासंबंधीं लोकशिक्षण मासिकांत स्टन्लेवेलस-संवादाचे जे उत्कृष्ठ भाषांतर प्रसिद्ध झाले आहे ते वाचून जी कल्पना होते ती कल्पना ह्या पुस्तकाच्या वाचनामुळें लक्षांशानेंही होत नाहीं. वरील संवादाचे भाषांतर ' विद्यासेवक ' या लेखकांनें फार छान केले आहे. मी जेव्हां ' साहित्य आणि समाजजीवन ' हें पुस्तक वाचावयास घेतले त्यावेळीं नेहमींची मांडणीं उलटी पालटी करून निरनिराळी अक्षरे पुन्हां पुन्हां छापलेली ही अंक-लिपी आहे कीं काय असा मला प्रथम भास झाला.

श्री. प्रियोळकर यांचे ' रुक्मिणी स्वयंवरा ' वरील पुस्तक वाखाणण्यासारखे नाहीं असें कोण म्हणेल ? अभ्यासू वृत्तीचे जे लेखक आपल्यामध्यें आहेत त्यापैकीं श्री. प्रियोळकर हे एक होते. सुप्रसिद्ध विद्वान श्री. वैशनाथ काशिनाथ राजवाडे यांचे ' निरुक्ताचे मराठी भाषांतर प्रसिद्ध झाले. याखेरीज आणखीही पुस्तके थोडी-फार प्रकाशित झाली असली तरी ती बहुतेक येथें उल्लेख करण्या-सारखी नाहींत.

'व्यवहारकोश' ह्याचे काम अत्यंत सावकाशपणें चालले आहे. यापेक्षां अधिक व झटपट काम कसे होईल याचा चालकांनी विचार करावा. 'शब्दकोशा'चे चार भाग प्रसिद्ध झाले. या वर्षी एक भाग निघाला. आणखी दोन भाग बहुधा होतील असें वाटते. 'शब्दकोश' पुरा झाला म्हणजे मराठी भाषेचे वैभव केवढे तरी वाढणार आहे. 'राजवाडे धातुकोश' या सालीं प्रसिद्ध होईल असा माझा अंदाज होता तो खरा ठरला नाहीं. 'चरित्र कोशा'ची प्रगती का खुंटली ?

साहित्यसंस्थांची वाढ झाली पण जुन्या संस्था पहिल्या उत्साहानें काम करीत नाहींत. त्या दृष्टीनें पुण्याच्या 'महाराष्ट्र शारदा मंदिराच्या' कार्याची स्तुती केली पाहिजे. निरनिराळ्या विषयावर चर्चा, परिचय, स्नेहभोजन, काव्यगायन, सत्कारसमारंभ मंदिरातर्फे करण्यांत आले. माझ्या दृष्टीनें सबंध महाराष्ट्रांत याच संस्थेनें चांगलें काम केले आहे. त्याच्या खालोखाल मुंबईच्या 'वाङ्मयचर्चा मंडळा'ची कामगिरी निर्दिष्ट करण्यासारखी झाली. प्रो. माधवराव आळतेकर हे या मंडळाचे अध्वर्यु आहेत. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें या वर्षी हेमंतव्याख्यानमाला चालू केल्याबद्दल मी ग्रंथसंग्रहालयाचे अभिनंदन करतो. झब्बूशाही विध्वंसक मंडळाचा या समालोचनांत उल्लेख करावा किंवा नाहीं हा प्रश्न आहे. कारण या मंडळाचे कार्य साहित्य विषयापुरतेच मर्यादित नाहीं; तरीपण कांहीं बाबतींत निषेध करण्याचे काम या मंडळानें केले आहे ! 'मुंबई मराठी साहित्य संघ' मुंबई येथें स्थापन झाला आहे. पण या सालीं कांहीं कार्य झालें नाहीं; पुढें होईल अशी आशा वाटते. कोल्हापुर येथें व पुणे येथें या सालीं कांहीं साहित्यमंडळे निघाली आहेत. काम पाहून त्यांचा उल्लेख करूं. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं साहित्यसंघ निर्माण होतील तेवढे उत्तम; पण कार्य झाले पाहिजे व ठरीव कार्यक्रम

असला तरच उत्तम कार्य होईल. सांगलींतील साहित्यिकांचा पूर्वींचा उत्साह मावळलेला दिसतो. 'देवलक्लबा'कडून पहिल्यासारखे काम होत नाहीं.

असो, या सालांतील महत्वाच्या पुस्तकांचा हा आढावा येथें संपला. कांहीं पुस्तकें नजर चुकीनें राहून गेली असल्यास त्या त्या पुस्तकांच्या लेखकप्रकाशकांनीं राग करूं नये. कांहीं पुस्तकें मला उल्लेखनीयही वाटली नाहींत. बालवांङ्मयाची प्रगती होतच नाहीं असे दिसते. 'मुलांचे मासिक' 'आनंद' 'खेळगडी' आणि 'बालबोध मेवा' अशी चारच मासिके मुलांसाठीं म्हणून साधारणपैकीं निघत आहेत. या मासिकांचा उल्लेख मागें मी मुद्दामच केलेला नाहीं. या खेरीज मुलांसाठीं म्हणून उद्बोधक व आकर्षक पुस्तकें व्हावयास पाहिजेत. पण तिकडे कोणाचेच लक्ष नाहीं. चित्रशाळा प्रेस, रा. तुकाराम पुंडलीक शेटे, ढवळे, मिसाळ इत्यादी कांहीं प्रकाशकांनीं या सालीं पुस्तकें नेहमींच्या पद्धतीप्रमाणें प्रसिद्ध केली असली तरी त्यांचे महत्व वाळूच्या ढिगाऱ्यांत आणखी मूठभर वाळूच ओतल्यासारखे होय. मासिकांतही अद्याप कितीतरी सुधारणा व्हावयास पाहीजे. मराठीतील या मासिकांपेक्षा हिंदी भाषेंत निघणारी मुलांची मासिके आधिक आकर्षक व संग्रहणीय असतात. मुलांच मोठे व जुने असे 'आनंद' मासिक; पण त्यांत सुधारणा कांहीं झाली काय ? पुण्यांतील एका शिक्षणशास्त्रज्ञानें या मासिकांसंबंधीं जे उद्गार काढले ते मला पुन्हा पुन्हां आठवतात. त्यांचे म्हणणें असे कीं मुलांच्या संगोपनशास्त्राचे व मानसशास्त्राचें अध्ययन ज्यानीं केलें नाहीं असे लोक या मासिकांचे संपादक असल्यानें मुलांना आवडेल व उपयुक्त होईल असें प्रकाशन आजच्या संपादकवर्गाकडून होणेच शक्य नाहीं व कोणी अपेक्षाही करूं नये. उदाहरणार्थ म्हणून त्यानें आनंद मासिकाच्या तिन्ही संपादकांच्या ज्ञानाची मजजवळ

चिकित्सा केली. मराठींत बालवाङ्मय अगदींच कमी प्रतीचे आहे व आहे तेंही इतके कमी कीं कांहीं विचारूंच नका! द्रौपदी, सीता, राम, कृष्ण यांच्या चरित्रांपलीकडे मुलांना कांहीं शिकविण्यासारखे आहे असे आमच्या बालवाङ्मयलेखकांना दिसतच नाहीं. त्यांतूनही चरित्रें लिहिणें आणि छापणें यांत केवळ व्यापारीच दृष्टी असते. या शालोपयोगी वाङ्मयाचीसुद्धां बरीचशी अशीच स्थिती आहे. नाहीं म्हणावयास अलीकडे तयार झालेली अत्रेघाटे, बेहरे, नेरूरकर यांची प्राथमिक पुस्तकें पूर्वींपेक्षां कितीतरी चांगली आहेत. यांतही कर्नाटक प्रेसनें तयार केलेल्या अत्रेघाटे यांच्या पुस्तकांचा दर्जा पहिल्या प्रतीचा लागतो. निवडक गद्यपद्यवेंचे काढण्यांत अलीकडे जराशी सुधारणा झालेली दिसते. प्रो. वामन मल्हार जोशी यांची गद्य पुस्तके व कर्नाटक हाऊसनें प्रसिद्ध केलेली 'महाराष्ट्र रसवंती' या नांवाची पद्य पुस्तकें चांगल्यापैकीं आहेत. अंकगणितें, भुगोल इतिहास वगैरे विषयावरील शालोपयोगी पुस्तकांतून अद्याप कितीतरी सुधारणा व्हावयास पाहिजे. या बाबतींत महत्वाची सूचना करावयाची अशी कीं शालोपयोगी पुस्तकें त्या त्या विषयांतील तज्ञांकडून लिहिली जावी. विशेषतां प्राथमिक शिक्षणक्रमांत तज्ञ लेखकांनी लिहीलेल्या पुस्तकांचा अतिशय दुष्काळ आहे.

ऐतिहासिक पुस्तकांचे बाबतींत म्हणण्यासारखी प्रगती होत नाहीं. ऐतिहासिक संशोधनात्मक जे थोडेफार ग्रंथ निघतात तेवढेंच. या बाबतींत कांहीं संशोधक अविश्रांत श्रम करीत आहेत. ऐतिहासिक वाङ्मयाचा प्रो. पोतदार यानीं घेतलेला आढावा स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला आहे तो वाचला म्हणजे आपण केले काय, करावयाचे किती आहे व कसे काम केले पाहिजे याची पूर्ण कल्पना होते. महानुभावपंथीय वाङ्मयाचे संशोधन आणि थोडे थोडे प्रकाशन सुरूं झालें आहे. महानुभाव वाङ्मयाचे कार्य वऱ्हाड

नागपूरकडील संशोधक श्री. देशपांडे, प्रो. मिराशी, प्रो. कोलते इत्यादी कार्यकर्ते मनापासून करीत असलेले दिसतात. पण संशोधनाचे मानानें इतिहास ग्रंथ मात्र तयार होत नाहींत. याचे कारण संशोधक हे संशोधनाचे मार्गे आहेत आणि झालेल्या संशोधनाचा अभ्यास करून त्यावरून स्वतंत्र ग्रंथरचना करणारे लेखक मात्र नाहीत. श्री यशवंत नरसिंह केळकर हे वसईच्या संग्रमावर एक पुस्तक लिहीत होतें हे मला माहीत आहे. पुस्तक लौकरच प्रसिद्ध होईल असे मी नुकतेच वाचले. प्रो. पोतदार यानीं श्री. नाथपंथ-ग्रंथमाला सुरू केली असून त्याचे पहिले पुष्प 'ज्ञानप्रदीप' या खालीं प्रसिद्ध झाले आहे. धुळ्याचे श्री. देव यांचे प्रकाशन सुरू आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाचे व राजवाडे इतिहास संशोधन मंडळाचे नियतकालिकांतून इतिहासिक ग्रंथासामुग्री प्रसिद्ध होत आहे. पण ऐतिहासिक ग्रंथाला मागणी नसते ही फारच खेदाची गोष्ट होय. पुन्हां पुन्हां मागणी कशी उत्पन्न होईल हा प्रश्न माझ्या समोर उभा राहतो. या बाबतींत कांहीं योजना प्रसिद्ध करावी असा माझा विचार आहे. माझी योजना पसंत पडली व कार्यकर्ते पुढें आले तर बरीच अभिनंदनीय प्रगती होईल ! पाहू या कसे जमते तें !

या सालीं कांहीं वादही झाले. त्यांत पावित्र्यविडंबन या वादाचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. ह्या वादाचा उगम कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्यासंबंधीं आलेल्या एका उल्लेखावरून प्रो. श्री. म. माटे यांच्या पासून झाला. कोल्हटकर यांच्याविषयीं निघालेल्या उद्गारामुळें त्यांचा शिष्यवर्ग जरा रागावला यांत शंका नाहीं. त्यामुळें 'पावित्र्यविडंबन' हा विषय पुणे येथील संमेलनामध्यें चर्चेसाठीं ठेवण्यात आला. या चर्चेत अनेकानीं भाग घेतला असला तरी त्यां-सर्वांत प्रो. माटे यांचे भाषण फारच छान झाले. प्रो. ना. के. बेहरे यानीं

याच विषयावर ' महाराष्ट्रशारदा ' मासिकांत एक लेख लिहिला. श्री. खांडेकर यांनीं मुंबई साहित्यसंमेलनाचे अध्यक्षस्थानावरून प्रो. माटे यांची थोडीशी टवाळी केली. ' बंधनाच्या पलीकडे ' या कादंबरीचे लेखक श्री. देशपांडे यांनीं जे भाषण केले तें तर शिष्टाचारास सोडून झाल्याचे वाचले. विहार साप्ताहिकानें या वादांत भाग घेतला. एवढें सर्व होऊन वादाचा शेवट झाला नाहीं. कदाचित त्याचा उल्लेख यापुढेही करण्यांत येईल असें वाटतें. या वादांत एक पक्ष व्यक्तिविषयक आदारानें व दुसरा पक्ष सामुदायिक विचारप्रवृत्तीनें भाग घेत होता. या बाबतींत मला एवढेंच सुचवावयाचे आहे कीं पावित्र्याची भावना कधींच नाहिशीं होणें शक्य नाहीं. फक्त पावित्र्यविषयक व्यक्ती आणि स्थान बदलू शकेल. तेव्हां दुसऱ्याच्या भावना दुखविणें हें केव्हांही इष्ट नाहीं. सुधारणेच्या दृष्टीनें चिकित्सा करणें वेगळे व टवाळी करणें वेगळे ! एखाद्यानें एकाद्याची भावना दुखविली म्हणून त्यानं टीका केली तर त्यांत चुकले कोठें. उलट प्रथम टीका केली त्याच्याही भावना प्रतिटाकाकारानीं या वादांत दुखविल्याच किं नाहीं ! पावित्र्यविडंबनासंबंधीं एक ठराव इंदूर संमेलनांत मंजूर करण्याची श्री. कृष्णराव मराठे यानीं तयारी केली होती. पण ठरावास पाठिंबा द्यावयासच त्याना कोणी मिळाला नाहीं ! संगीत नाटकाच्या आद्य जनकत्वाचा वादही असाच. हा वाद ' प्रमोद ' साप्ताहिकानें काढला. तारीख वारानें कोणी आद्य जनक ठरला तरी ज्याच्या प्रयत्नानें प्रसार व लोकप्रियता वाढते त्याची योग्यता मोठी. आणि म्हणूनच लोक त्याच व्यक्तीला महत्व देत असतात. किर्लोस्कर हे संगीत नाट्यांचे आद्यजनक किं त्रिलोकेकर आद्यजनक या वादाचाही शेवट याच मुद्यावर झाला पाहिजे. श्रीशारदेच्या दरबारातील मुंबईचे एक ' चित्रगुप्त ' श्री. श्रीपाद के. नाईक यांनीं रोजकीर्दी काढून यांत संशोधन

केले. जो जो संशोधन करावे तो तो आद्यजनकत्व ठरविण्यासाठीं त्याना अद्याप मागे मागे जावे लागत आहे !

पण या दोन्ही वादांपेक्षां 'महाराष्ट्राचे केंद्र' पुणेशहर कां दुसरें कोणते या संबधीं या साली जी टीका झाली ती वाचून मात्र कोणासही खेद होईल ! या वादास प्रो. द. वा. पोतदार यांच्या नागपूरकडील एक दोन व्याख्यानानीं सुरवात झाली. त्याबद्दल प्रो. बनहट्टी यानीं 'फुलोर' या पुस्तकांत लेख लिहिला व हा लेख 'प्रतिभे'ने पुनर्द्रित केला. प्रो. बनहट्टी यांचा लेख वाचला म्हणजे प्रांताभिमानानें प्रो. बनहट्टी ही बरेच अंध झाले असावेत असे वाटते. निदान पुण्याविरुद्ध त्यांचे मत बरेंच कलुषित झाल्याचे दिसत आहे. या सर्व लेखांत पुणे हे ' महाराष्ट्राचे केंद्र ' एका काळीं होते हल्ली नाहीं असें सिद्ध करण्याचा प्रो. बनहट्टी यांनी जो बराच हट्टाहास केला आहे त्या ऐवजीं पुणे हे केंद्र नाहीं तर मग कोणते शहर आज केंद्र होऊ शकते हें त्यानीं निश्चितपणें सांगितलें असतें तर बरें झाले असते. पुणे येथील संस्थांची त्यांनी जी टवाळी केली आहे ती वाचली म्हणजे ह्या विद्वानाच्या टीकेमार्गें नागपूरकडील साहित्यपुढारी होण्याचा व्यक्तविषयक स्वार्थ असावा असा भास होतो. अजून हा वाद मिटला नाहीं व तो सन १९३६ या सालींही चालू रहाणार असें दिसतें. या वादांत भाग घेणाऱ्या विद्वानांना मी एवढेंच नम्रपणें सुचवितों कीं पुण्याचे वैभव पाहून बोटें मोडीत असण्याऐवजीं स्वतांच्या आवडत्या शहराचे वैभव वाढविण्याचा प्रयत्न करणें हेच शहाणपणाचे व अभिमानाचें आहे. महाराष्ट्राचे पुणे हें एकच केंद्र असण्याऐवजी आणखी चार पांच निर्माण झाली तरी कोणास नको कां आहेत ? महाराष्ट्र साहित्य परिषदेस नागपूर येथें मोफत जागा देण्यासंबंधीं एक पत्र इंदूर संमेलनाकडे आले होते. या देणगी मार्गें दातृत्वाची उदारता असण्याऐवजीं पुण्याचा द्वेष असावा

अशी मला शंका येते. महाराष्ट्र साहित्य परिषदेची मुख्य कचेरी पुण्या काय म्हणून नागपूरास पाहिजे असा अभिनिवेश या देणगींत दिसून येतो. पण प्रो. नारायण केशव बेहेरे यांची माझी भेट झाली म्हणजे मी अधिक चौकशी करणार आहे. प्रो. बेहेरे बनहट्टी वगैरे मंडळीं पुण्यामुंबईपासून फुटून सवता सुभा करूं पहात आहेत; तो कितपत यशस्वी होईल व त्याचे परिणाम काय होतील हे आजच सांगता येत नाहीं !

मात्र या सर्व विद्वानांना मला एक इषारा द्यावयाचा आहे. आज सर्व बाजूनीं व सर्वांकडून महाराष्ट्रावर आघात होत आहे. महाराष्ट्राला खड्यासारखे वगळून कार्य करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत असलेली दिसते. दाक्षिणी व गुजराथी या मधील तेढ जोरात आहे. महाराष्ट्रीयांना मान देण्याचे व त्यांच्या कर्तृत्वशक्तीचे कौतुक करण्याचे इतराना जीवावरचे संकट वाटतें. गांधींच्या उदयापासून तर ही दुष्ट प्रवृत्ती जोरावत आली असे म्हणावयास हरकत नाहीं. खुद्द गांधीं हे महाराष्ट्राचे व महाराष्ट्रीयांचे पक्के द्वेष्टे आहेत ! पंडित जवाहिरलाल नेहरू सुद्धां महाराष्ट्रीयांचा अपमान करण्यांत मोठे भूषण मानतात ! सामाजिककार्य असो व साहित्यविषयक कार्य असो आजच्या स्थितींत आपण सर्वांनी एक होऊन महाराष्ट्रापुढें इतरांना वाकावयास लावण्याची महत्वाकांक्षा आपण धरावयास नको काय ? स्वतांचा मान, स्वतांची श्रेष्ठता, स्वतांची कर्तबगारी आणि स्वतांचा इतिहास विसरणे म्हणजे राष्ट्रीयवृत्ती नव्हे. इतरांकडून लाथा मिळत असतां त्या निमूटपणें सहन करणे व त्या सहनशीलतेला राष्ट्रीय वृत्तीचा मुलामा चढवून गौरव करणे ही खचित लाजिरवाणी गोष्ट होय. बाहेर आघात होत असतां आपल्यापैकींच कांहीं मंडळी महाराष्ट्राची निर्भत्सना करीत असतात व त्याचेच त्याना कौतुक वाटते. या वाढत्या वृत्तीला आळा घालण्याऐवजीं

महाराष्ट्राचे केंद्र पुणेशहर का नागपूरमुंबई हा वाद कसला करीत बसला आहांत ? इंग्रजानीं मराठेशाहीला घेरले असतां आपसांत भांडणाऱ्या आपल्या पूर्वजाना हंसणारे तुम्ही आज स्वतां काय करीत आहांत याचा विचार करा. दिवसेंदिवस आपली पिच्छेहाट होत असताना पुणेशहराला व पुणेकरांना दोष देऊन का महाराष्ट्राची उन्नति होणार आहे ! महाराष्ट्राची उन्नति करण्याचा ताम्रपट कांहीं एकटया पुण्याला दिलेला नाहीं. इतराच्या मनगटांत जोर असेल तर तो त्यानीं दाखवावा. पुणेशहर काय त्यांचा हात धरीत आहे ? महाराष्ट्राचे केंद्रस्थान पुणेशहर नाहीं असे ठरले तर भुगोलांत आणि इतिहासांत पुणेशहराचा उल्लेख कांहीं मद्रास इलाख्यामधें करण्यांत येणार नाहीं ! प्रो. बेहेरे, प्रो. बनहट्टी वगैरे मंडळींत हे काय नवीन भुत संचारले आहे कळत नाहीं ! हा वाद अद्याप मिटला नाहीं. सन १९३६ सालांतही तो चालूच रहाणार.

प्रो. बेहेरे आणि प्रो. पोतदार या दोन विद्वानांत या सालीं जी खडाजंगी उडाली ती वाचून या दोघांही विद्वानांचे थोडे थोडे चुकले असेच म्हणावे लागते. पुरते वाचून व चौकशी करून मग प्रो. बेहेरे यानी 'महाराष्ट्र शारदेंत' लिहावयास पाहिजे होते. व त्यानंतर प्रो. पोतदार यानींही उत्तर देण्यासाठीं म्हणून महाराष्ट्र वगैरे पत्रांकडे धांव घेण्याऐवजी ' महाराष्ट्र शारदे ' च्या पुढील अंकांपर्यंत थांबावयास काय हरकत होती ? पण यांत असें झाले की 'महाराष्ट्रा'चे व प्रो. बेहेरे यांचे हल्ली चांगलेच वैमनस्य आहे. प्रो. बेहेरे यांच्यासंबंधीं गैरसमज पसरावयास संधि मिळाल्यास महाराष्ट्राला पाहिजेच असते. प्रो. पोतदार यानीं खाजगी म्हणून माहिती दिली आणि महाराष्ट्रानें प्रसिद्ध करून टाकली. पाध्ये टकेकर वादही असाच. या वादाकडे प्रकाशक लेखक यातील संबंध या दृष्टीनें पाहिले म्हणजे लेखकाला मोबदला दिल्यावर त्याच्या लिखाणाची मालकी सर्वस्वी प्रकाशकडे

जाते असें माझें मत आहे. म्हणून अगोदर लेखकप्रकाशक यामध्यें मजकुरात फेरबदल करण्याचा हक्क कोणाचा यासंबंधीं करारच व्हावयास पाहिजे! त्यातून 'आजकालचा महाराष्ट्र' या पुस्तकांची तयारी नोकरीच्या वेळांत करण्यांत आल्यानें तर श्री. टिकेकर यांच्या म्हणण्यांत कायद्याचे दृष्टीनें कांहीं अर्थ नाहीं! या बाबतींत कांहीं वर्षांपूर्वी 'वाईकर भटजी' या पुस्तकासंबंधीं झालेल्या दाव्याचा निकाल लेखकानी नेहमी दृष्टीपुढें ठेवला पाहिजे. हा पाध्येटीकेकर-कुळकर्णी वाद कोर्टांत जाणार होता. पण तसा कांहीं प्रकार अद्याप घडला नाहीं. मुंबईचे एक प्रसिद्ध बुकसेलर रा. तुकाराम पुंडलीक शेटे यानी सुखटणकरभागवत याच्यावर फौजदारी फिर्यादी मुंबईच्या कोर्टांत गुदरल्या आहेत. त्यांचा निकाल काय लागतो तें पुढील वर्षी कळेल. या फिर्यादी फार महत्वाच्या आहेत.

कंपूशाही विरुद्ध प्रतिभेत 'रामशास्त्री' यांनीं जी वेळोवेळीं टीका केली; त्यामुळें खांडेकरभक्त विरुद्ध रामशास्त्री यामधें जो वाद झाला तोही कांहीं कमी महत्वाचा नाहीं! रामशास्त्री यांनीं खांडेकर यांच्या विरुद्ध जी टीका केली ती निःपक्षपातीपणाची होती. पण त्यामुळें खांडेकर यांचे स्नेही व भक्तगण यांनीं गाल फुगविले व हमरीतुमरी सुरू केली. साहित्यांत बुवाबाजी आहे ती नष्ट व्हावी हा रामशास्त्राचा मुख्य हेतू दिसला. कंपूशाहीमुळें साहित्याचे नुकसान होते ही त्यांची तक्रार खरी असली तरी कंपूशाही कधींच नष्ट होणार नाहीं असें माझें मत आहे. ज्या कंपूशाही विरुद्ध रामशास्त्री प्रतिभेतून निकाल फर्मावित असतात त्या 'प्रतिभे'भोंवती कंपूशाहीचेही कडे आहेच कीं! श्री. वरेरकर यांनीं पुण्याच्या कंपूशाहीविरुद्ध तक्रार केली; पण मुंबईंत काय कंपूशाही कमी आहे? नागपूर येथें काय कंपू नाहींत? बडोद्यांत कंपू नाहींत? कोल्हापुरांत काय कंपू नाहींत? सर्वत्र कंपू आहेत. मुंबईंतील एका लेखकाची एका

सामान्य विद्यापिठांत मराठीचे प्रोफेसर म्हणून अर्जावरून निवड झाल्यावर 'सर्व्हंट ऑफ इंडिया'चे सभागृहांत त्यास मेजवानी झडली ! ती मुंबईतील एका कंपूनेच नाहीं कां दिली ? तेव्हां कंपू हें असणार पण या कंपूशाहीमुळे जे साहित्यिक कंपूंत सामील होत नाहींत त्यांचे नुकसान होते ही तक्रार मात्र अगदी खरी आहे. रामशास्त्री यांनीं कंपूशाहीविरुद्ध लिहितांना आपण स्वतां एका कंपूतील आहोंत असा आपल्या लिखाणानें भासही होऊं दिला नाहीं इतके त्यांचे लेखन निःपक्षपातिपणाचे व व्यक्तीद्वेषविरहित होते याबद्दल मी रामशास्त्र्यांचे अभिनंदन करतो. या टीकेचाच परिणाम म्हणजे मुंबईत येत्या मार्च पासून 'जोत्स्ना' नांवाचे मासिक सुरू होणार ! माझे हे विधान वाचून जोत्स्नेचे सातही यजमान माझ्यावर रागवतालही. पण मला मात्र तसेंच वाटत आहे एवढें खरें. या नव्या मासिकाची जाहिरात नोव्हेंबर महिन्यापासून माझ्या वाचनांत येत आहे. मासिकें कोणी काढावी व कशी काढावी या संबंधीं मला एकदां सविस्तर लिहावयाचे आहे. पण या 'जोत्स्ना' मासिकांत माझे कांहीं स्नेहीही सांपडले असल्यानें तूर्त तो विचार लांबणीवरच टाकावा लागत आहे. या सात संपादकांत कांहीं माझे स्नेही व कांहीं बरेच परिचित मंडळी आहे. तूर्त आंतून कींव वाटत असली तरी मासिक यशस्वी होवो असें मी मनःपूर्वक इच्छित आहे. उत्साहाला मर्यादा नसते. त्यामुळें अनेक साहित्यप्रेमी व कांहीं व्यापारी बुद्धीनें या नियतकालिकाचें धंद्यांत पडत असतात. व शेवटीं कल्पनेच्या विरुद्ध शेवट होतो. असाच आजपर्यंत बहुतेकांचा अनुभव आहे. सांगावयाचें असें कीं कंपूशाही असली तरी ती स्वतांला तारक होईल अशी असावी आणि दुसऱ्याला मारक नसली म्हणजे झालें

असो, सन १९३५ सालचे हे साहित्यसमालोचन संपले. हे समालोचन मी बहुतेक स्वतांच्या स्मृतीनें लिहीले आहे. त्यामुळें त्यांत कांहीं पुस्तके गळली असण्याचा संभव आहे हें मी वर सांगितलेच. त्याची कांहीं उदाहरणें देतो. मी प्रसिद्ध केलेला श्री. शामराव ओक यांच्या ' कोपरखळ्या ' या बहुशा विनोदी व उपहासात्मक कथासंग्रहाचा उल्लेख मागे करण्याचे राहूनच गेले. श्री. शामराव ओक हे एक बुद्धीमान लेखक आहेत व त्याचे विनोदी लेखण बरेच बोचक असते. मराठींत जे दोन तीन या धर्तीचे लेखन करणारे साहित्यिक आहेत त्यापैकीं श्री. शामराव ओक हे एक होत. 'सांष्टांग नमस्कार ' या प्रि. अत्रे यांच्या नाटकाची दुसरी आवृत्ती मीच प्रसिद्ध केली. त्याचाही उल्लेख राहून गेला. त्याचप्रमाणें श्री. स. अ. आळतेकर यांच्या ' दांपत्य सुखाचा ज्ञान कोश ' आणि ' अच्युतराव स्मारक ग्रंथ भाग ३ रा ' व 'वनभोजन' या पुस्तकांसंबंधीं लिहिण्याचे विसरलो. यापैकीं पहिलें पुस्तकही मीच प्रसिद्ध केले आहे. एवढे दोष गळले. म्हणजे बहुधा महत्वाचे असें एकही पुस्तक अनुल्लेखित राहिले असेल असें वाटत नाहीं. नियतकालिकासंबंधींही थोडासा खुलासा करतो. नासिक येथें निघणारे ' वाङ्मय ' मासिक बंद झाले असे लिहिले पण ता. ३१ जानेवारी रोजी याचा ताजा जोडअंक माझ्या पहाण्यांत आला. तोपर्यंत यांचे अंक मला सापडलेच नाहींत. हा जोड अंक आगष्ट—सप्टंबर महिन्याचा आहे. गेल्या तीन चार महिन्यांत अंक न निघाल्यामुळें मासिक बंद झाले असे मी लिहिल्यास तो माझा दोष नव्हे. इतरही कांहीं मासिकांचें बाबतींत असाच प्रकार झाला असण्याचा संभव आहे. असें कांहीं दोष असल्यास वाचकांनीं क्षमा करावी.